# वृषाली जोशी

# हर्क्युल पायरोच्या साहसकथा



# हर्क्युल पायरोच्या साहसकथा २

मूळ लेखिका – अगाथा ख्रिस्ती

मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी

सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.

दूरभाष ९९२१७४६२४५

**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# हर्क्युल पायरोच्या साहसकथा २

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

### आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

हर्क्युल पायरोच्या साहसकथा २


लेखिका : अगाथा ख्रिस्ती

अनुवादिका: वृषाली जोशी

चलभाष : ९९२१७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

**प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान**

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : ६ नोव्हेंबर २०२१

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# हर्क्युल पायरोच्या साहसकथा २

## कथांचा क्रम

अगाथा ख्रिस्ती

१ पाश्चिमात्य ताऱ्याचे साहस

२ तुमची बाग कशी फुलते?

३ समुद्रावरील समस्या

४ क्लॅफॅमच्या स्वयंपाकीणीचे साहस

५ हरवलेले इच्छापत्र

६ दुहेरी पुरावा

# अगाथा ख्रिस्ती



अगाथा ख्रिस्ती ही जगातील पुस्तक खपाचा उच्चांक गाठलेली व जिच्या लिखाणावर आधारित असे अनेक नाटक व सिनेमे निघाले, अशी प्रसिद्ध इंग्लिश लेखिका होती. सुमारे शंभर भाषांमध्ये तिच्या पुस्तकांचे अनुवाद झाले.

पहिल्या महायुद्धात ती परिचारिका म्हणून काम करत होती. तिची पहिली कादंबरी 'The Mysterious Affair of Styles' ही १९२० मध्ये प्रकाशित झाली. त्यात तिने हर्क्युल पायरो या गुप्तहेराची निर्मिती केली. पुढे २५ कादंबऱ्यांमध्ये तेच पात्र रहस्ये

सोडवत राहिले. ‘The Murder of Roger Ackroyd’ या १९२६ मध्ये प्रकाशित झालेल्या कादंबरीपासून मिस जेन मार्पल ही स्त्री गुप्तहेर पुढे आली व त्यापुढील ७५ कादंबऱ्यांमध्ये तीच रहस्ये सोडवत राहिली. Mousetrap [१९५२] हे तिचे नाटक पहिल्यांदा एका थिएटरमध्ये रंगमंचावर सतत २१ वर्षे चालले व त्याचे ८८६२ प्रयोग झाले. तर दुसऱ्या थिएटरमध्ये रंगमंचावर सतत २०२० सालापर्यंत चालू होते व त्याचे २८००० प्रयोग झाले. ‘And then There Were None’ यावर आधारित हिंदी सिनेमा ‘गुमनाम’ तुम्हाला नक्कीच माहिती असेल.

१९२० मध्ये आर्चिबाल्ड ख्रिस्ती या तिच्या नवऱ्याने घटस्फोट मागितला. तेव्हा ती नाहीशी झाली. यथावकाश ती सापडली व तिने १९३० मध्ये पुरातत्वशास्त्रज्ञ सर मॅक्स मॅलोवनशी लग्न केले. तिने अद्भुतरम्य कादंबऱ्याही लिहिल्या. उदाहरणार्थ, Absent in the Spring ही १९४४ मध्ये लिहिलेली कादंबरी.

तिच्या सहा गोष्टींचा अनुवाद प्रस्तुत पुस्तकात केला आहे.

THE ADVENTURE OF “THE WESTERN STAR”

# पाश्चिमात्य ताऱ्याचे साहस



## एक

पायरोच्या खिडकीत उभा राहून, मी खालील सुनसान रस्त्याकडे बघत होतो. मी दम टाकत अचानक म्हटले, “हे विचित्र आहे.”

पायरोने त्याच्या आरामदायी खुर्चीतून शांतपणे विचारले, “काय रे मित्रा, काय झाले?”

“पायरो, मी तुला काही गोष्टी सांगतो. त्यावरून तू अंदाज कर. फॅशनेबल टोपी, भले मोठे फर घातलेली व उत्तम कपडे केलेली एक श्रीमंत बाई इथे आहे. ती घरांकडे बघत सावकाश येते आहे. तिच्या नकळत तिच्यामागून तीन माणसे व एक मध्यमवयीन बाई अशी मंडळी चालली आहेत. मी आताच एका मुलाला नाटकी हावभाव करून, तिला सावध करायला पाठवले आहे. हे काय नाटक चालले आहे? ती मुलगी मूर्ख आहे का, आणि ते लोक गुप्तहेर असून तिला अटक करणार आहेत का? की ते फसवे, चोर लोक आहेत आणि तिच्यासारख्या निरागस मुलीवर हल्ला करण्याचा विचार करत आहेत? आमचा थोर गुप्तहेर काय म्हणतो आहे?”

माझा मित्र व थोर गुप्तहेराने, नेहमीप्रमाणे साधा मार्ग अवलंबला. तो बघण्यासाठी खिडकीत चढला.” आता आम्ही दोघे खिडकीतून बघू लागलो.

एका मिनिटात तो मनोरंजन झाल्यासारखा जोरात हसू लागला.

“नेहमीप्रमाणे तुझे म्हणणे, सुधारता न येणाऱ्या अद्भुतरम्यतेत शिरू बघते आहे. ही मिस मेरी मार्व्हेल, चित्रपट तारका आहे. तिच्यामागे तिला ओळखणाऱ्या तिच्या चाहत्यांचा घोळका आहे. आणि नाहक काहीही तर्क करणाऱ्या माझ्या प्रिय हेस्टीग्ज, ती हे जाणून आहे.”

मी हसलो.

“तर असे स्पष्टीकरण आहे! पण पायरो, याबद्दल तुला गुण मिळणार नाहीत कारण हे फक्त तू तिला ओळखत असल्याने झाले.”

“हे नैसर्गिक आहे. आणि माझ्या मित्रा, तू किती वेळा मेरी मार्व्हेलला पडद्यावर पाहिले आहेस?”

मी विचार केला, ‘कदाचित बारा वेळा.’

“आणि मी --- फक्त एकदा! तरीही मी तिला ओळखले आणि तू ओळखले नाहीस.”

मी क्षीणपणे बोललो, “ती वेगळी दिसते आहे.”

पायरो किंचाळला, “आहा! छान! तिने लंडनच्या रस्त्यांवर गुराखी मुलांसारखी टोपी घालून, अनवाणी व बटा पुढे आलेल्या आयरिश मुलीसारखे डुलत डुलत चालत जाण्याची अपेक्षा तू करत होतास का?

तुझे नेहमी असेच काहीतरी असते! तुला नर्तकी व्हॅलेरी सेंटक्लेअरची केस आठवते का?”

मी थोडे रागावून, खांदे शहारवले.

पायरो शांत होत म्हणाला, “पण मित्रा, तुझा राग आवर. मला चांगले माहिती आहे, सगळे काही हर्क्युल पायरो असत नाहीत.”

राग आणि मनोरंजन यामध्ये गोंधळून जाऊन, मी ओरडलो, “मला माहिती असलेल्या कुणाचेही तुझ्याबद्दलचे मत खरेच याहून चांगले नसेल.”

“तू काय करणार? जेव्हा कुणी एकमेव असते, आणि ते त्याला माहिती असते! आणि इतर लोक ते मत मानतात --- तरीही जर मी चुकत नसेन, तर ती मेरी मार्व्हेलच आहे.”

काय?”

“संशयातीतपणे, ती इकडे येते आहे.”

“हे तुला कसे कळले?”

“अगदी साधे आहे.माझ्या मित्रा, हा रस्ता काही मोठा प्रसिद्ध रस्ता नाही. इथे कुणी फॅशनेबल डॉक्टर, फॅशनेबल दंतवैद्य व त्याहून कमी म्हणजे फॅशनेबल लखपती रहात नाही. पण इथे आधुनिक फॅशनेबल गुप्तहेर रहातो. हो. माझ्या मित्रा, हे खरे आहे --- हे माझे सांगणे आहे की मी इथे प्रस्थ बनून राहिलो आहे. एकजण

दुसऱ्याला कुजबुजत म्हणतो, ‘तू तुझी सोन्याच्या पेन्सिलची केस हरला होतास, नाही का? तू त्या छोट्या बेल्जियनकडे जायला पाहिजेस. तो फार छान गुप्तहेर आहे.’ प्रत्येकजण हे म्हणतो. आणि दुसऱ्याला सांगतो, ‘जा त्याच्याकडे पळत सूट.’ मित्रा, सर्वात मूर्ख समस्या घेऊन, ते गटाने पोचतात. पण ते जाऊ दे. खालील घंटी वाजते आहे. ती मिस मार्व्हेल आहे.”

नेहमीप्रमाणे, पायरोचे बरोबर होते. काही वेळानंतर ती अमेरिकन सिनेमानटी आत आली. आम्ही उभे राहिलो. ती नक्कीच सिनेसृष्टीतील कीर्तिवान नट्यांपैकी होती. ती नुकतीच तिच्या नवऱ्याबरोबर, सिनेमानट असलेल्या ग्रेगरी बी रोल्फ बरोबर, इंग्लंडमध्ये आली होती. सुमारे वर्षापूर्वी त्यांचे लग्न अमेरिकेत झाले होते. आणि ते पहिल्यांदाच इंग्लंडला भेट देत होते. त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले होते. प्रत्येकजण तिच्यावरुन जीव ओवाळून टाकत होता. तिचे नवलपूर्ण कपडे, फर, दागिने आणि सर्वात आकर्षण म्हणजे तिचे सुंदर रत्न! तिच्या नावाला साजेच्या नावाचे, ‘पाश्चिमात्य तारा’! खरे खोटे काय माहित, पण त्याचा म्हणे पन्नास हजार पौंडांचा विमा उतरवलेला होता.

मी पायरोबरोबर आमच्या सुंदर अशीलाचे स्वागत केले, तेव्हा हे सर्व माझ्या मनात क्षणभरात झळकून गेले.

मिस मार्व्हेल छोटीशी व नाजूक होती, खूप गोरी, मुलीसारखी दिसणारी आणि निरागस, मोठ्या डोळ्यांची होती.

पायरोने तिला बसण्यासाठी खुर्ची पुढे केली. तिने लगेच बोलायला सुरवात केली.

"मिस्टर पायरो, तुम्ही कदाचित मला मूर्ख समजाल, पण उमराव क्रोनशा मला काल रात्री सांगत होते, की तुम्ही किती नवलपूर्ण रीतीने त्यांच्या पुतण्याच्या मृत्यूची केस, किती झटपट निकालात काढलीत. त्यामुळे मी ठरवले, की तुमचा सल्ला घ्यायचा. मी असे म्हणण्याचे धाडस करते, की ही फक्त फसवेगिरी आहे --- ग्रेगरी असे म्हणतो --- पण मला मरणांतिक दुःख होते."

ती क्षणभर श्वास घेण्यासाठी थांबली. पायरोने तिला उत्तेजन दिले. "बाईसाहेब, चालू ठेवा. तुम्हाला समजेल, की मी अजून अंधारात आहे."

तिच्या बॅगेतून काही पत्रे काढत व पायरोला देत, मिस मार्व्हेल बोलली, "ही पत्रे बघा."

पायरोने ती काळजीपूर्वक चालली. "ही स्वस्त कागदावर लिहिली आहेत --- नाव व पत्ता काळजीपूर्वक छापला आहे. आतमध्ये बघू या. त्याने कागद बाहेर काढला.

मी त्याच्या खांद्यावरुन वाकून बघत होतो. त्यात काळजीपूर्वक छापलेले एकच वाक्य होते. ते असे होतेः देवाचा डावा डोळा असलेला मोठा हिरा जिथून आला, तिथे तो परत करायलाच हवा.''

दुसरे पत्र साधारण असेच होते. पण तिसरे जास्त स्पष्ट होतेः

तुम्हाला असे बजावण्यात येते, की तुम्ही सांगितलेले ऐकले नाहीत. आता पौर्णिमेच्या रात्री, तुमच्याकडून हिरा घेण्यात येईल. ते देवाचे डोळे आहेत --- उजवा आणि डावा. हे लक्षात घ्या.''

मिस मार्व्हेलने स्पष्टीकरण देत म्हटले, ''पहिले पत्र विनोद म्हणून सोडून दिले गेले. जेव्हा दुसरे पत्र मिळाले, तेव्हा मला आश्चर्य वाटले. तिसरे काल आले. आता मला असे वाटते आहे, की शेवटी मला वाटले, त्यापेक्षा हे गंभीर प्रकरण दिसते आहे.''

''अस्स! ही पत्र पोस्टाने आली नाहीत का?''

''नाही. ती एका चिनी माणसाने आणून दिली. त्यामुळे मला भीती वाटते आहे.''

''का?''

''कारण सॅनफ्रँसिस्को येथील चिनी माणसाकडून ग्रेगरीने तो हिरा तीन वर्षांपूर्वी विकत घेतला होता.''

“अस्स! बाईसाहेब पण तुमचा विश्वास आहे का, की या हिऱ्याचे नाव –-- “

मिस मार्व्हेल म्हणाली, “‘पाश्चिमात्य तारा’. त्यावेळेस ग्रेगरीला आठवते, की त्या हिऱ्याशी संबंधित काही गोष्ट होती. पण त्या चिन्याने काही सांगितले नाही. ग्रेगरी म्हणतो, तो चिनी मरणांतिक घाबरलेला होता. मरणाच्या भीतीने तो हिरा विकून टाकायला उतावीळ झाला होता. त्याने फक्त खऱ्या किमतीच्या एक दशांश किमतीला तो विकला. गेगरीने मला तो लग्नाची भेट म्हणून दिला.”

पायरोने विचारपूर्वक मान हलवली.

“ही गोष्ट फार अविश्वसनीय वाटते. अद्भुतरम्य वाटते. आणि तरीही --- कोणाला माहिती? हेस्टीग्ज, मी तुला विनंती करतो, माझे छोटे कॅलेंडर मला दे.”

मी दिले.

पायरो पाने उलटत म्हणाला, “बघू या! पौर्णिमा कधी आहे? आहा, पुढच्या शुक्रवारी. म्हणजे अजून तीन दिवस आहेत, मित्रा. बाईसाहेब, तुम्ही माझे म्हणणे ऐका --- मी तुम्हाला ते सांगतो. ही आकर्षक गोष्ट म्हणजे विनोदी फसवणूक आहे --- पण कदाचित नसेलही. त्यामुळे मी तुम्हाला असा सल्ला देतो, की तुम्ही तो हिरा

पुढच्या शुक्रवारपर्यंत माझ्याकडे द्या. मग पुढे काय करायचे, ते ठरवू.”

त्या अभिनेत्रीच्या चेहऱ्यावर सावट दाटून आले. ती विरोध दर्शवत बोलली, “मला वाटते, ते शक्य नाही.”

“तुमच्याकडे आता तो आहे का?” पायरो तिचे सूक्ष्मपणे निरीक्षण करत होता.

त्या मुलीने थोडा वेळ हो नाही केले. आणि मग तिचा हात गाउनच्या छातीत घालून एक बारीक साखळी बाहेर काढली. ती तिचा हात उघडत, पुढे वाकली. तिच्या तळव्यात प्लॅटीनममध्ये बसवलेला, पांढरा चमकदार हिरा होता.

पायरो मोठ्याने श्वास सोडत व धक्का बसत पुटपुटला, “बाईसाहेब, तुम्ही मला तो हातात घ्यायची परवानगी देता का?” त्याने तो हातात घेतला व त्याची नीट परीक्षा केली.

नंतर थोडे वाकून तिला तो परत केला. “सुंदर, मोठा हिरा आहे --- त्यात काही खोट नाही. आहा, शंभर टक्के बॉम्ब आहे. आणि तो तुम्ही असा स्वतःजवळ बाळगता!”

“नाही. नाही, मिस्टर पायरो, खरे तर मी खूप काळजी घेते. नियमाप्रमाणे मी तो माझ्या हिऱ्याच्या पेटीत ठेऊन, हॉटेलच्या सुरक्षित लॉकरमध्ये ठेवते. तुम्हाला माहिती असेल, आम्ही

मॅग्निफीशंटमध्ये रहात आहोत. तुम्हाला बघण्यासाठी म्हणून मी आता तो बरोबर आणला आहे.”

“आणि तो तुम्ही माझ्याजवळ ठेवणार आहात, नाही का? पपा पायरोचा तुम्हाला तसा सल्ला आहे, बरोबर?”

“असे बघा, त्याचे खरे तर असे आहे, आम्ही शुक्रवारी उमराव व बाईसाहेब यार्डले यांच्याबरोबर काही दिवस घालवण्यासाठी यार्डले चेसला चाललो आहोत.”

तिच्या आवाजाच्या प्रतिध्वनीने माझ्या मनात एक धूसर आठवण जागी केली. ती काय होती बरं? काही वर्षांपूर्वी उमराव व बाईसाहेब यार्डले परदेशी गेले होते. अशी अफवा उठली, की उमराव काही मैत्रिणींच्या मदतीने सावकाश चालत बाहेर गेले --- पण नक्कीच त्यापेक्षा जास्त काहीतरी होते. यार्डले बाईसाहेबांचे नाव कॅलीफोर्नियाच्या सिनेमानटाबरोबर जोडले गेले होते का? माझ्या डोळ्यासमोर ते क्षणार्धात तरळून गेले --- तो ग्रेगरी बी रोल्फ सोडून, दुसरा कुणी नव्हता.

मिस मार्व्हेल पुढे म्हणाली, “मिस्टर पायरो, मी तुम्हाला एक गुपित सांगते. आमचे यार्डले उमरावांबरोबर ठरले होते, की त्यांच्या पूर्वापार असलेल्या मोठ्या इमारतीत एक सिनेमाचा खेळ दाखवायचा.”

मी रस घेत ओरडलो, “यार्डले चेसमध्ये का? ती इंग्लंडमधील सिनेमांचे खेळ दाखवायची जागा आहे.”

मिस मार्व्हेलने मान हलवली.

“मला वाटते, तो यार्डलेकडील जुना पण खरा हिरा आहे. पण त्याला खूपच जास्त किंमतीला तो विकायचा आहे. आणि अर्थात मला अजून माहिती नाही, की हा सौदा होईल, की नाही. पण ग्रेगरीला आणि मला नेहमी व्यवहार आणि आनंद एकत्र करायला आवडतो.”

“पण --- बाईसाहेब, मला समजले नाही. पुन्हा सांगा. नक्कीच, हिरा बरोबर न घेता यार्डले प्लेसला भेटायला जाणे शक्य आहे, नाही का?”

मिस मार्व्हेलच्या मुलासारख्या न दिसणाऱ्या डोळयातून एक कडक गर्विष्ठ कटाक्ष आला. ती एकदम बरीच म्हातारी दिसू लागली.

“मला तो तिथे गळयात घालायचा आहे.”

मी अचानक म्हणालो, “नक्कीच, यार्डले यांच्याकडील संग्रहात, काही खूप प्रसिद्ध हिरे आहेत आणि त्यात एक खूप मोठा हिरादेखील आहे, नाही का?”

मिस मार्व्हेल थोडक्यात म्हणाली, “हो, खरे आहे.”

मी पायरोला तोंडातल्या तोंडात पुटपुटतांना ऐकले, “आहा, हे चांगले नाही आणि वाईटही नाही.” मग तो मोठ्याने त्याच्या नेहमीच्या बरोबर नेम साधणाऱ्या विचित्र नशीबाने [तो त्याला मानसशास्त्राचे नाव देतो.] बोलला, “मग संशयातीतपणे तुमची किंवा तुमच्या नवऱ्याची यार्डले बाईसाहेबांशी आधीच ओळख झाली असली पाहिजे, नाही का?”

मिस मार्व्हेल म्हणाली, “तीन वर्षांपूर्वी ग्रेगरी अमेरिकेला गेला होता, तेव्हापासून त्याला ते माहिती आहेत.” आणि अचानक पुढे बोलली, “तुमच्यापैकी कोणी कधी ‘गावगप्पा’ वाचता का?”

आमची तोंडे लज्जित होऊन, आम्हाला अपराधी वाटू लागले.

ती उद्गारली, “मी विचारते, कारण या आठवड्यात प्रसिद्ध हिऱ्यांवर एक लेख छापून आला आहे. आणि तो खरेच उत्कंठावर्धक आहे.”

मी उठून खोलीच्या दुसऱ्या बाजूला असलेल्या टेबलाशी गेलो आणि ते वर्तमानपत्र हातात घेऊन आलो. तिने ते माझ्याकडून घेतले. तो लेख शोधला व ती तो मोठ्याने वाचू लागली.

“--- इतर प्रसिद्ध हिऱ्यांमध्ये, यार्डले कुटुंबाकडील, ‘पूर्वेकडचा तारा’देखील मिळवायला हरकत नाही. आताच्या चालू

उमरावाच्या पूर्वजाने तो चीनहून आणला आणि अद्भुतरम्य गोष्ट अशी आहे, की हा हिरा प्रथम देवळातील देवाचा उजवा डोळा होता. असाच त्याच आकाराचा व मापाचा दुसरा हिरा हा त्या देवाचा डावा डोळा होता. काही दिवसात हा देखील देवाच्या मूर्तीवरून चोरला गेला. एक डोळा पश्चिमेकडे गेला व एक पूर्वेकडे गेला. दोन्ही एकत्र आले नाहीत. मग विजय मिळाल्यावर ते परत ते देवाच्या चरणी रुजू होतील."

आता या वर्णनाशी मिळताजुळता हिरा इथे 'पश्चिमेचा तारा' म्हणून ओळखला जातो आहे. तो चमचमती सिनेअभिनेत्री मिस मार्व्हेलच्या ताब्यात आहे. या दोन हिऱ्यांची तुलना करणे रुचीपूर्ण असेल."

ती थांबली.

पायरो पुटपुटला, "हे धक्कादायक आहे. निःसंशय हे फारच अद्भुतरम्य आहे." मेरी मार्व्हेलकडे वळून, तो म्हणाला, "आणि बाईसाहेब, तुम्ही घाबरत नाही का? तुम्हाला अंधश्रद्धायुक्त भीती वाटत नाही का? तुम्हाला या सयामी जुळ्यांची गाठ घालून द्यावीशी वाटत नाही का? नाहीतर घाईघाईने एखादा चिनी माणूस येईल आणि ते दोन्ही हिसकावून घेऊन चीनला परत जाईल, असे वाटत नाही का?"

त्याचा आवाजाचा सूर फसवा होता. पण मला वाटले त्यामागे गंभीरपणा होता.

मिस मार्व्हेल म्हणाली, “माझा विश्वास नाही, की यार्डले बाईसाहेबांचा हिरा माझ्या हिऱ्याइतका चांगला असेल. पण तसेही मी तो बघणार आहेच.”

पायरो अजून काय बोलला, मला माहिती नाही. कारण त्या क्षणी दार सताड उघडले जाऊन, एक छाप पडेल असा मनुष्य खोलीत अवतीर्ण झाला. त्याच्या कुरळ्या, काळ्या केसांपासून ते चामड्याच्या बुटांपर्यंत, तो देखणा नायक वाटत होता.

ग्रेगरी रोल्फ म्हणाला, “मेरी, मी तुला मी येईन असे म्हणालो होतो, त्याप्रमाणे मी आलो आहे. तर मग मिस्टर पायरो आपल्या लहानशा समस्येबद्दल काय म्हणत आहेत? माझ्यासारखेच फक्त ‘एक हसरी फसवणूक’ असे म्हणत आहेत का?”

पायरो त्या मोठ्या अभिनेत्याकडे बघून हसला. त्यांच्यात फारच फरक होता. तो कोरडेपणे बोलला, “मिस्टर रोल्फ, फसवणूक किंवा फसवणूक नाही. मी बाईसाहेबांना असा सल्ला दिला आहे, की त्यांनी हिरा शुक्रवारी त्यांच्याबरोबर यार्डले चेसला नेऊ नये.”

“सर, मी तिथे तुमच्याबरोबर आहे. मी मेरीला आधीच म्हटले आहे. पण काय सांगू, ती पक्की बाई आहे आणि मला वाटते, हिऱ्याच्या बाबतीत तिच्यापेक्षा जास्त कुणी चमकावे, हे तिला सहन होणारे नाही.”

मेरी कडकपणे म्हणाली, “ग्रेगरी काय बोलतो आहेस?” पण ती रागाने लाजली.

पायरोने त्याचे खांदे शहारवले.

“बाईसाहेब, मी सल्ला द्यायचे काम केले. मी अजून काही करू शकत नाही. आता बास झाले.”

त्याने दोघांना दाराकडे जाताना, वाकून अभिवादन केले.

त्याने परतताना निरीक्षण केले, “आहा! ला ला, स्त्रियांमधील अहमहमिका! चांगला नवरा! त्याने परिस्थिती बरोबर सांगितली तथापि सर्व आहे तसेच! तो युक्तीबाजपणे, बायकोला हिऱ्यापासून परावृत्त करू शकला नाही.”

“मी त्याला उगीच आठवण करून दिली आणि त्याने जोरजोराने मान हलवली.”

“मी असा विचार केला. या सगळयामागे काही वेगळे आहे. माझ्या मित्रा, तुझ्या परवानगीने, मी थोडा मोकळ्या हवेवर फिरतो.

मी तुला विनंती करतो, माझी वाट बघ. मी फार वेळ लावणार नाही.”

मी माझ्या खुर्चीत अर्धवट झोपेत होतो. तेव्हा घरमालकिणीने दारावर टकटक करुन तिचे डोके आत घातले.

“सर, मिस्टर पायरोना भेटायला एक दुसरी बाई आली आहे. मी तिला सांगितले, ते बाहेर गेले आहेत, पण ती म्हणाली, मी थांबते. असे दिसते आहे, की ती गावाकडून आली आहे.”

“ओहो, मिसेस मुर्चिनसन, तिला पाठवा. कदाचित मी तिच्यासाठी काही करू शकेन.”

दुसऱ्याच क्षणी ती बाई आत आली. तिला ओळखून माझे हृदय उसळी घेऊ लागले. यार्डले बाईसाहेबांचे चित्र खूप वेळा वर्तमानपत्रात छापून आलेले होते. पण तिला आपण ओळखले नाही, असेच भासवावे.

मी खुर्ची पुढे करत म्हणालो, “माझा मित्र पायरो बाहेर गेला आहे. पण मला माहिती आहे, तो लवकरच परत येईल.”

तिने माझे आभार मानले व बसली. ती मिस मार्व्हेलपेक्षा वेगळ्या प्रकारची होती. उंच, काळी, चमकते डोळे असलेली आणि फिकट अभिमानी चेहरा --- तरीही तोंडाच्या वक्राकार रेषांमधून ती बुद्धिमान असल्याचे प्रतीत होणारी!

आल्या प्रसंगाला तोंड द्यायची माझी इच्छा उफाळून आली. का नाही? पायरोसमोर मला नेहमी अडचण जाणवते --- मी तेव्हा माझ्यातला उत्तम नसतो. आणि तरीही, यात काही संशय नव्हता, की माझ्यातही काही अंशी उद्गामी तर्कपद्धतीची जाण ती. मी काही सहजप्रवृत्तीने, अचानक पुढे झालो.

मी म्हणालो, “यार्डले बाईसाहेब, तुम्ही इथे का आलात ते मला माहिती आहे. तुम्हाला हिऱ्याबद्दल ब्लॅकमेल करणारी पत्रे आली आहेत.”

माझा टोला बरोबर बसला, यात काही संशय नव्हता. ती माझ्याकडे अवाक् होऊन पाहू लागली. तिच्या गालांवर सर्व रंग झळकून गेले.

ती धापा टाकत बोलली, “तुम्हाला माहिती आहे? कसे काय?”

मी हसलो.

“अगदी तर्कशुद्ध पद्धतीने. जर मिस मार्व्हेल यांना धमकीची पत्रे आली आहेत. तर --- “

“मिस मार्व्हेल इथे आहे का?”

“त्या आताच गेल्या. मी असे म्हणत होतो, जर दोन सयामी जुळ्यांपैकी एक हिरा त्यांच्याकडे असल्यामुळे जर त्यांना

धमक्यांची पत्रे येत असतील, आणि तुमच्याकडे त्या जोडीतील दुसरा हिरा असेल, तर तुम्हालाही तशी पत्रे आली असणार. हे किती साधे आहे, बघा. माझे बरोबर आहे. तुम्हालाही अशी विचित्र पत्रे आली असणार.”

क्षणभर ती काही बोलली नाही. जणू तिला वाटत होते, माझ्यावर विश्वास ठेवावा की नाही. नंतर तिने थोडे वाकून, हसून होकारार्थी मान हलवली.

“तिने दुजोरा दिला, “ते तसे आहे.”

“तुम्हालाही चिनी माणसाकडून पत्रे आली होती का?”

“नाही. ती पोस्टाने आली. पण मला सांगा, मिस मार्व्हेलला देखील माझ्यासारखाच अनुभव आला का?”

“मी त्यांना सकाळी ऐकलेल्या घटना सांगितल्या. तिने त्या लक्षपूर्वक ऐकल्या.

“हे बरोबर जमते आहे. मला मिळालेली पत्रे अगदी तिच्यासारखीच आहेत. ती पोस्टाने आली, ही गोष्ट खरी आहे, पण त्याच्यात एक अंतर्गत सुगंध आहे --- उदबत्त्यांसारखा ---त्यामुळे मला लगेच पूर्वेकडील आठवण आली. या सगळ्याचा काय अर्थ आहे?”

मी डोके हलवले.

“तेच मला शोधून काढायचे आहे. तुम्ही तुमची पत्रे आणली आहेत का? आम्हाला पोस्टाच्या शिक्क्यावरून काही पत्ता लागेल.”

“दुर्दैवाने मी ती नष्ट केली. तुम्हाला समजेल, त्यावेळेस मला तो काही मूर्ख विनोद वाटला होता. काही चिनी टोळ्या ते हिरे मिळवायचा प्रयत्न करत असतील का? पण ते अविश्वसनीय वाटते.”

आम्ही परत परत सगळ्या बाबी तपासून बघितल्या. पण गूढ उकलायला त्याची काही मदत झाली नाही. शेवटी यार्डले बाईसाहेब उठल्या.

“मला वाटते, मिस्टर पायरोंसाठी थांबायची काही गरज नाही. तुम्ही त्यांना हे सर्व सांगू शकता, नाही का? मी तुमची आभारी आहे, मिस्टर --- “

अडखळत, तिने हात पुढे केला.

“कॅप्टन हेस्टीग्ज.”

“अर्थात! मी किती मूर्ख आहे तुम्ही कॅव्हेंडिश मंडळींचे मित्र आहात. मला मेरी कॅव्हेंडिशने पायरोकडे पाठवले आहे.”

जेव्हा माझा मित्र परतला, मी त्याला तो नसतांना काय झाले, हे सांगण्यात आनंद घेतला. त्याने आमच्या संभाषणाची कडक

उलटतपासणी घेतली. आणि माझ्या लक्षात आले, तो इथे नसल्यामुळे जरासा खट्टू झाला होता. मला असे वाटले की त्या माझ्या आवडता म्हाताऱ्याला थोडा हेवाही वाटला. मला कमी क्षमतेचा समजायचे त्याचे जे सततचे धोरण होते, त्याला अनुसरून यात काहीच टीका करायला न सापडल्याने, तो चिडला. मी खरे तर माझ्यावर खूष झालो पण तो अजून रागावेल, म्हणून मी ते दिसू दिले नाही. त्याची वागण्याची पद्धत मला न आवडणारी असली, तरी मी माझ्या छोट्याशा, आकर्षकपणे वेगळ्या असलेल्या मित्राच्या खूप जवळचा होतो. शेवटी चेहऱ्यावर चौकस भाव घेऊन तो बोलला, "छान! आपला बेत आकार घेतो आहे. मी तुला विनंती करतो, त्या मांडणीच्या सर्वात वरच्या कप्प्यात असलेली माझ्या वर्गमित्रांची माहितीपुस्तिका दे. तो पाने उलटतांना थबकून म्हणाला, "हे बघ, यार्डले --- १० वा उमराव --- दक्षिण आफ्रिकेतील लढाई लढलेला --- महत्वाचा दलाल --- मार्च १९०७ --- मॉड स्टॉपरटॉन, तिसरा बॅरॉन कॉटेरील याची चौथी मुलगी, तिच्याशी लग्न --- ओहो, हो, हो --- दोन मुली, जन्म १९०८, १९१० असे आहे. उद्या आपण या उमरावाला भेटू."

"काय?"

"हो. मी त्याला फोन केला आहे."

“मला वाटले, तू ही केस सोडून दिलीस?”

“मी मिस मार्व्हेलसाठी काम करत नाही, कारण तिने माझे सांगणे धुडकावून लावले. आता मी जे काही करेन, ते माझ्या, हर्क्युल पायरोच्या समाधानासाठी असेल. नक्कीच मला ही केस सोडवली पाहिजे.”

“आणि तू सरळ उमराव यार्डलेला तुझ्या सोयीसाठी इथे बोलावून घेतलेस? त्याला ते आवडणार नाही.”

“मी त्याचा कौटुंबिक हिरा राखू शकलो, तर तो नेहमीच माझा ऋणी राहील.”

मी उत्सुकतेने विचारले, “म्हणजे तुला खरेच असे वाटते आहे का, की हिरा चोरीला जाण्याची शक्यता आहे?”

पायरो थंडपणे म्हणाला, “शंभर टक्के! सगळे निर्देश तसेच आहेत.”

“पण कसे काय?”

पायरोने माझे उत्सुक प्रश्न थांबवले. आपण आपली मने गोंधळवून टाकायला नको. आणि ती माहितीपुस्तिका बघ --- तू त्याची जागा कशी काय बदललीस? हेस्टींग्ज, मी तुला नेहमी सांगतो, एकदम वरच्या कप्प्यातील उंच पुस्तक तुला दिसते आहे

का --- त्यापुढील उंच पुस्तक आणि --- असेच. तर असा क्रम आहे --- "

"मी घाईने बोललो, "तेच तर" आणि परत ते पुस्तक जागेवर ठेऊन दिले.

## दोन

उमराव यार्डले मोठ्या आवाजाचा, आनंदी व खेळाडू स्वभावाचा होता. तो लाल चेहऱ्याचा असून, मैत्रीपूर्ण होता. हे फार आकर्षक असल्यामुळे त्याचे चंचल मन लपले जात होते. "मिस्टर पायरो, हा अव्यापारेषु व्यापार आहे. त्याचा काहीच आगापिछा समजत नाही आहे. माझ्या बायकोला विचित्र पत्रे येत आहेत. आणि मिस मार्व्हेलला देखील तशीच पत्रे येत आहेत. या सर्वांचा काय अर्थ आहे?"

'गावगप्पा' मधील लेखाचा कागद पायरोने त्याला दिला.

"प्रथम मी तुम्हाला असे विचारतो, की हे सर्व खरे आहे का?"

"लोक असे बोलतात."

तो वाचल्यावर त्याचा चेहरा रागाने लाल झाला.

तो ओरडला, “हा काय मूर्खपणा आहे! त्या हिऱ्याशी संबंधित अशी काही अद्भुतरम्य गोष्ट नव्हती. माझा विश्वास आहे, तो मुळात भारतातून आला. हे चिनी देवाचे काय नाटक आहे, मला माहिती नाही.”

तरीही तो हिरा ‘पूर्वेचा तारा’ म्हणून ओळखला जातो.”

तो म्हणाला, “ठीक आहे. जात असेल, पण त्याचे काय?”

पायरो थोडा हसला. पण सरळ उत्तर दिले नाही. “मी असे विचारतो, की तुम्ही तुम्हाला माझ्या हातात सोपवाल का? जर तुम्ही असे मान्य केले, तर मला संकटमय परिस्थिती हाताळता येईल.”

“म्हणजे तुम्हाला असे म्हणायचे आहे का, की या राक्षसी गोष्टीत तथ्य आहे?”

“मी तुम्हाला सांगेन, तसे तुम्ही कराल का?”

“अर्थात, मी करेन. पण --- “

“मग मला तुम्हाला काही प्रश्न विचारायची परवानगी द्या. हे यार्डले चेसचे प्रकरण, तुम्ही म्हणता तसे, तुमच्यात आणि मिस्टर रोल्फमधील आहे?”

“ओहो, त्याने तुम्हाला तसे सांगितले नाही का? नाही. तसे काही नाही.” तो कां कू करू लागला. त्याचा चेहरा अजूनच लाल

होत गेला. "मिस्टर पायरो, मी हे सगळे सरळ करून सांगतो. मी पुष्कळ बाबतीत मूर्खपणा केलेला आहे. मला पुष्कळ कर्ज आहे --- पण मला यातून बाहेर पडायचे आहे. मला मुले आवडतात. मला सगळे सुरळीत करायचे आहे व मला यार्डले प्लेसमध्ये रहायचे आहे. ग्रेगरी रोल्फ मला खूप पैसे देतो आहे --- मला परत माझ्या पायावर उभे रहाता येईल. मला हे सिनेमाचे खेळ करायचे नाहीत --- मला यार्डले प्लेसमध्ये नटनट्यांची गर्दी नको आहे. पण मला ती हवी असू शकेल, जर --- " तो बोलायचा थांबला.

पायरोने त्याच्याकडे नीट बघितले. "मग तुम्हाला अजून काही करायची संधी आहे. काय ते मला सांगायची संधी द्याल का? ते म्हणजे 'पूर्वेकडील तारा' विकणे आहे?

उमराव यार्डलेने मान डोलावली. "बरोबर असेच. हे आमच्या घराण्यात काही पिढ्या आहे. पण ते महत्वाचे नाही. कारण जगात वस्तू विकत घेणारे शोधणे सोपे नाही. होफबर्ग, हॅटॉनचा माळी हा संभाव्य गिऱ्हाईकाच्या शोधात आहे. पण त्याला तो लवकर शोधावा लागेल. नाहीतर त्याचे प्रयत्न वाया जातील."

"माफ करा, पण अजून एक प्रश्न --- यार्डले बाईसाहेबांनी कुठला बेत मंजूर केला?"

“ओहो, तिने कडवटपणे माझ्या हिरा विकायच्या बेताला विरोध केला. तुम्हाला माहिती असेल, बायका कशा असतात. ती या फिल्मबाजीला बळी पडलेली आहे.”

पायरो बोलला, “मी समजू शकतो.” त्याने एकदोन मिनिटे विचार केला. मग पटकन उठून उभा राहिला. “तुम्ही यार्डले चेसला लगेच जाणार आहात का? ठीक आहे, कुणाला काही बोलू नका --- कुणालाही नाही. लक्षात ठेवा. आज संध्याकाळी पाचनंतर आम्ही तिथे येऊ.”

“ठीक आहे. पण मला नाही वाटत --- “

पायरो दयाळूपणे बोलला, “त्याचे एवढे काही नाही. तुम्ही हे धरून चाला, की मी तुमच्या हिरा सांभाळेन, तुम्ही नाही.”

“हो, पण --- “

“मग मी सांगतो, तसे करा.”

उदास होऊन घाबरलेला उमराव खोलीतून निघून गेला.

## तीन

आम्ही यार्डले चेसला पोचलो, तेव्हा साडेपाच झाले होते. स्वयंपाक्याने आम्हाला काचेची तावदाने असलेल्या व

शेकोटीतील लाकडे धगधगत असणाऱ्या जुन्या हॉलमध्ये नेले. आम्हाला एक छान चित्र दिसले. यार्डले बाईसाहेब आणि दोन मुले. आईचे अभिमानी गडद काळे डोके दोन गोऱ्या मुलांवर वाकलेले होते. उमराव यार्डले त्यांच्याकडे हसत बघत जवळ उभा होता.

स्वयंपाक्याने जाहीर केले, "मिस्टर पायरो आणि कॅप्टन हेस्टीग्ज."

यार्डले बाईसाहेबांनी चमकून त्यांच्याकडे पाहिले. त्यांचा नवरा आनिश्चितपणे पुढे आला. त्याचे डोळे पायरोच्या सूचनेची वाट बघत होते. छोटा माणूस या प्रसंगासाठी तयार होता.

"मला माफ करा. मी अजून मिस मार्व्हेलच्या प्रकरणात शोध घेतो आहे. त्या इथे शुक्रवारी येणार होत्या, बरोबर? मी पहिल्यांदा थोडे फिरून खात्री करतो, की सर्व काही सुरक्षित आहे. शिवाय मला यार्डले बाईसाहेबांना विचारायचे आहे, की त्याना आलेल्या पत्रांवरील शिक्क्यांच्या खुणा त्याना आठवल्या का?"

यार्डले बाईसाहेबांनी पश्चात्तापाने मान हलवली. "नाही मला आठवत नाही. हा माझा मूर्खपणा आहे. पण ते गंभीरपणे घ्यावे, असे मला कधी वाटलेच नाही."

उमराव यार्डलेने विचारले, "तुम्ही रात्री इथे रहाणार का?"

“ओहो, तुमची अडचण होणार असेल, तर आम्ही आमच्या बॅगा खानावळीत ठेवल्या आहेत.”

उमराव यार्डलेने त्याचे मत दिले, “ते ठीक आहे. मी कोणाला तरी सामान आणायला पाठवतो. नाही. नाही. काही त्रास नाही. अगदी नक्की.”

पायरो त्यासाठी तयार झाला व यार्डले बाईसाहेबांजवळ बसून मुलांशी गप्पा मारू लागला. थोड्याच वेळात ते छानपैकी मस्ती करू लागले आणि त्यांनी मलाही खेळात ओढले.

पायरो अदबशीरपणे थोडा वाकून बोलला, “तुम्ही देखणे आहात.” तेवढ्यात एका कडक दाईने मुलांना ओढून नेले.

यार्डले बाईसाहेबांनी त्यांचे विस्कटलेले केस सारखे केले.

थोडा दम घेत त्या म्हणाल्या, “मुले माझी आवडती आहेत.”

“आणि त्याच कारणाने --- तुम्ही त्यांच्या!” पायरो पुन्हा वाकला.

घंटी वाजली. आम्ही आमच्या खोलीत जाण्यासाठी उठलो. त्याच वेळी एका ट्रेमध्ये तार घेऊन स्वयंपाकी अवतरला. त्याने ती तार उमराव यार्डलेंच्या पुढे केली. त्याने ती माफी मागत, उघडून वाचली. वाचल्यावर तो एकदम आखडल्यासारखा कडक झाला.

त्याने ताठरल्यासारखे होऊन, त्याच्या बायकोच्या हातात तार दिली. मग त्याने माझ्या मित्राकडे पाहिले.

“मिस्टर पायरो, एक मिनिट, मला वाटते, याबद्दल तुम्हाला माहिती असायला हवे. ती हॉफबर्गहून आली आहे. आमच्या हिऱ्याला गिऱ्हाईक मिळाले, असे त्याला वाटते आहे --- एक अमेरिकन, तो उद्या बोटीने निघतो आहे. ते आज एका माणसाला हिऱ्याच्या परीक्षेसाठी पाठवत आहेत. देवाच्या कृपेने हा व्यवहार पक्का झाला तर --- “ त्याचे शब्द भारावले.

यार्डले बाईसाहेब निघून गेल्या. अजून त्यांच्या हातात तार धरलेली होती.

त्या खालच्या आवाजात म्हणाल्या, ‘जॉर्ज, माझी इच्छा आहे की तू तो विकू नयेस. आपल्या कुटुंबात तो एवढी वर्षे आहे.” ती जणू उत्तराची वाट बघत थांबली. पण जेव्हा काही उत्तर मिळाले नाही, तेव्हा तिच्या चेहरा उतरला. तिने खांदे घुसळवत म्हटले, “मला जाऊन कपडे केले पाहिजेत. मला वाटते, मी तुम्हाला तो ‘ऐवज’ दाखवलेला बरा.” ती पायरोकडे थोड्या वाकड्या चेहऱ्याने वळली व गळयातले नेकलेस दाखवत म्हणाली, “हे एक सर्वात कुरूप नेकलेस आहे. जॉर्जने मला वचन दिले होते, त्यात

आपण हिरे बसवून घेऊ. पण ते कधी झाले नाही.” त्या खोलीतून निघून गेल्या.

अर्ध्या तासाने, आम्ही तिघे मोठ्या हॉलमध्ये जमून बाईसाहेबांची वाट बघत होतो. जेवणाची वेळ होऊन काही मिनिटे झाली होती.

अचानक वस्त्रांची सळसळ आली व बाईसाहेब चमचमत्या लांब पांढऱ्या ड्रेसमध्ये दारात येऊन उभ्या राहिल्या. त्यांच्या गळयात आगीसारखे नेकलेस होते. एक हात त्यावर ठेऊन, त्या उभ्या होत्या.

त्या आनंदाने बोलल्या, “बळीला बघा.” त्यांचा वाईट विनोद संपलेला वाटला. “मी मोठा उजेड पाडेपर्यंत थांबा. मग तुमच्या डोळयांना इंग्लंडमधील सर्वात कुरूप नेकलेसची मेजवानी द्या.” दिव्यांची बटणे दारामागे होती. जसा तिने ती लावण्यासाठी हात ताणला, तेव्हा अविश्वसनीय अशी एक अशक्य गोष्ट घडली. अचानक, काही सूचना न देता, प्रत्येक दिवा मालवला गेला, दार वाजले आणि दुसऱ्या बाजूने, एका बाईची लांबलचक, भेदक किंकाळी ऐकू आली.

उमराव यार्डले ओरडले, “अरे देवा! हा माउडेचा आवाज आहे. काय झाले?”

आम्ही झटपट दाराकडे धावलो. आम्हाला दिव्याची बटणे सापडण्यापूर्वी, अंधारात एकमेकांच्या अंगावर आम्ही आपटत होतो. आमच्या डोळयांना काय दिसले? संगमरवरी फरशीवर यार्डले बाईसाहेब निपचित पडल्या होत्या. त्यांच्या गोऱ्या गळयावर जिथे नेकलेस होते, तिथे जांभळट खुणा होत्या.

आम्ही तिच्यावर वाकलो, क्षणभर ती जिवंत आहे, की मेली आहे ते आम्हाला समजत नव्हते, पण तिच्या पापण्या उघडल्या.

ती मोठ्या मुश्किलीने बोलली, “चिनी माणूस --- बाजूचे दार.”

उमराव यार्डले शपथ घेत धावला. मी त्याच्याबरोबर गेलो. माझे हृदय धडधडत होते .पुन्हा चिनी माणूस! ते बाजूच्या भिंतीतले दार लहान होते. जिथे ही शोकांतिका घडली, तिथपासून, फार तर बारा यार्डावर असेल. आम्ही दाराशी पोचलो, तेव्हा मी जोरात ओरडलो. आमच्यापासून उंबरठ्याच्या अलीकडे, ते चमचमते नेकलेस पडले होते. चोराने पळतांना घाबरून, ते टाकलेले दिसत होते. मी आनंदाने त्यावर पकड घेतली. मग मी दुसरी किंकाळी मारली. त्याचा जणू प्रतिध्वनी असल्यासारखा, उमराव यार्डलेदेखील किंचाळला. नेकलेसच्यामध्ये मोठी फट होती. ‘पूर्वेचा तारा’ गायब होता!

मी निःश्वास टाकत बोललो, “हे संपले तर! हे काही सामान्य चोर नव्हते. त्याना फक्त हा हिरा हवा होता.”

“पण तो चोर आत कसा आला?”

“या दारातून.”

“पण ते तर नेहमी कुलुपबंद असते.”

मी डोके हलवले. आता ते कुलुपबंद नाही. बघा.” असे बोलतांना मी ते उघडले.

मी असे करताच जमिनीवर काहीतरी फडफडले. मी ते उचलले. तो एक रेशमी तुकडा होता. आणि त्यावरील भरतकाम ठळक दिसत होते. तो चिनी माणसाच्या अंगरख्यातून फाडला गेला होता. “घाईघाईत तो दारात अडकून फाटला असावा.” मी स्पष्ट केले. “घाई करा. तो अजून फार लांब गेला नसेल.”

पण आमचा शोध फुकट गेला. रात्रीच्या गडद अंधारात, चोराला पळून जायला सोपे गेले असणार. नाईलाजाने आम्ही घरात परतलो. उमराव यार्डलेने एका माणसाला पोलिसांना आणण्यास पाठवले.

यार्डले बाईसाहेबांकडे पायरोने जातीने लक्ष दिले. अशा बाबतीत तो बायकांइतका चांगला होता. ती पुरेशी बरी होऊन काय घडले, ते सांगू शकली.

ती म्हणाली, “मी दुसरा दिवा लावणार, तोच एका माणसाने माझ्या अंगावर मागून झडप घातली. त्याने गळयातून माझे नेकलेस इतक्या जोराने खेचले, की मी जमिनीवर आडवी पडले. पडल्या पडल्या मी त्याला कडेच्या दारातून निसटताना पाहिले. त्याचा भरतकाम केलेला अंगरखा व डुकराच्या शेपटीसारखी शेंडी बघून, मी तो चिनी असल्याचे ओळखले.” ती शहारा देत थांबली.

स्वयंपाकी परत आला. तो हळू आवाजात उमराव यार्डलेना म्हणाला, “सर, हॉफबर्गहून एक माणूस आला आहे. तो म्हणतो आहे, तुम्ही त्याची वाट बघत असणार.”

ती हादरलेला उमराव बोलला, “अरे बापरे, मला वाटते, मी त्याला भेटले पाहिजे. नाही. इथे नाही. म्युलिंग, वाचनालयात.”

मी पायरोला बाजूला घेतले. :हे बघ, माझ्या आवडत्या माणसा, आपण इथून निघून लंडनला गेलेले बरे नाही का?”

“हेस्टीग्ज, तुला असे का वाटते?”

मी थोडा खोकत म्हणालो, “कारण फार चांगल्या तऱ्हेने गोष्टी चाललेल्या नाहीत, नाही का? म्हणजे मला असे म्हणायचे आहे, तू उमरावाला स्वतःला तुझ्या हवाली करायला सांगतोस आणि मग सर्व काही ठीक होईल असे वाटत असतांना --- हिरा तुझ्या डोळयादेखत पळवला जातो!”

पायरो म्हणाला, “खरे आहे. हा माझा एक धक्कादायक विजय नव्हता.”

अशा तऱ्हेने घटनांचे वर्णन ऐकून मला हसू आले. पण मी ते दाबले.

तर असे --- माझे म्हणणे मांडून --- त्यापेक्षा घोटाळा करून ठेऊन --- येथून ताबडतोब निघून जाणे, जास्त चांगले राहील, असे तुला वाटत नाही का?”

“आणि उमराव यार्डलेच्या स्वयंपाक्याने उत्तम बनवलेल्या जेवणाचे काय?”

मी अधीरपणे बोललो, “ओहो, कसले जेवण?”

पायरोने त्याचे हात भयानकपणे हवेत उडवले. “अरे देवा! या देशात गुन्हेगाराकडे दुर्लक्ष करून, छानछोकीचे जेवण बनवले जाते!”

मी चालू ठेवले, “आपण लंडनला लवकरात लवकर जाण्याचे अजून एक कारण आहे.”

“माझ्या मित्रा, ते काय आहे?”

मी खालच्या आवाजात म्हणालो, “दुसरा हिरा. मिस मार्व्हेलचा.”

'अरे मित्रा, त्याचे काय?"

"तुला कळत नाही का? त्याचा नेहमीची चीड आणणारी सावकाशी मला राग आणत होती. त्याच्या नेहमीच्या धारदार शहाणपणाला काय झाले? "त्याना एक हिरा मिळाला. आत ते दुसऱ्याच्या मागे असणार."

मला मागे खेचत व माझी स्तुती करत, पायरो किंचाळला, "धीर धर. पण माझ्या मित्रा, तुझे डोके पुढे धावते आहे. क्षणभर असा विचार कर, की मी तसा विचार केला नाही. पण अजून भरपूर वेळ आहे. शुक्रवारपर्यंत पौर्णिमा काही येणार नाही."

मी माझे डोके संशयाने हलवले. या पौर्णिमेच्या कल्पनेने मला पूर्णपणे थंड पाडले. शेवटी पायरोला पटले व आम्ही तेथून निघालो. उमराव यार्डलेला स्पष्टीकरणाची व दिलगिरीची एक चिठ्ठी मागे ठेवली.

मला असे वाटत होते, की ताबडतोब मॅग्नीफिशन्टला जाऊन, मिस मार्व्हेलला काय घडले, ते सांगावे. पण पायरोने बेत बदलला, आणि असा आग्रह धरला, की सकाळी निघावे.

पुरे झाले. मी नाईलाजाने तयार झालो.

सकाळी पायरो विचित्रपणे निघायचे नाव घेत नव्हता. मला संशय येऊ लागला, की निघायला उशीर केल्यास, तो वाईट रीत्या

या केसमध्ये पुढे न जाता अडकून बसेल. माझ्या विनवणीला त्याने स्तुतीपर साधारण मताने सांगितले, की काल यार्डले स्पेस इथे घडलेल्या घटनेचा वृत्तांत आज सकाळच्या वर्तमानपत्रात आला आहे. त्यामुळे आपण जेवढे सांगू ते सगळे रोल्फला कळेलच. मी कसाबसा होकार भरला.

अशा घटना घडल्या, की मी सांगत असलेलेच योग्य ठरले. साधारण दोन वाजता, फोन वाजला. पायरोने तो घेतला. थोडा वेळ ऐकला. मग तो थोडक्यात बोलला, "मी तिकडे येतो." आणि माझ्याकडे वळला.

"माझ्या मित्रा, तुला काय वाटते?" तो अर्धा लज्जित व अर्धा उद्दीपित झालेला वाटत होता. "मिस मार्व्हेलचा हिरादेखील चोरीला गेला."

मी उडी मारत ओरडलो, "काय? आणि आता पौर्णिमेचे काय? पायरोचा चेहरा पडला. "हे कधी घडले?"

"मला वाटते, आज सकाळी."

मी दुःखाने मान हलवली. "जर तू माझे ऐकले असतेस, तर --- तुला समजले असेल, माझे बरोबर होते."

पायरो काळजीपूर्वक म्हणाला, "माझ्या मित्रा, असे दिसते आहे."

"असे म्हणतात, दिसते तसे नसते. पण खरे तर तसेच दिसते आहे."

आम्ही घाईने मॅग्नीफिशन्टसाठी टॅक्सी केली. मला या बेताची अंदरकी बात गोंधळात टाकत होती.

"ती 'पौर्णिमेची' कल्पना चांगली होती. सगळ्याचा मतितार्थ एवढाच होता, की आपल्याला शुक्रवार सांगून बेफिकीर ठेवायचे. आणि त्याच्या आधीच माल लंपास करायचा. तुला हे समजले नाही, हे दयनीय आहे."

त्याचा शांतपणा छोट्या ग्रहणानंतर पुन्हा जागा होऊन, पायरो मोठ्या डौलात बोलला, "खरे तर प्रत्येकाला सगळे समजतेच असे नाही!"

मला त्याची दया आली. त्याने असे केल्याने माझा त्याच्याबद्दलचा द्वेष निघून गेला. मी त्याची समजूत काढत म्हणालो, "जाऊ दे, काय मोठेसे? पुढच्या वेळेसाठी शुभेच्छा."

मॅग्नीफिशन्टला आम्हाला लगेच व्यवस्थापकाच्या खोलीत नेण्यात आले.

ग्रेगरी रोल्फ स्कॉटलंड यार्डच्या दोन माणसांसकट तिथे होता. उदास चेहऱ्याचा कारकून त्यांच्यासमोर बसला होता.

आम्ही आत शिरल्यावर रोल्फने आमच्याकडे बघून, मान हलवली. तो म्हणाला, "आम्ही याच्या मुळाशी जात आहोत. पण यावर विश्वास ठेवणे अशक्य आहे. त्या माणसाची एवढी शामत कशी काय झाली, ते मला कळत नाही."

मिस्टर रोल्फ हॉटेलमधून ११:१५ ला बाहेर पडले. त्यामुळे तिथे काय काय घडले, हे समजावून घ्यायला आम्हाला वेळ मिळाला. ११:३० ला एक अगदी त्याच्यासारखा दिसणारा गृहस्थ आला. त्याने सुरक्षित लॉकरमधून हिरा मागितला. तो मिस्टर रोल्फ आहे असे वाटल्याने हॉटेलच्या लोकांनी तो दिला. त्याने तो मिळाल्याची सही केली. त्यावर त्याने शेरा मारला, "ती सही नेहमीपेक्षा थोडी वेगळी दिसते आहे, कारण मी टॅक्सीतून उतरतांना माझा हात थोडा दुखावला गेला."

यावर हॉटेलच्या कारकुनाने स्मितहास्य केले. तो म्हणाला, की अगदी थोडासा फरक आहे. रोल्फ हसून बोलला, "काही झाले तरी यावेळेस मला मूर्ख समजू नका. मला एका चिनी माणसाकडून धमकीची पत्रे येत आहेत. आणि सर्वात वाईट म्हणजे, मी सुद्धा चिनी दिसायला लागलो आहे --- हे डोळ्यांसंबंधी काही आहे."

कारकून म्हणाला, "मी त्याच्याकडे बघितले. आणि मला लगेच कळले, की त्याला काय म्हणायचे आहे. त्याचे डोळे

पूर्वेकडील, आशियामधील लोकांसारखे कोपऱ्यात उतरते होते. आधी ते माझ्या लक्षात आले नाही.”

पुढे झुकत, ग्रेगरी रोल्फ गरजला, “अरे, तुझी बडबड बंद कर. तुला आता हे समजले का?”

त्या माणसाने त्याच्याकडे बघून सुरु केले, “नाही, सर. मला समजले, असे मी म्हणू शकत नाही.” आणि खरोखर तिथे काहीच आशियातील माणसासारखे नव्हते. आमच्याकडे बघणारे मोकळे, तपकिरी डोळे.”

स्कॉटलंड यार्डचा माणूस गरजला, “धीट गिऱ्हाईक. त्याला वाटले असेल, की डोळे लक्षात येतील आणि संशय घालवण्यासाठी त्याने कठीण परिस्थिती लबाडीने हाताळली. सर, त्याने तुम्हाला हॉटेलबाहेर पडतांना पाहिले असणार. आणि तुम्ही चांगले लांब गेल्यावर तो आत घुसला.”

मी विचारले, “हिऱ्याच्या डबीचे काय?”

“ती हॉटेलच्या पॅसेजमध्ये सापडली. एकच गोष्ट घेतली गेली, तो हिरा, ‘पश्चिमेचा तारा.’

आम्ही एकमेकांकडे रोखून पाहिले --- सर्व गोष्ट इतकी विचित्र होती.

पायरो उभा राहिला. तो खेदपूर्वक बोलला, “मला भीती वाटते, माझा फारसा उपयोग झाला नाही. मी बाईसाहेबांना भेटू शकतो का?”

रोल्फ म्हणाला, “मला वाटते तिला मोठा धक्का बसला आहे.”

“मग मिस्टर रोल्फ, मला तुमच्या एकट्याशी थोडे बोलायचे आहे.”

“नक्की.”

बोलून पाच मिनिटात पायरो बाहेर आला.

तो आनंदाने म्हणाला, “माझ्या मित्रा, आता आपण पोस्ट कार्यालयात जाऊ. मला एक तार पाठवायची आहे.”

“कोणाला?”

“उमराव यार्डले यांना.” त्याने त्याचा हात माझ्या हातात गुंफून, पुढील चौकशा सुरु केल्या. “ये, ये, माझ्या मित्रा. या भयंकर प्रकरणाविषयी तुला काय वाटते, ते सर्व मला माहिती आहे. मी मला ओळखले नाही. माझ्याऐवजी तू, हे प्रकरण हाताळायला पाहिजे होतेस. छान! मी हे कबूल केले आहे. तर आता सर्व काही विसरून जेवण करू या.”

“कुठे?”

आम्ही पायरोच्या खोलीत शिरलो, तेव्हा चार वाजले होते. खिडकीजवळील खुर्चीतून एक आकृती उठली. तो उमराव यार्डले होता. तो आजारी, दुःखी आणि उदास दिसत होता.

“मला तुमची तार मिळाली आणि मी लगेच आलो. इकडे बघा. मी हॉफबर्गला गेलो होतो. त्याना कालच्या त्या माणसाबद्दल किंवा तारेबद्दल काही माहिती नाही. तुम्हाला असे वाटते का --“

पायरोने त्याचा हात धरला. “मला माफ करा. मी त्या माणसाला तार पाठवली व ताब्यात घेतले आहे”

“पण का? काय?” हताश होऊन, उमरावाने नाकातून विचित्र आवाज काढले.

पायरोने शांतपणे स्पष्ट केले, “माझी लहानशी कल्पना अशी होती, या प्रकरणाला एक वळण द्यायचे.”

उमराव यार्डले किंचाळला, “वळण द्यायचे? अरे देवा!”

पायरो आनंदाने बोलला, “आणि तो बेत यशस्वी ठरला. त्यामुळे मला हे तुम्हाला परत करताना फार आनंद होतो आहे.” नाटकी हावभाव करून, त्याने एक चमचमती वस्तू त्यांच्या हातात दिली. तो मोठा हिरा होता. उमराव यार्डले दम टाकत बोलला, “’पूर्वेकडचा तारा’, पण मला समजत नाही --- ”

पायरो बोलला, “नाही? यात फारसे काही नाही. माझ्यावर विश्वास ठेवा. हिरा चोरला जाणे महत्वाचे होते. मी तुम्हाला शब्द दिला होता, आणि मी तो पाळला आहे. तुम्ही माझे लहानसे गुपित माझ्याकडे राखून ठेवायची परवानगी दिली पाहिजे. मी तुम्हाला विनंती करतो, की माझ्यातर्फे यार्डले बाईसाहेबांना मनापासून नमस्कार सांगा आणि त्याना मी हिरा परत करू शकलो म्हणून किती आनंदी आहे, ते देखील सांगा. काय मस्त हवा पडली आहे, नाही का? मी तुम्हाला शुभ दिवस म्हणतो.”

आश्चर्यचकित झालेल्या उमरावाला त्या नवलपूर्ण लहानशा माणसाने बोलत व हसत दारापर्यंत सोडले व हात चोळत, परत आला.

मी म्हणालो, “पायरो, मला विसरण्याचा रोग झाला आहे का?”

“नाही, मित्रा. तू नेहमीप्रमाणे मानसिक धुक्यात आहेस.”

“तुला हिरा कसा मिळाला?”

“मिस्टर रोल्फकडून.”

“रोल्फ?”

“त्याचे असे आहे. धमकीची पत्रे, चिनी माणूस, ‘गावगप्पा’ मधील लेख, हे सगळे मिस्टर रोल्फच्या सुपीक डोक्यातून निघाले

होते! नवलपूर्ण रीत्या अगदी सारखे असणारे हिरे --- वा! ते खरे अस्तित्वात नव्हतेच. खरा एकच हिरा होता. मुळात यार्डले यांच्या संग्रहातील --- तीन वर्षे तो मिस्टर रोल्फ यांच्या ताब्यात होता. त्याने आज सकाळी तो प्रत्येक डोळयाच्या कडेला चिकट पदार्थ लावून, चिनी बनून चोरला. आहा, मला त्याचा सिनेमा बघायला पाहिजे. खरे तर तो उत्तम अभिनेता आहे."

मी गोंधळून विचारले, "पण त्याने स्वतःचाच हिरा का चोरावा?

'अनेक कारणासाठी. सुरवातीला, यार्डले बाईसाहेब फार अस्थिर वृत्तीच्या होत्या.

"यार्डले बाईसाहेब?"

"तू समजू शकशील, की ती कॅलिफोर्नियाला फार एकटी पडली होती. तिचा नवरा इकडे तिकडे फिरून स्वतःचे मनोरंजन करून घेत असे. मिस्टर रोल्फ देखणा व अद्भुततेची हवा असलेला होता. पण महत्वाचे म्हणजे तो पक्का व्यापारी वृत्तीचा होता. तो अनेक सभ्य माणसे कोळून प्यायला होता. त्याने यार्डले बाईसाहेबांवर प्रेम केले. आणि नंतर तिला ब्लॅकमेल केले. त्या दुसऱ्या रात्री मी त्या बाईला छेडले आणि तिच्या कडून खरे वदवून घेतले. तिने ते कबूल केले. तिने शपथ घेतली, की ती फक्त लज्जित

होण्याचे टाळत होती. पण शेवटी ती गुप्त गोष्टी सांगायला तयार झाली. मी तिच्यावर विश्वास ठेवला. पण संशयातीतपणे, रोल्फकडे तिची पत्रे होती. त्यातून वेगळा अर्थ निघू शकत होता. रोल्फने तिला धमकी दिली की 'तिच्या नवऱ्याला ती पत्रे दाखवेन व त्याला घटस्फोट घ्यायला लावेन आणि तिला मुलांपासून वेगळे करेन' अशा तऱ्हेने रोल्फने तिला स्वतःच्या सगळया अटी मान्य करायला लावल्या. तिच्याकडे स्वतःचा असा पैसा नव्हता. ब्लॅकमेल करणाऱ्या रोल्फला द्यायला पैसे न उरल्याने तिने खरा हिरा, त्याला दिला व त्याऐवजी रोल्फने, तिच्या नवऱ्याच्या डोळयात धूळफेक करायला, त्यासारखा दिसणारा खोटा हिरा दिला.

रोल्फने 'पाशिमात्य तारा' विकत आणल्याची तारीख वरील घटनेशी बरोबर जमल्याचे बघून, मला संशय आला. आणि माझा सर्व अंदाज खरा ठरला. उमराव यार्डलेने माझ्यासमोर त्याची बिकट सांपत्तिक स्थिती उघडी केली. त्याच्याकडे असलेला हिरा, 'पूर्वेचा तारा' खोटा असल्याचे त्याला माहितीच नव्हते. आणि मग हिऱ्यासाठी धमकीची पत्रे येऊ लागली. आता खऱ्या खोट्या हिऱ्याची अदलाबदली लक्षात येणार, हे कळल्यावर मिसेस यार्डलेने बेताल होऊन नक्कीच तिने नुकत्याच इंग्लंडमध्ये आलेल्या ग्रेगरी रोल्फला लिहिले. त्याने सर्व काही नीट मार्गी लावतो, असे सांगत तिला शांत केले. आणि दुहेरी चोरीचा बेत

केला. अशा रीतीने त्याने त्या बाईला शांत केले, जिने कदाचित मानसिक रीत्या भारून जाऊन, सर्व काही तिच्या नवऱ्याला सांगितले असते. असे होणे ब्लॅकमेल करणाऱ्याला महागात पडले असते. त्याच्याकडे ५०,००० डॉलरचा विमा असेल [आहा, तुम्ही ते विसरला होतात.] आणि शिवाय त्याच्याकडे हिराही असणार! अशा वेळेस मी त्यात नाक खुपसले. हिरापारखी येणार असल्याचे सांगितले गेले. यार्डले बाईसाहेबांनी लगेच हिरा चोरला जाण्याची व्यवस्था केली, जे ती करणार असे मला वाटलेच होते. आणि ते तिने बिनबोभाट घडवून देखील आणले. पण हर्क्युल पायरो इतर काही नाही, तर घडलेल्या गोष्टी फारच नीट बघतो. खरे काय घडले? यार्डले बाईसाहेबांनी दिवे मालवले. दार वाजले. नेकलेस काढून पॅसेजमध्ये फेकले आणि किंचाळली. वरच्या मजल्यावर तिने आधीच चिमट्याने हिरा कोंदणातून खेचून काढला होता ---"

मी विरोध करत बोललो, "पण आम्ही तर तिच्या गळयाभोवती नेकलेस पाहिले."

"माझ्या मित्रा, नीट ऐक, जी जागा हिरा उचकटल्याने रिकामी होती, ती तिने हात ठेऊन लपवली होती. दारामध्ये रेशमी तुकडा आधीच लावून ठेवणे, हा मुलांचा खेळ होता. अर्थात चोरीची

बातमी ऐकल्याबरोबर रोल्फने त्याचे हास्यनाट्य घडवायचे ठरवले. आणि ते व्यवस्थित पारही पाडले.”

मी उत्सुकतेने विचारले, “तू रोल्फला काय म्हणालास?”

मी त्याला म्हणालो, की यार्डले बाईसाहेबांनी त्यांच्या नवऱ्याला सर्व सांगितले आहे आणि मी माझ्या शक्तीने हिरा परत मिळवू शकतो. जर मला तो लगेच मिळाला नाही, तर त्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल. अजूनही मला सुचले, ते थोडेफार खोटे बोललो. तो माझ्या हातात मऊ मेणासारखा होता.”

मी यावर काळजीपूर्वक विचार केला.

यात मेरी मार्व्हेलवर थोडा अन्याय होत होता. तिची चूक नसतांना तिचा हिरा हरवला होता.

पायरो दुष्टपणे बोलला, “अरेरे! तिची मोठी जाहिरात होईल, एवढीच तिला काळजी होती. आता दुसरे म्हणजे, ती वेगळी होती. जास्त सावधान होती.”

मी संशय घेत, पायरोच्या बायकांबद्दलच्या दृष्टीकोनावर जवळजवळ विश्वास न ठेवता बोललो, “मला वाटते, मिसेस यार्डलेला नकली पत्रे लिहिणारा तोच होता.”

पायरो थोडक्यात म्हणाला, “मुळीच नाही. ती मेरी कॅव्हेन्डीशच्या सांगण्यावरून तिच्या कठीण प्रसंगी, माझी मदत

मागायला आली. मग तिला समजले, की मेरी मार्व्हेल, जी तिची शत्रू होती, ती इथे आहे आणि मग तिने विचार बदलला.”

“माझ्या मित्रा, चुकीच्या घडलेल्या गोष्टीवर उडी मारत, तू तिला परवानगी मागत, काही थोडे प्रश्न विचारलेस. माझ्या लक्षात आले, की तू तिला पत्रांबद्दल सांगितलेस. तिने तुला नाही. तिला जे सांगितले गेले ते ऐकून, तिला आनंद झाला.”

मी अवाक होऊन ओरडलो, “यावर माझा विश्वास नाही.”

“हो. म्हणूनच हे दयनीय आहे, की तुला मानसशास्त्राचे ज्ञान नाही. तिने तुला पत्रे नाहीशी केल्याचे सांगितले का? ओहो, एखादी बाई जर पत्रे नष्ट करणे टाळू शकत असेल, जरी असे करणे भविष्याचा विचार करता श्रेयस्कर ठरले असते, तरीही ती ती पत्रे नष्ट करणार नाही.”

माझा राग वाढत होता. मी बोललो, “हे सर्व ठीक आहे. पण तू मला पूर्णपणे मूर्ख बनवलेस. सुरवातीपासून शेवटपर्यंत! हे फार चांगले आहे, की आधी करायचे आणि मग कसे काय केले, हे स्पष्ट करायचे. तुझे हे नेहमीच नंतर असते. याला काही सीमाच नाही!”

“पण माझ्या मित्रा, तू या सगळ्याची मजा घेत होतास. तुझा भ्रम दूर करावासा मला वाटला नाही.”

“हे बरे नाही. यावेळेस तू हे फारच ताणलेस.”

“अरे मित्रा, पण कशाचे काही नसतांना, तू एवढा कसा काय रागावतोस?”

“छे! मी अगदी कंटाळलो. मी जोरात दार आपटून बाहेर गेलो. पायरोने माझे पार हसे केले. मी ठरवले, याला चांगला धडा शिकवण्याची गरज आहे. काही काळ जाऊ दे. मगच मी त्याला क्षमा करेन. त्याने मला स्वतःला मूर्ख बनवण्यास उत्तेजन दिले..

HOW DOES YOUR GARDEN GROW?

# तुमची बाग कशी फुलते?



हर्क्युल पायरोने त्याच्यासमोरील पत्रांचा गठ्ठा नीट केला. त्याने सर्वात वरचे पत्र उचलले, क्षणभर त्यावरील पत्त्याचा अभ्यास केला. मग न्याहारीच्या टेबलावरील छोट्याशा कागद कापायच्या सुरीने पत्राच्या मागील फटीतून ते नीट कापले व त्यातून एक कागद काढला. त्यात जांभळ्या लाखेने बंद केलेले अजून एक पाकीट होते. त्यावर ‘खासगी व गुप्त’ असे लिहिलेले होते.

पायरोच्या अंडाकृती डोक्यावरील भुवया वरती गेल्या. तो पुटपुटला, "धीर धर. आम्ही परत येऊ!" एकदा छोट्या सुरीने काम केले. यावेळेस पाकिटातून पत्र आले --- ते थोड्या थरथरत्या व टोकेरी अक्षरात लिहिले होते. अनेक शब्द ठळकपणे अधोरेखित केलेले होते.

पायरोने ते उघडून वाचले. त्यावरदेखील 'खासगी व गुप्त' असे लिहिलेले होते. उजव्या बाजूस पत्ता होता. रोझबँक, चारमन्स ग्रीन, बक्स --- आणि तारीख --- मार्च एकवीस.

प्रिय मिस्टर पायरो,

अलीकडे मझे दुःख आणि काळजी माहिती असणाऱ्या माझ्या एका जुन्या, मूल्यवान मित्राने मला तुमची शिफारस केली आहे. हा मित्र खरोखरीच माझी परिस्थिती जाणतो, असे नाही --- ही गोष्ट खूप खासगी असल्याने, ती सर्व मी माझ्याजवळच ठेवली आहे --- तुम्ही त्यात पोलिसांना आणणार नाही व सर्व काही गुप्त ठेवाल, अशी ग्वाही माझ्या मित्राने मला दिली आहे. पण जर हे खोटे ठरले, तर मला ते जराही आवडणार नाही. पण माझा कदाचित गैरसमजदेखील होऊ शकतो. अलीकडे मला माझे डोके पुरेसे शांत ठेवता येत नाही --- गेल्या हिवाळ्यातील आजारपणाने मला निद्रानाश जडला आहे. त्यामुळे मी स्वतः ते शोधून काढू शकत

नाही. माझ्याकडे साधने नाहीत व क्षमता पण नाही. मला परत हे सांगितले पाहिजे की हे फार नाजूक कौटुंबिक प्रकरण आहे. काही कारणाने मला ते घाईने संपवायचे आहे. जर तुम्ही ही ग्वाही देत असाल, तर मी स्वतः हे तुम्हाला सांगेन. मला अशी आशा आहे, की मी हे सर्व तुम्हाला स्पष्टपणे सांगितले आहे. जर तुम्ही ही केस घेणार असाल, तर मला वरील पत्त्यावर कळवाल का?

तुमची,

ॲमेलिया बॅरोबाय

पायरोने दोनदा पत्र वाचले. परत त्याच्या भुवया थोड्या उंचावल्या. मग त्याने ते बाजूला ठेऊन ढिगातील दुसरे पत्र घेतले.

बरोबर दहा वाजता तो दिवसाभराची कामे काय आहेत, हे दुसऱ्या खोलीत बसलेल्या त्याची खासगी सचिव, मिस लेमनला सांगण्यासाठी तिच्याकडे गेला. ती अठ्ठेचाळीस वर्षांची असून दिसायला काही खास नव्हती. अनेक हाडांची कशीही मोळी बांधल्यासारखी, ती दिसे. तिला पायरोकडून आज्ञा झेलायची सवय होती. आणि ती विचार करू शकत असली, तरी ती तिला सांगितल्याशिवाय काही करत नसे.

पायरोने तिच्याकडे सकाळचा पत्रव्यवहार सुपूर्द केला. “मॅडम, या सर्व पत्रांना चांगल्या भाषेत नकार कळवून टाका.”

मिस लेमनने सर्व पत्रांवरून नजर फिरवली. जुन्या इजिप्शियन चित्रलिपीप्रमाणे ओळीने तिने प्रत्येक पत्राला उत्तर लिहिले.

ही लिपी फक्त तिलाच कळत होती. ‘मऊ साबण’, ‘गालावर चापट’, ‘हं हं’, ‘कापा’ आणि असेच. हे केल्यावर तिने मान हलवली आणि पुढील सूचनांसाठी वर पाहिले.

पायरोने तिला ॲमेलिया बॅरोबायचे पत्र दिले. तिने ते दुहेरी पाकिटातून काढले. पूर्णपणे वाचले आणि प्रश्नार्थक नजरेने वर पाहिले.

“मिस्टर पायरो, याचे काय करू? तिची पेन्सील उचलून लिहिण्यासाठी तयार होती.

“मिस लेमन, या पत्राबद्दल तुमचे काय मत आहे?”

थोडे हसून, मिस लेमनने पेन्सिल खाली ठेवली व परत एकदा पत्र वाचले.

फक्त योग्य अशा उत्तराचा विचार सोडून, पत्रातील मजकूर तिला काही समजला नाही. तिच्या कार्यालयीन क्षमता सोडून पायरो तिला एक माणूस म्हणून कधीच काही विचारत नसे. त्यामुळे त्याने असे केल्याने मिस लेमन जरा चिडली --- ती जवळ जवळ एखादे मशीनच होती. कुठल्याही प्रकारच्या मानवी बाबींमध्ये तिला काही स्वारस्य नव्हते. तिची जीवनातील खरीखुरी इच्छा

एकच होती. ती म्हणजे, इतर सर्व पद्धती फिक्या पडतील अशा तऱ्हेने सगळ्यात उत्कृष्ट  प्रकारे फाईली लावणे. तिला रात्री पण त्यासंबंधीच स्वप्ने पडत. तथापि मिस लेमन मानवाशी संबंधित गोष्टीत चांगली बुद्धिमत्ता असलेल्या क्षमतेची होती, आणि ते पायरोला चांगले माहिती होते.

त्याने विचारले, "काय?"

मिस लेमन म्हणाली, "म्हातारीला फारच घाई दिसते आहे."

"आं, तुम्हाला असे वाटते, की मी हे काम घ्यावे?"

मिस लेमनने काही उत्तर दिले नाही. तिने दुहेरी पाकीटात असलेल्या कागदाकडे परत नजर टाकली.

ती म्हणाली, "काहीतरी फारच गुप्त दिसते आहे. आणि ती ते तुम्हाला काहीच सांगत नाही आहे."

पायरो म्हणाला, "हो, ते माझ्या लक्षात आले."

पायरोच्या तोंडचे शब्द भरभर लिहून घेण्यासाठी, मिस लेमनचा हात परत आशापूर्णतेने, वर उचलला गेला. यावेळेस पायरोने प्रतिसाद दिला.

"तिला कळव की, जर ती इथे प्रत्यक्ष येणार नसेल तर, तिने सुचवलेल्या वेळी तिला फोन करायचे कष्ट मी घेईन. हे टंकलिखित न करता हाताने लिही."

“हो, मिस्टर पायरो.”

पायरोने अजून पत्रे दिली. “ही बिले आहेत.”

मिस लेमनच्या कामासाठी तत्पर हातांनी त्याचे झटपट विभाजन केले.

“मी ही दोन सोडून सगळी भरते.”

“ती दोन का नाही? त्यात काही चूक नाही.”

“तुम्ही नुकतीच सुरु केलेल्या कार्यालयाची आहेत. तुम्ही आताच ते खाते चालू केले आहे. इतक्या लवकर ती भरणे बरोबर दिसणार नाही. त्यांना असे वाटेल की नंतर काही पैसे जमा व्हावेत, म्हणून तुम्ही काम करत आहात.”

पायरो पुटपुटला, “तुझ्या ब्रिटीश व्यवहाराच्या अगाध ज्ञानापुढे मी नतमस्तक आहे.”

मिस लेमन गालातल्या गालात हसत बोलली, “त्यातले मला माहिती नाही, असे फार थोडे असेल.”

## दोन

मिस ॲमेलिया बॅरोबायसाठीचे पत्र लिहून पूर्ण झाले व पाठवले. पण उत्तर आले नाही. पायरोने विचार केला, ‘कदाचित

म्हातारीने स्वतःच स्वतःची समस्या सोडवली असेल. तरी त्याला थोडे आश्चर्य वाटत होते, की मग तिने नम्र भाषेत लिहिले नसते का, की तुमची सेवा आता मला नको आहे.

पाच दिवसांनी मिस लेमन तिला सकाळच्या सूचना दिल्यांनतर म्हणाली, “आपण पत्र लिहिलेली ती मिसेस बॅरोबाय वारली. त्यामुळे तिचे उत्तर आले नाही, यात काही नवल नाही.”

पायरो मृदुपणे बोलला, “ओहो, वारली?” तो प्रश्न होता की उत्तर कुणास ठाऊक!

तिची पर्स उघडून, त्यातून वर्तमानपत्राचे एक कात्रण बाहेर काढत, पायरोच्या हातात दिले व बोलली, “मला गाडीने येताना ते दिसले. म्हणून मी ते फाडून आणले.”

जरी ती म्हणाली फाडून आणले, तरी ते व्यवस्थित कापलेले दिसत असल्याने पायरो गोंधळला. जन्म, मृत्युच्या रकान्यात ती बातमी आली होती. ‘२६ मार्चला अचानक रोझबँक, चारमन्स ग्रीन येथील ॲमेलिया जान बॅरोबाय हिचा त्र्याहत्तराव्या वर्षी मृत्यू झाला. कृपया फुले पाठवू नयेत.’

पायरोने ते वाचले. तो स्वतःशीच पुटपुटला, “अचानक!”

मग तो म्हणाला, “मिस लेमन, तुम्ही कृपया पत्र लिहाल का?”

पेन्सिल निघाली. मिस लेमन भरभर लिहून घेऊ लागली.

प्रिय मिस बॅरोबाय,

मला तुमच्याकडून उत्तर आले नाही. पण मी इथे चारमन्स ग्रीनच्या जवळ येणार आहे. मी त्यादिवशी तुम्हाला फोन करेन. तेव्हा आपण तुम्ही पत्रात लिहिलेल्या गोष्टींविषयी सविस्तर चर्चा करू.

तुमचा वगैरे.

कृपया हे पत्र टंकलिखीत करा आणि ताबडतोब पोस्टात टाकलेत, तर चारमन्स ग्रीनला रात्रीपर्यंत पोचेल.”

दुसऱ्या दिवशी सकाळी काळी चौकट असलेल्या पाकिटातील एक पत्र आले.

प्रिय सर,

तुमच्या पत्राला उत्तर म्हणू माझी आत्या मिस बॅरोबाय, २६ तारखेला वारली. त्यामुळे तुम्ही जे म्हणत आहात, त्याला काही अर्थ उरला नाही.

तुमची,

मेरी डेलाफॉन्टेन

पायरो स्वतःशीच हसला. ‘त्याला काही अर्थ उरला नाही --- ओहो --- ते आपण आता बघू. चारमन्स ग्रीनच्या समोर.”

रोझबँक येथील घर तशा प्रकारच्या घरांसारखे नावालाच उरले होते.

त्याच्या पुढील दाराशी जाऊन पायरो थांबला. त्याने त्याच्या दोन्ही बाजूंना असणाऱ्या आखीव रेखीव फुलांच्या वाफ्याकडे नजर टाकली. आता तिथे डॅफोडील्स फुलली होती. ट्यूलिपला व निळ्या हायसिन्थला कळ्या आल्या होत्या. गुलाबांसाठी मशागत करून ठेवली होती. शेवटच्या वाफ्यात कडेनी शंखशिंपले लावले होते.

पायरो स्वतःशीच पुटपुटला, "छोट्या मुलांचे गाणे इथे कसे काय वाटेल?

अग अग मिस मेरी तुझी बाग फुलते भारी

कालव शिंपले चांदीच्या घंटा सुंदर पऱ्यांनी सजल्या वाटा

"वाटा नसतील कदाचित पण वरील गाणे खरे ठरण्यासाठी इथे एक तरी सुंदर परी आहे.

पुढचे दार उघडून, स्वतःशीच बोलणाऱ्या मिशावाल्या परदेशी माणसाकडे घाबरून बघत, टोपी व ॲप्रन घातलेली एक छोटीशी सुंदर परी बाहेर बागेत आली. पायरोने म्हटल्याप्रमाणे ती गोल निळ्या डोळ्यांची व गुलाबी गालांची छोटीशी छान परी होती.

पायरोने रिवाजानुसार त्याची टोपी काढली व तिला म्हणाला, “माफ करा. पण मिस ॲमेलिया बॅरोबाय इथे रहातात का?”

छोटी परी धापा टाकत व डोळे मोठे करत बोलली, “ओहो, तुम्हाला माहिती नाही का? ती वारली. हे इतके अचानक झाले. मंगळवारी रात्री.”

ती आढेवेढे घेत, दोन बळकट सहजप्रवृत्तींमध्ये अडकली. एक होती, परदेशी माणसाबद्दलचा अविश्वास आणि दुसरी होती आजारपण व मृत्यूविषयी बोलत राहून आनंद मिळवणे.

पायरो थोडेसे खोटे खोटे म्हणाला, “तू मला आश्चर्यचकित केलेस. माझे आज बाईसाहेबांबरोबर भेटायचे ठरले होते. पण इथे रहाणाऱ्या दुसऱ्या कुणाला मी भेटू शकतो.”

छोट्या परीला जरासा संशय आला. “बाईसाहेबांबरोबर? ठीक आहे. तुम्ही कदाचित तिला भेटू शकता.पण ती कुणाला भेटेल की नाही, ते मला माहिती नाही.”

पायरो म्हणाला, “ती मला भेटेल.” त्याने स्वतःचे कार्ड दिले.

त्याच्या वजनदार आवाजाचा उपयोग झाला. गुलाबी गालांच्या परीने पुढे जाऊन पायरोला हॉलच्या उजव्या बाजूस असलेल्या खोलीत बसायला सांगितले. मग कार्ड हातात घेऊन, तिच्या मालकीणबाईंना बोलवायला गेली.

पायरोने आजूबाजूला पाहिले. ती अगदी जुन्या वळणाची चांगली खोली होती. ओटमीलच्या रंगाचे कागद छताच्या जवळील भागाला लावलेले होते. मधल्या भागाला गुलाबी रंगाचे पडदे आणि उशा होत्या. शोभेच्या खूपशा फुटकळ चिनी वस्तू जिकडे तिकडे पसरलेल्या दिसत होत्या. त्या खोलीत व्यक्तीमत्वाचा ठसा उमटेल, असे काहीच नव्हते.

खूप भावनाशील व चाणाक्ष पायरोला कुणीतरी त्याच्यावर नजर ठेवत असल्याचे जाणवले. तो गोल फिरला. मोठ्या खिडकीपाशी लहानशी, फिकट पिवळया त्वचेची, काळया केसांची व संशयी डोळयांची एक मुलगी उभी होती.

ती आत आली. पायरो थोडासा वाकला, तेव्हा ती वेडीवाकडी गरजली, “तुम्ही का आला आहात?”

पायरोने काही उत्तर दिले नाही. त्याने फक्त भुवया उंचावल्या.

“तुम्ही वकील नाही आहात --- नाही ना?” तिचे इंग्लिश चांगले होते. पण तिला मिनिटभरसुद्धा कोणी इंग्लिश समजले नसते.

“बाईसाहेब, मी वकील का असायला हवे आहे?”

मुलगी त्याच्याकडे वाईट मनस्थितीत असल्यासारखी बघू लागली. “मला वाटले तुम्ही वकील असाल. ती काय करत आहे,

हे तिला कळत नसल्याचे सांगायला तुम्ही आला आहात, असे मला वाटले. मी अशा गोष्टी ऐकल्या आहेत --- त्याचा काही परिणाम होणार नाही, असे ते म्हणतात, नाही का? पण ते बरोबर नाही. तिला मला पैसे द्यायचे होते. आणि मी ते घेईन. जर गरज असेल, तर मी माझा स्वतःचा वकील आणेन. पैसा माझा आहे. तिने तसे लिहिले आहे आणि तसेच होणार." ती कुरूप दिसत होती. तिची हनुवटी बाहेर आली होती. डोळे चमकत होते. दार उघडून एक उंच बाई आत आली व म्हणाली, "कतरिना."

मुलगी लाजली, थोडी आखडली आणि काही पुटपुटून मोठ्या खिडकीतून बाहेर गेली.

एका शब्दाच्या उच्चाराने परिस्थितीवर परिणाम घडवणाऱ्या नवीन आलेल्या व्यक्तीकडे पायरोने चेहरा वळवला. तिच्या आवाजात जरब/ अधिकार होता. तुच्छतादर्शक भाव होता. आणि चांगल्या तऱ्हेचा विरोधाभासही होता. त्यच्या लगेच लक्षात आले, की ही घराची मालक आहे, मेरी डेलाफॉन्टेन.

"मिस्टर पायरो? मी तुम्हाला लिहिले होते. ते तुम्हाला मिळू शकले नसेल."

"अरेरे, मी लंडनमध्ये नव्हतो."

“ओहो, अस्स, मग सगळे स्पष्ट झाले. मी माझी ओळख करून देते. माझे नाव डेलाफॉन्टेन. हा माझा नवरा आणि मिस बॅरोबाय म्हणजे माझी आत्या.”

मिस्टर डेलाफॉन्टेन इतक्या झटपट आत शिरले, की ते कधी शिरले ते कळलेच नाही. तो विरळ केसांचा, उंच व न कळणाऱ्या पद्धतींचा मनुष्य होता. त्याला त्याच्या हनुवटीवर बोटे फिरवायची, उदास भासणारी सवय होती. तो नेहमी त्याच्या बायकोकडे बघे. हे स्पष्टपणे दिसत होते, की तिने संभाषणात मुख्य भाग घ्यावा अशी त्याची अपेक्षा होती.

पायरो बोलला, “तुम्हाला मृत्यूमुळे झालेल्या दुःखात मी मध्येच आल्याने मला माफ करा.”

मिसेस डेलाफॉन्टेन म्हणाली, “तो काही तुमचा दोष नाही. माझी आत्या मंगळवारी संध्याकाळी वारली. हे अगदी अचानक झाले.”

मिस्टर डेलाफॉन्टेन म्हणाले, “फारच अचानक, आम्हाला हा मोठा धक्का होता. जिथून ती परदेशी मुलगी गेली, तिथे त्याचे डोळे लागले होते.

पायरो म्हणाला, “मी दिलगीर आहे. मी जातो.” एवढे बोलून तो दाराकडे जाऊ लागला.

मिस्टर डेलाफॉन्टेन म्हणाले, “एक मिनिट. ॲमे --- ॲमेलिया --- आत्या बरोबर भेटायचे तुमचे ठ --- रले होते, असे तुम्ही म्हणता आहात का?”

“हो. नक्कीच.”

मिसेस डेलाफॉन्टेन म्हणाली, “तुम्ही कदाचित आम्हाला त्याबद्दल सांगू शकाल. आम्हाला करता येण्यासारखे काही असेल तर --- “

पायरो बोलला, “ते खासगी स्वरूपाचे होते. मी गुप्तहेर आहे.”

मिस्टर डेलाफॉन्टेन ते हाताळत असलेल्या छोट्या चिनी वस्तूवर टिचक्या मारत होते. त्यांची बायको कोड्यात पडल्यासारखी दिसत होती.

“गुप्तहेर? आणि तुमचे आत्याबरोबर भेटायचे ठरले होते? हे किती विचित्र आहे!” तिने त्याच्याकडे रोखून बघितले. “मिस्टर पायरो, तुम्ही अजून काही सांगू शकत नाही का? हे काही विलक्षण दिसते आहे.”

पायरो क्षणभर गप्प राहिला. त्याने काळजीपूर्वक शब्द निवडले.

“बाईसाहेब, हे माझ्यासाठी अवघड आहे. काय करावे, ते मला समजत नाही.”

मिस्टर डेलाफॉन्टेन म्हणाले, “असे बघा. ती रशियन्सबद्दल काही बोलली का?”

“रशियन्स?”

“हो. बोल्शीज, रेड्स, आणि त्याप्रकारचे काही.”

त्याची बायको म्हणाली, “हेन्री, काहीतरीच बोलू नकोस.”

“मिस्टर डेलाफॉन्टेन गडबडले. “माफ करा. मला जरा नवल वाटले.”

मेरी डेलाफॉन्टेनने मोकळेपणे पायरोकडे बघितले. तिचे डोळे निळे होते. ते कधी विसरायला होणार नाहीत, असा रंग. “मिस्टर पायरो, तुम्ही जर आम्हाला काही सांगू शकलात, तर मला बरे वाटेल. मला असे विचारायचे कारण आहे --- मी अशी खात्री देते.”

मिस्टर डेलाफॉन्टेन सावध झाले. “अग बाई, काळजी घे --- तुला माहिती आहे --- त्यात काही तथ्य नाही.”

परत त्याच्या बायकोने त्याला नजरेने दटावले. “ठीक आहे, मिस्टर पायरो?”

पायरोने हळू, थंडपणे डोके हलवले. त्यात मोठी खंत दिसत होती. “सध्यातरी मला वाटते, मी काही न बोललेले बरे.”

तो वाकला. त्याची टोपी घेतली व दाराकडे गेला. मेरी त्याच्याबरोबर हॉलपर्यंत आली. पायऱ्यांवर थांबून त्याने तिच्याकडे पाहिले.

"बाईसाहेब, मला वाटते, तुम्हाला बागेची आवड दिसते."

"हो, मी माझा बराचसा वेळ इथे घालवते."

"मी तुमचा आभारी आहे."

तो अजून एकदा वाकला व गेटकडे चालू लागला. तो त्याच्याबाहेर पडला, उजवीकडे वळला व मागे वळून पाहिले. त्याची दोन मते तयार झाली.

रोगट पिवळा चेहरा खिडकीतून त्याच्याकडे बघत होता आणि एक सैनिकासारखा दिसणारा ताठ माणूस रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला वरखाली भरभर चालत होता.

पायरोने स्वतःशीच मान हलवली. तो म्हणाला, "डेलाफॉन्टेन. येथे काही पाणी मुरते आहे. आता काय करावे बरे?"

त्याच्या निर्णयाने त्याला जवळच्या पोस्ट कार्यालयात नेले. इथे त्याने बरेच फोन केले. याचा परिणाम समाधानकारक झालेला वाटला. त्याने चारमन्स ग्रीन पोलीस स्टेशनकडे त्याचा मोर्चा वळवला. तिथे त्याने इन्स्पेक्टर सिम्सची चौकशी केली.

इन्स्पेक्टर सिम्स एक मोठा, दणकट व आनंदी सवयी असलेला मनुष्य होता. त्याने विचारले, “मिस्टर पायरो? मला वाटलेच, मला मुख्य कॉन्स्टेबलकडून आताच तुमच्याबद्दल फोन आला होता. तो तुम्ही इथे येत असल्याबद्दलचाच होता. चला माझ्या कार्यालयात जाऊ.”

दार बंद झाल्यावर इन्स्पेक्टरने पायरोला एका खुर्चीकडे निर्देश करून बसायला सांगितले व स्वतःही बसला. त्याने पाहुण्याकडे एक चौकस नजर टाकली.

“मिस्टर पायरो, तुम्ही वेळेच्या बाबतीत अगदी काटेकोर आहात. ही रोझबँक केस आम्हाला माहिती होण्यापूर्वीच तुम्ही आम्हाला भेटायला आला आहात. असे कसे झाले?”

पायरोने त्याला मिळालेले पत्र दाखवले. इन्स्पेक्टरने ते रस घेऊन वाचले.

तो म्हणाला, “हे रुचीपूर्ण दिसते. पण त्रास असा आहे, की याचा अर्थ अनेक गोष्टी यात असू शकतील. ती यावर काही प्रकाश टाकू शकली नाही, हे दयनीय आहे. त्यामुळे आपल्याला मदत झाली असती.”

“किंवा कदाचित मदतीची काही गरज नसावी.”

“म्हणजे?”

“ती जिवंत असेल.”

“तुम्ही हे फार ताणत आहात, नाही का? हं --- पण माझी खात्री नाही, की तुम्ही चुकत आहात.”

“इन्स्पेक्टर, मी तुम्हाला विनंती करतो, की या केसचे सर्व मुद्दे मला स्पष्ट करा. मला काहीच माहिती नाही आहे.”

“ते मी सहज करतो. मंगळवारी जेवणानंतर मिस बॅरोबायला बरे नाहीसे झाले. ते फार जास्त स्वरूपाचे होते. अचानक जोरात कळा येऊन काय काय होऊ लागले. डॉक्टरांना बोलावले गेले. पण ते येईपर्यंत म्हातारी मरण पावलेली होती. प्रथम असे वाटले, की ती चक्कर आल्याने मरण पावली. पण त्याला तेथील दृष्य फारसे आवडले नाही. घरच्या लोकांनी वरवर काहीतरी गुडीगुडी बोलून खरी परिस्थिती सांगायचे टाळले. पण डॉक्टरने हे स्पष्ट केले की त्याला मरण आल्याचे पत्र देता येणार नाही. आणि कुटुंबाचे म्हणाल, तर तेथूनच गोष्ट सुरु झाली. ते मृत्युनंतरच्या शवविच्छेदनाच्या अहवालाची वाट बघत आहेत. आम्ही यात अजून पुढे गेलो. डॉक्टरांनी आम्हाला तिथल्या तिथे सूचना दिली --- त्याने व पोलीस सर्जनने कारवाई केली --- आणि निर्णय काही संशयास्पद नाही, की म्हातारी जास्त प्रमाणात स्ट्रायचिनाईन दिले गेल्यामुळे दगावली.”

“आहा!”

“हे बरोबर आहे. फार वाईट कृत्य आहे. तर प्रश्न असा आहे की ते तिला कुणी दिले? ते मृत्यूपूर्वी थोडाच काळ दिले गेले असणार. पहिल्यांदा असे वाटत होते, की ते जेवणातून दिले गेले --- पण मोकळेपणे बोलायचे तर ते तसे नव्हते. त्यांच्याकडे तेव्हा खोलगट बशीतून आर्टीचोक सूप दिले गेले. त्याबरोबर फिश पाय आणि सफरचंदाचा केक होता.

मिस बॅरोबाय, मिस्टर डेलाफॉन्टेन व मिसेस डेलाफॉन्टेन. मिस बॅरोबायसाठी एक अर्धी रशियन दाई होती. पण ती कुटुंबाबरोबर खात नसे. पण त्या दिवशी ते तिघे जेऊन बाहेर आल्यावर उरलेले दाईने खाल्ले. तिथे नोकराणी होती पण तिची रात्रीची रजा होती.

तिने सूप स्टोव्हवर ठेवले व फिश पाय ओव्हनमध्ये ठेवले आणि सफरचंदाचा केक गार होता. त्या तिघांनी तेच अन्न खाल्ले --- आणि त्याशिवाय आणि मला नाही वाटत, की स्ट्रायचिनाईन असे सहज देता येते. ते अती कडू असते. डॉक्टर म्हणाले, हजारात एक भाग ते घालून त्याची चव बघता येते.”

“कॉफी?”

“कॉफी बरीचशी त्यासारखी असते पण ती म्हातारी कधी कॉफी घेत नसे.”

“मला तुमचे म्हणणे समजते आहे. हो. असे वाटते आहे, की हा सोडवण्यास कठीण प्रश्न आहे. तिने जेवतांना काय पेय घेतले?”

“पाणी.”

“वाईट. फारच वाईट.”

“थोडेसे चिडवल्यासारखे, नाही का?”

“म्हातारीकडे पैसे होते का?”

“माझ्या मते, अगदी भरपूर होते. पण आम्हाला अजून पूर्ण माहिती मिळालेली नाही. पण माझ्या अंदाजाप्रमाणे, डेलाफॉन्टेन लोकांची परिस्थिती फारशी चांगली नव्हती. म्हातारी घरखर्चासाठी मदत करत असे.”

पायरो थोडा हसला. तो बोलला, “म्हणजे तुम्ही डेलाफॉन्टेन लोकांवर संशय घेत आहात. त्यांच्यापैकी कोण?”

“मी नक्की सांगू शकत नाही. दोघांपैकी कुणीही असेल. पण एक आहे. ते तिचे एकुलते एक जवळचे नातेवाईक आहेत आणि तिच्या मृत्यूने त्याना बरीच रक्कम मिळणार आहे, याबद्दल मला काही संशय नाही. मनुष्यस्वभाव काय असतो, आपल्याला सगळ्यांना माहिती आहे.”

“कधी कधी तो माणुसकीला सोडून असतो ---हो, हे खरे आहे. आणि म्हातारीने तसे संशयास्पद काही खाल्ले प्यायले नव्हते, नाही का?”

“पण खरे तर --- “

“ओहो, पण तुमच्या मते --- मला वाटते, तुमच्या मते, सूप, फिश पाय किंवा सफरचंदाचा केक --- एक मूर्खपणा! आता आपण या केसच्या गाभ्याकडे येत आहोत.”

“ते काही मला माहिती नाही पण खरे तर तिने जेवणापूर्वी एक पुडी घेतली होती. तुम्हाला माहिती आहे का, गोळी नव्हे. तांदुळाच्या पातळसर लहानशा आवरणातील पावडर. पचनासाठी घेतलेले हानिकारक नसलेले औषध.”

“वा! त्यात स्ट्रायचिनाईन भरुन ती बदलून ठेवणे काहीच कठीण नाही. एकदा ती पाण्याबरोबर घशातून खाली गेली, की त्याची काही चव लागत नाही.”

“ते बरोबर आहे. पण त्यातली गोम अशी आहे की ते म्हातारीला त्या मुलीने दिले.”

“ती रशियन मुलगी?”

“हो, कतरिना रीगर. ती म्हातारीची परिचारिका व मदतनीस होती. मला वाटते, ती सतत तिच्याजवळ असायची व मिस

बॅरोबायच्या आज्ञा झेलत असायची. हे आण. ते आण. हे दुसरे आण. माझी पाठ खाजव. माझे औषध ओत. औषधाच्या दुकानात पळ. असे नेहमी चालू असायचे. तुम्हाला माहिती असेल, या म्हाताऱ्यांचे कसे चालते --- त्या दयाळू असायचा प्रयत्न करतात पण खरे तर त्यांना काळ्या गुलामाची गरज असते!"

पायरो हसला.

इन्स्पेक्टर सिम्स पुढे म्हणाला, "आणि हे फारसे चांगले लागू पडत नाही, असेच तुम्ही म्हणणार. ती मुलगी म्हातारीला विष का देईल? आता म्हातारी मेली आणि तिचे काम संपले. आणि काम मिळवणे इतके सोपे नाही --- तिने काही प्रशिक्षणही घेतलेले नाही."

पायरोने सुचवले, "तरीही जर पुडी आसपास कुठे ठेवली असेल, तर घरातील कोणालाही संधी मिळू शकत होती."

"आपण चौकशी करतोच आहोत --- पण तुम्ही माझे म्हणणे समजून घेतले तर हे शक्य आहे. शेवटी जेव्हा डॉक्टरने सुचवलेली औषधांची यादी बनवून नेहमीच्या ठिकाणी ठेवली गेली, तेव्हा खूप धीर धरला गेला व खूप काही खणले गेले --- त्यायोगे नंतर शेवटी युक्ती केली गेली. मग मिस बॅरोबायचा वकील आला. माझी

त्याच्याबरोबर आणि बँक व्यवस्थापकाबरोबर उद्या मुलाखत आहे. अजून बरीच कामे करायची आहेत.”

पायरो उठला. “इन्स्पेक्टर, एक काम कराल का? केस कशी काय पुढे चालली आहे याबद्दल मला थोडक्यात कळवा. मला खूप बरे वाटेल. हा माझा फोन नंबर आहे.”

“हो, नक्की, मिस्टर पायरो. एका डोक्यापेक्षा दोन डोकी बरी. शिवाय तुम्ही तुम्हाला आलेल्या पत्रामुळे, तुम्ही यात असायलाच पाहिजे.”

“इन्स्पेक्टर, तुम्ही फार सहकार्य करणारे आहात. नम्रपणे पायरोने त्याच्याशी हातमिळवणी केली व निघाला.

तीन

दुसऱ्या दिवशी दुपारी त्याला फोन करून बोलावण्यात आले. “मी सिम्स बोलतो आहे. मिस्टर पायरो का? खरे तर आपल्याला माहिती असलेल्या या केसमधील गोष्टींनंतर आता अजून काही लहानसहान गोष्टी उलगडू लागल्या आहेत.”

“खरे की काय? मला त्या सांग. मी तुला विनंती करतो.”

“ठीक आहे पहिला मुद्दाः खूप मोठा असलेला. मिस ब ने तिच्या भाचीसाठी थोडीशी संपत्ती ठेवली होती आणि बाकी सगळे

क च्या नावे केले होते. तिच्या सावधपणामुळे व दयाळुपणामुळे --- असे ते सांगितले गेले. त्यामुळे गोष्टी बदलल्या.

पायरोच्या मनात हळूच चित्र उमटले. उदास चेहरा आणि भावनामय आवाज सांगत होता, "पैसा माझा आहे. तिने ते लिहिले आहे आणि ते तसेच होवो. कतरिनाला आश्चर्य वाटेल, अशा तऱ्हेने संपत्ती तिला मिळायला नको --- तिला ते आधी माहिती पाहिजे.

दुसरा मुद्दाः इन्स्पेक्टरचा आवाज चालू राहिला, "त्या पुडीला क सोडून कोणी हात लावला नाही."

"तुमची याबद्दल खात्री आहे?"

ती मुलगी स्वतः हे नाकारत नाही. त्याचे तुम्हाला काय वाटते?"

"फारच रुचीपूर्ण."

"आपल्याला अजून एकच गोष्ट हवी आहे --- की स्ट्रायचिनाईन तिच्या ताब्यात कसे आले. ते फार अवघड नसावे."

"पण अजूनपर्यंत तुम्ही ते शोधण्यात यशस्वी झालेला नाहीत, नाही का?"

"मी आताच तर सुरवात केली आहे. आज सकाळी कायदेशीर चौकशी सुरु झाली."

“त्यात काय झाले?”

“एक आठवड्याकरता स्थगिती देण्यात आली.”

“आणि तरूण स्त्री --- क ?”

“मी तिला संशयावरुन अटक केली आहे. मला ती पळून जाण्याचा धोका घ्यायचा नाही. तिला देशाबाहेर पळून जायला मदत करणारे तिचे कोणी विनोदी मित्र असतील.”

“पायरो म्हणाला, “नाही. मला वाटत नाही की तिला कुणी मित्र आहेत.”

“खरे की काय? मिस्टर पायरो, तुम्ही असे कशावरून म्हणता?”

“ही आपली माझी कल्पना आहे. अजून काही?”

अजून विशेष काही नाही. मिस ब अलीकडे तिच्या शेअर्ससंबंधी काही माकडचाळे करत होती. तिला त्यातून बरीच मोठी रक्कम मिळाली असावी. तसेही, हा एक विनोदी व्यवहार होता. पण त्यामुळे मुख्य गोष्टीत कसा काय फरक पडू शकतो, ते मला समजत नाही. सध्या तरी एवढेच.”

“नाही. कदाचित तुमचे बरोबर असेल. ठीक आहे. मला फोन करून हे सर्व सांगितल्याबद्दल, मी तुमचे आभार मानतो.

“त्याचे एवढे काय! मी दिलेला शब्द पाळणारा माणूस आहे. तुम्हाला यात स्वारस्य असल्याचे मला दिसत होते. कोणाला माहित, कदाचित तुम्ही मला काही मदत करू शकाल.”

“तसे झाल्यास, मला आनंद होईल. उदाहरणार्थ, जर मी त्या कतरिनाच्या मैत्रिणीकडून काही माहिती काढू शकलो तर, त्याची तुम्हाला मदत होऊ शकेल.”

इन्स्पेक्टर सिम्स आश्चर्याने म्हणाला, “मला वाटते तुम्ही मगाशी म्हणालात, की तिला कोणी मैत्रिणी नाहीत.”

पायरो बोलला, “मी चुकत होतो. तिला एक मैत्रीण आहे.”

इन्स्पेक्टरने अजून काही प्रश्न विचारायच्या आत, पायरो तिथून निघाला.

मिस लेमन जिथे टंकलेखन करत बसते, तिथे गंभीर चेहरा करून तो गेला. तिने त्याच्याकडे चौकस दृष्टीने पाहिले.

पायरो बोलला, “मला तुम्ही थोडे भूतकाळात जाऊन आकडेमोड करायला हवी आहे. काहीतरी नको ते घडणार असल्याच्या थाटात तिने टंकलेखन थांबवून, दोन्ही हात बाजूला टाकले. तिला बिले भरायला, टंकलेखन करायला, कागद फाईलला लावायला आणि भेटीगाठी ठरवायला, फार आवडायचे. ते तिचे काम असल्याचे तिने मान्य करून टाकले होते.

पायरो बोलला, “तू एक रशियन मुलगी आहेस.”

“मिस लेमन पूर्णपणे ब्रिटीश दिसत बोलली, ‘हो.”

“तुला या देशात कुणी मैत्रिणी नाहीत व तू अगदी एकटी आहेस. रशियाला परत न जाण्यासाठी तुझ्याकडे काही कारणे आहेत. एका म्हातारीची मदतनीस व दाईचे कंटाळवाणे काम करण्याची नोकरी तुला मिळाली आहे. तू शांत व काही तक्रार न करणारी आहेस.”

मिस लेमन आज्ञाधारकपणे म्हणाली, “हो.” पण जगातील कुठल्याही म्हाताऱ्या बाईबरोबर शांतपणे काम करत असल्याचे बघणे, तिच्यासाठी शक्य नव्हते.

“म्हातारी तुला काही कल्पना सांगते. ती तिचा पैसा तुला देणार असल्याचे सांगते. ती असे तुला सांगते.” पायरो थांबला.

मिस लेमन परत “हो” म्हणाली.

आणि मग म्हातारीला काहीतरी सापडते. ते कदाचित काही पैशांसंबंधी असते --- तिच्या असे लक्षात येते की तू तिच्याशी प्रामाणिक नाहीस. किंवा त्याहूनही वेगळे काही असेल --- वेगळ्या चवीचे काही औषध किंवा वेगळे अन्न. ती तुझ्याबद्दल संशय घ्यायला लागते. ती एका प्रसिद्ध गुप्तहेराला लिहिते --- थोडक्यात मला लिहिते. मी तिला थोड्याच दिवसात भेटणार असतो. आणि

मग, तुम्ही म्ह्टल्याप्रमाणे, संशयाची आग वाढत जाते. त्यावर लगेच कारवाई करायला हवी, म्हणून --- मोठा गुप्तहेर येण्यापूर्वी --- म्हातारी मरते. आणि पैसा तुला मिळतो --- मला सांग, हे तुला योग्य वाटते का?"

मिस लेमन म्हणाली, "एका रशियनसाठी अगदी योग्य वाटते. म्हणजे व्यक्तिशः मी कोणाची खासगी काळजीवाहू दाई होणारच नाही. मला माझी कर्तव्ये स्पष्टपणे सांगितली गेली पाहिजेत. आणि मी अर्थात कुणाचा खून करायची स्वप्ने पहाता कामा नयेत."

पायरोने सुस्कारा टाकला. "मी माझा मित्र हेस्टींग्ज इथे नसल्याने, बेचैन झालो आहे. त्याची कल्पनाशक्ती खूप चांगली आहे. त्याचे मन अद्भुतरम्य आहे. आता तो नेहमी चुकीच्या कल्पना करतो, ते सोडा --- पण त्यामुळे मला विचारांची दिशा मिळते."

मिस लेमन शांत होती. ती खूप वेळ तिच्यासमोरील टंकलिखित कागदाकडे नजर लाऊन बसली होती.

पायरो बोलला, "तर मग तुला हे योग्य वाटते तर!"

"तुम्हाला वाटत नाही का?"

"मला भीती आहे, की मलाही ते बरोबर वाटते.

फोन वाजला आणि तो घ्यायला मिस लेमन खोलीबाहेर गेली. ती परत सांगत आली की "परत इन्स्पेक्टर सिम्सचा फोन आहे. पायरोने तो घाईने घेतला. "हॅलो, काय म्हणतो आहेस?"

सिम्सने परत सांगितले, "आम्ही मुलीच्या झोपायच्या खोलीत गालीच्याखाली लपवलेली स्ट्रायचिनाईनची पुडी शोधून काढली आहे. सार्जंटने आताच ही बातमी आणली. मला वाटते, यामुळे या प्रकरणावर शिक्कामोर्तब होईल. "

पायरो बोलला, "हो. ते नक्की होईल." त्याचा आवाज बदलला. त्यात आत्मविश्वास आला.

जेव्हा तो फोन घेऊन निघाला, तेव्हा तो त्याच्या लिहिण्याच्या टेबलाशी बसला आणि त्यावरील वस्तू सवयीने नीटनेटक्या केल्या. तो स्वतःशी पुटपुटला, "काहीतरी बिघडले आहे. मला ते जाणवते आहे --- नाही, तसे वाटत नाही. करड्या पेशींनी पुढे पाऊल टाकले. विचार --- डोके खाजवणे. सर्व काही तार्किक दृष्ट्या सुसंगत होते का? मुलगी --- तिची पैशांबद्दलची काळजी. मिसेस डेलाफॉन्टेन, तिचा नवरा --- त्याची रशियन्सबद्दलची सूचना --- मूर्ख माणूस, तो मूर्ख आहेच. खोली, बाग --- आहा! हो, बाग."

तो कडकपणे ताठ बसला. त्याच्या डोळ्यात हिरवा प्रकाश दिसू लागला. तो उडी मारून जवळील खोलीत गेला.

“मिस लेमन, तुम्ही काय करत आहात ते सोडून माझ्यासाठी एक शोध लावायचे काम कराल का?”

“शोध लावायचे काम? मला वाटते , ते मला जमेल का --- “

पायरो तिचे बोलणे तोडत बोलला, “तुम्ही एक दिवस म्हणाला होतात, की तुम्हाला व्यापारी लोकांबद्दल चांगले समजते.”

मिस लेमन आत्मविश्वासाने म्हणाली, “हो, अगदी खात्रीपूर्वक.”

“मग गोष्ट अगदी साधी आहे. तुम्हाला चारमन्स ग्रीनला जावे लागेल. आणि तुम्हाला मासे विकणाऱ्या माणसाचा शोध घ्यावा लागेल.”

“मासे विकणाऱ्या माणसाचा शोध?” मिस लेमनने चमकून विचारले.

“अर्थात. रोझबँक येथे मासे पुरवणारा माणूस! तुम्हाला तो सापडला की तुम्ही त्याला काही प्रश्न विचारायचे आहेत.”

त्याने तिला एक कागद दिला. मिस लेमनने तो घेतला. काही रुची न घेता तो वाचला. मग मान हलवून टंकलेखन मशीनवर आवरण घातले.

पायरो म्हणाला. “आपण चारमन्स ग्रीनला बरोबर जाऊ. तू मासे विकणाऱ्याकडे जा आणि मी पोलीस स्टेशनला जातो. आपल्याला बेकर रस्त्यापासून अर्धा तास लागेल.”

त्या जागी आल्यावर, इन्स्पेक्टर सिम्सने त्याला अभिवादन केले. “मिस्टर पायरो, तुम्ही इथे झटपट आलेले दिसता. मी तुमच्याशी फक्त तासाभरापूर्वी फोनवर बोलत होतो.”

“मला तुम्हाला एक विनंती करायची आहे. तुम्ही मला या कतरिनाला भेटायची परवानगी द्या --- तिचे नाव काय आहे?”

“कतरिना रिगर. मला नाही वाटत की यासाठी माझी काही आडकाठी असेल.”

कतरिना नेहमीपेक्षा उदास दिसत होती. चेहरा उतरलेला होता.

पायरो तिच्याशी हळूवारपणे बोलला, “बाईसाहेब, मला तुम्हाला खात्रीपूर्वक सांगायचे आहे, की मी तुमचा शत्रू नाही. तुम्ही मला खरे काय ते सांगा.

तिचे डोळे घाईने विरोध दर्शवणारे झाले. “मी तुम्हाला सत्य काय ते सांगितले आहे. प्रत्येकाला मी सत्य सांगितले आहे. जर आत्याला विष दिले गेले असले, तर ते मी दिलेले नाही. हे सर्व चूक आहे. तुम्ही मला पैसे घेण्यास आडकाठी करत आहात.” तिचा

आवाज घोगरा झाला. त्याला वाटले, ती एखाद्या कोंडीत पकडलेल्या उंदरासारखी हतबल दिसते आहे.

“हे तुमच्याशिवाय कोणीच केले नसावे?

“मी असे म्हणाले, नाही का? त्यांनी मला त्या दिवशी दुपारी केमिस्टकडे पाठवले होते. मी ते माझ्या पर्समध्ये घालून घरी आणले --- हे जेवणापूर्वी झाले. मी खोके उघडून त्यातील एक गोळी मिस बॅरोबायला पाण्याबरोबर दिली.”

“तुम्ही सोडून कुणीही त्याला हात लावला नाही?”

“नाही.” कोंडीत पकडलेल्या उंदीर हतबलतेने बोलला.

“आणि मिस बॅरोबायला जेवणात फक्त तिला ज्याची शिफारस करण्यात आली होती, तेच दिले गेले. सूप, फिश पाय आणि सफरचंदाचा केक?

“हो.” निराशाजनक होकार. आशादायक न दिसणारे अंधारी पण ज्वाळेसारखे पेटलेले डोळे!

पायरोने तिचे खांदे थोपटले. “बाईसाहेब, धीर धरा. अजून जास्त स्वातंत्र्य असेल --- हो, आणि पैसा --- चैनीचे आयुष्य!”

तिने त्याच्याकडे संशयपूर्वक पाहिले.

ती बाहेर गेल्यावर सिम्स बोलला, “तुम्ही फोनवर काय बोललात, ते मला नीट कळले नाही --- काहीतरी मैत्रीण असलेल्या मुलीबद्दल.”

पायरो म्हणाला, “तिला एक मैत्रीण आहे. मी!” आणि सिम्सने काही शहाणपणा दाखवण्यापूर्वी तो पोलीस स्टेशनमधून बाहेर पडला.

चार

ग्रीनकॅट चहाच्या दुकानात मिस लेमनने तिच्या मालकाचा खोळंबा केला नाही. ती सरळ मुद्द्यावरच आली.

त्या माणसाचे नाव रूज असून, तो वरच्या रस्त्यावर असतो. तुम्ही म्हणालात, ते बरोबर आहे. बरोबर अठरा. तो काय म्हणाला, ते मी लिहून ठेवले आहे. तिने तो कागद त्याला दिला.

“अर्‌ र्‌” असा मांजराच्या खोल गुरगुरण्याचा आवाज आला.

पाच

हर्क्युल पायरो रोझबँकमध्ये आला. तो पुढील बागेत उभा राहिला. तेव्हा त्याच्यामागे सूर्य मावळत होता. मेरी डेलाफॉन्टेन बाहेर त्याच्याजवळ आली.

तिने नवलपूर्ण आवाजात विचारले, “मिस्टर पायरो, तुम्ही परत आलात?”

“हो, मी परत आलो.” थोडे थांबून, तो म्हणाला, “बाईसाहेब, मी पहिल्यांदा आलो, तेव्हा छोट्या मुलांचे गाणे माझ्या डोक्यात आले होते.

अग अग मिस मेरी तुझी बाग फुलते भारी

कालव शिंपले चांदीच्या घंटा सुंदर पऱ्यांनी सजल्या वाटा

“फक्त ते शंख शिंपले नाहीत, नाही का बाईसाहेब? ते कालव प्राण्याची कवचे आहेत.” त्याने हाताने ती दाखवली.

त्याने तिला श्वास रोखून धरताना पाहिले. आणि मग ती स्तब्ध उभी राहिली. तिच्या डोळयात प्रश्नचिन्ह होते.

त्याने मान डोलावली. हो, पण मला माहिती आहे. नोकराणीने जेवण तयार ठेवले होते. --- ती व कतरिना शपथ घेतील, की ते सर्व तुमच्याकडे आहे. फक्त तुम्ही आणि तुमच्या नवऱ्याला माहिती आहे, की अठरा कालव घरात आणले --- मोठ्या मनाने, आनंदाने मेजवानी देण्यासाठी म्हणून. कालवामध्ये स्ट्रायचिनाईन भरणे

अगदी सोपे होते. ते गिळले जाते --- ते असे आहे! पण बाहेरील कवच तसेच रहाते. ते कचऱ्याच्या बादलीत जायला नको. नाहीतर नोकराणी बघेल. त्यामुळे तुम्ही ते वाफ्याच्या कडेला लावायचा विचार केला --- पण ते पुरेसे नसल्याने, ओळ पूर्ण झाली नाही --- त्यामुळे ते चांगले दिसत नाही --- त्याने छान बागेची शोभा आणि सारखेपणा घालवला जातो आहे. ती काही कवचे वेगळी उठून दिसत आहेत --- माझ्या पहिल्या भेटीच्या वेळीच ती माझ्या डोळ्यांना खुपली.”

मेरी डेलाफॉन्टेन म्हणाली, “मला वाटले, तुम्हाला पत्रावरून समजले. आत्याने पत्र लिहिलेले मला माहिती होते. पण हे माहिती नव्हते, की तिने काय लिहिले आहे.”

पायरो टाळाटाळ करत उत्तरला, “ही काही कौटुंबिक गोष्ट आहे, एवढे मला माहिती होते. जर हा कतरीनाचा प्रश्न असता, तर मी यात पडलो नसतो. मला असे समजले आहे की तुम्ही आणि तुमचा नवरा मिस बॅरोबायच्या संपत्तीची देखभाल तुमच्या फायद्यासाठी करत असल्याचे तिच्या लक्षात आल्याने --- “

मेरी डेलाफॉन्टेनने मान डोलावली. “आम्ही हे खूप वर्षे करत होतो --- थोडे इकडे तिकडे. हे समजण्याइतकी ती हुशार असेल, असे आम्हाला कधीच वाटले नाही. मग आम्हाला तिने गुप्तहेराला

पत्र लिहिलेले समजले. आणि मी हेदेखील शोधून काढले, की ती तिचा पैसा कतरीनाला देणार आहे --- ती गरीब बिचारी!"

"म्हणून कतरीनाच्या झोपायच्या खोलीत स्ट्रायचिनाईन ठेवले गेले? मी तर्क करू शकतो. मला तुमचे काळे धंदे सापडायला नको. तुम्ही स्वतःचा व नवऱ्याचा बचाव करण्यासाठी तुम्ही निरागस मुलीवर खुनाचा आळ घालवायचा प्रयत्न केला. बाईसाहेब, तुम्हाला तिची दया आली नाही?"

मेरी डेलाफॉन्टेनने खांदे शहारवले --- तिचे विसरता न येणारे निळे डोळे पायरोच्या डोळयांकडे बघू लागले. तो पहिल्या दिवशी आला, तेव्हाचे तिचे झकास नाट्य आणि तिच्या नवऱ्याचे अडखळत बोलायचे प्रयत्न त्याला आठवले. असामान्य पण अमानुष बाई!

ती म्हणाली, "दया? त्या लुडबुड करणाऱ्या त्रासदायक उंदरीणीसाठी?" तिचा गर्व गळून पडला."

सावकाशीने पायरो बोलला, "बाईसाहेब, मला वाटते, तुमच्या आयुष्यात तुम्ही फक्त दोन गोष्टींसाठीच काळजी केलीत. एक म्हणजे तुमचा नवरा."

त्याने पाहिले, तिचे ओठ थरथरत होते.

"आणि दुसरी गोष्ट --- म्हणजे तुमची बाग."

त्याने सभोवताली पाहिले. ज्या फुलांकडे बघून त्याने काही केले होते आणि अजून काही करणार होता, त्यांच्याकडे नजर टाकून तो त्यांची क्षमा मागत आहे, असे वाटत होते.

PROBLEM AT SEA

# समुद्रावरील समस्या



जनरल फोर्ब्स म्हणाला, “कर्नल क्लॅपरटॉन!”

तो हे नाकातून जोराने चेष्टेखोर आवाज काढत व हुंगत म्हणाला.

मिस इली हेंडरसन पुढे झुकली. तिचे मऊ करडे केस तिच्या चेहऱ्याभोवती पसरले. तिचे डोळे गडद आणि चंचल होते. त्यांच्यात दुष्टपणा भरला होता.

“काय बळकट दिसणारा मनुष्य आहे!” ती कावेबाजपणे म्हणाली आणि तिची पाठ सरळ करत केसांच्या विखुरलेल्या बटांचा परिणाम बघू लागली.

जनरल फोर्ब्स गरजला, “बळकट!” त्याने त्याच्या सैन्यातील मिशा पिरगळल्या आणि त्याचा चेहरा चकाकीतपणे लाल झाला.

मिस हेंडरसन तिचे काम पूर्ण करत बोलली, “तो गार्डसमध्ये होता, नाही का?”

“गार्डस? गार्डस? मूर्खांची टोळी. तो संगीत हॉलमध्ये रंगमंचावर होता, हे खरे आहे. तिथे तो सामील झाला आणि फ्रान्सबाहेर तो फळांचे डबे हवाबंद करत होता. हन्सने फुकट गेलेला बॉम्ब टाकून दिला आणि तो हाताच्या मासातील जखम घेऊन घरी गेला. कसातरी कॅरिंगट्न बाईसाहेबांच्या दवाखान्यात पोचला.”

“म्हणजे ते असे भेटले तर.”

“खरे आहे. जखमी नायकावर उपचार केले गेले. कॅरिंगट्न बाईसाहेबांना काही भावना नव्हत्या आणि पैशांचा महापूर! वयस्क मिस्टर कॅरिंगट्न दारुगोळयाच्या कारखान्यात कामाला होता. ती सहा महिन्यांपूर्वी विधवा झाली होती. या माणसाने तिला

चुटकीसरशी आपलेसे केले. तिने त्याला लढाईच्या कार्यालयात नोकरी दिली. कर्नल क्लॅपरटॅान! वाईट माणूस!" तो गरजला.

करड्या केसांचा भारदस्त कर्नल क्लॅपरटॅान आणि लाल नाकवाला मनोरंजन करणारी गाणी म्हणणारा विनोदी गायक यांच्यातील दुवा सांधत, मिस हेंडरसन जोराने बोलली "आणि लढाईपूर्वी तो संगीताच्या हॅालमध्ये रंगमंचावर होता."

जनरल फोर्ब्स म्हणाला, "मी हे वयस्क बॅसिंग्टन- फ्रेंचाकडून ऐकले आणि त्याने वयस्क बॅडगर कॅाटेरीलकडून ऐकले आणि त्याने स्नूक्सपार्करकडून ऐकले."

मिस हेंडरसनने खूष होत मान हलवली. ती बोलली, "यामुळे हे पक्के झाले."

त्यांच्याजवळ बसलेल्या छोट्या माणसाच्या चेहऱ्यावर हास्य तरळले. मिस हेंडरसनच्या ते लक्षात आले. ती चांगली निरीक्षक होती. त्यामुळे तिच्या शेवटच्या शेऱ्याच्या विरोधाभासातील स्तुती दिसून येत होती --- जनरलला जराही संशय न आलेला विरोधाभास!

जनरलला स्वतःला ते हास्य जाणवले नाही. त्याने घड्याळाकडे पाहिले. उठला आणि म्हणाला, "व्यायाम. बोटीवर

प्रत्येकाने स्वतःला सुदृढ ठेवले पाहिजे.” एवढे बोलून तो उघड्या डेकवर गेला.

मिस हेंडरसनने हसणाऱ्या माणसाकडे नजर टाकली. तो चांगल्या पद्धतीने टाकलेला कटाक्ष होता. ती त्या प्रवाश्याबरोबर संभाषण करायला उत्सुक होती.

छोटा माणूस बोलला, “तो उत्साही आहे, नाही का?”

मिस हेंडरसन म्हणाली, “तो डेकवर अठ्ठेचाळीस फेऱ्या मारतो. काय चपळ म्हातारा आहे! आणि ते म्हणतात आपण कुणाकुणाची प्रकरणे चघळत बसतो.”

“किती ही शिरजोरी!”

मिस हेंडरसन म्हणाली, “फ्रेंच लोक नेहमी नम्र असतात ---

तिच्या आवाजात प्रश्नार्थकता होती.

छोट्या माणसाने लगेच उत्तर दिले, “बाईसाहेब, बेल्जियन.”

“ओहो, बेल्जियन.”

”तुमच्या सेवेसाठी हर्क्युल पायरो.”

त्यामुळे काही आठवणी जाग्या झाल्या. तिने नक्कीच ते नाव पूर्वी ऐकले होते का?

“मिस्टर पायरो, तुम्ही या सहलीचा आनंद लुटत आहात का?”

“खरे तर नाही. मला मूर्खपणामुळे इथे यायला लागले आहे. मला समुद्रप्रवास आवडत नाही. तो कधीही शांत नसतो --- नाही, एक मिनिटदेखील नाही.”

“पण तुम्ही आता कबूल कराल, की तो अगदी शांत आहे.”

पायरोने ते कसेबसे कबूल केले. “या क्षणी तसे आहे. हो. मी म्हणूनच मी पुन्हा नवचैतन्याने भारलो आहे. मी परत माझ्याभोवती काय चालले आहे यात रस घेऊ लागलो आहे --- उदाहरणार्थ, तुमचे जनरल फोर्ब्सला कुशलतेने हाताळणे.”

“तुम्हाला म्हणायचे --- “ मिस हेंडरसन बोलतांना थांबली.

पायरो लवला. “काही प्रकरणे खोडून काढण्याचे कौशल्य खरेच कौतुकास्पद आहे, असे मला म्हणायचे होते.”

मिस हेंडरसन मोकळेपणे हसली. “ते गार्ड म्हणून काम करायचे? मला माहिती होते ते त्या म्हाताऱ्याला गुरगुरायला व धापा टाकायला लावेल.” ती आत्मविश्वासाने पुढे वाकली. “मी कबूल करते, मला प्रकरणे चघळायला आवडतात --- जितके दुष्टावा भरलेले, तेवढे अधिक चांगले!”

पायरोने विचारपूर्वक तिच्याकडे बघितले --- तिची बारीक व्यवस्थित राखलेली शरीरयष्टी, तिचे काळे चाणाक्ष डोळे, करडे केस; पंचेचाळीशीची, तिच्या वयाला योग्य अशी ती दिसत होती.

इली अचानक म्हणाली, "मला माहिती आहे! तुम्ही थोर गुप्तहेर आहात ना?"

पायरो वाकला. "बाईसाहेब, तुम्ही फार मिळून मिसळून वागणाऱ्या आहात." पण त्याने जबाबदारी टाळली नाही.

मिस हेंडरसन म्हणाली, "किती रोमांचक! पुस्तकात म्हणतात, तसे *'तुम्ही तुमच्या कामात वाकबगार आहात.'* आहात का? आमच्यामध्ये कुणी गुन्हेगार दडलेला आहे का? की मी काही चुकीचे बोलले?"

"नाही. अजिबात नाही. तुमच्या अपेक्षा मी पूर्ण करू शकत नाही, याबद्दल दिलगीर आहे. पण इथे मी इतर चारजणांसारखाच आहे. माझे स्वतःचे मनोरंजन करण्यासाठी."

हे तो इतक्या पडलेल्या आवाजात बोलला, की मिस हेंडरसन हसायला लागली.

"ओहो, ठीक आहे. उद्या अलेक्झांड्रीयाला आपण किनाऱ्याला लागू. तुम्ही यापूर्वी इजिप्तला आला आहात का?"

"कधीच नाही."

मिस हेंडरसन अचानक उभी राहिली. तिने जाहीर केले, “मला वाटते मी नियमाप्रमाणे जनरलकडे जाते.”

पायरो नम्रपणे उभा राहिला. तिने त्याच्याकडे थोडे झुकून पाहिले आणि डेककडे चालू लागली.

पायरोच्या डोळ्यात क्षणभर काही गोंधळलेले भाव दिसले. मग त्याच्या ओठांवर हसू उमटले. तो उठला व दारातून जात खालील डेककडे नजर टाकली. मिस हेंडरसन कठड्याला टेकून, कुण्या उंच सैनिकासारख्या दिसणाऱ्या माणसाशी बोलत होती.

पायरोचे हसू वाढले. कासव जसे काळजीपूर्वक त्याचे अंग कवचाखाली ओढून घेते तसा तो परत सिगरेट ओढायच्या खोलीत गेला. जास्त वेळ तिथे थांबायला नको अशा विचाराने तो थोड्या वेळाने तिथून बाहेर पडला.

मिसेस क्लॅपरटॉनने तिचे जाळीतले प्लॅटीनमचे सुरक्षित डोके हलवले. तिचे मसाज केलेले व हलका आहार घेतलेले शरीर आधुनिक खेळाच्या कपड्यात झाकलेले होते. तिला गरज असलेले काही पैसे मोजून विकत घेऊ शकणारी ती, मोठ्या डौलाने बारच्या दारातून बाहेर आली.

ती बोलली, “जॉन --- ? ओहो! शुभ सकाळ, मिस्टर पायरो, तुम्ही जॉनला पाहिलेत का?”

“बाईसाहेब, तो डेकवर आहे. मी --- “

तिने आविर्भावाने त्याला नको असे सांगितले. “मी इथे एक मिनिट बसते.” असे म्हणून ती त्याच्यासमोरील खुर्चीवर राजेशाही थाटात बसली. लांबून ती अठ्ठावीसची वाटत होती पण तिच्या भारी मेकप केलेल्या, भुवया कोरलेल्या चेहऱ्यावरून ती एकोणपन्नास वर्षांची नव्हे तर साधारण पंचावन्न वर्षांची दिसत होती. तिचे डोळे छोट्या पापण्या असलेले व निळे होते.

“मी तुम्हाला काल जेवणाच्या वेळी पाहिले नाही, त्याबद्दल दिलगीर आहे. अर्थात समुद्राच्या लाटांमुळे सावली आली होती --- “

पायरो मनापासून बोलला, ‘असेल.”

मिसेस क्लॅपरटॉन म्हणाली, “माझ्या कमकुवत हृदयासकट मी, नशीबाने बोटीच्या प्रवासाला सरावलेली आहे. जर मला बोट लागली, तर बहुधा माझे मरणच ओढवेल.”

“बाईसाहेब, तुमचे हृदय कमकुवत आहे?”

“हो. मला फार काळजी घ्यायला हवी. मला माझी फार दमणूक करता कामा नये, सगळे डॉक्टर असेच म्हणतात. तिच्या आरोग्यासंबंधीच्या आवडत्या विषयावर, ती खुषीने बोलत राहिली. “जॉन, बिचारा माझा आवडता, सारखा मला जास्त श्रम

करण्यापासून रोकत असतो. मिस्टर पायरो, मला काय म्हणायचे आहे, ते तुम्हाला समजले असेल, नाही का?"

"हो. हो."

"तो मला नेहमी म्हणतो, "नेहमी भाज्या खात जा, ते चांगले राहील. पण मी तसे करू शकत नाही. आयुष्य जगण्यासाठी असते, असे मला वाटते. खरे तर मी मला एक युद्धातील मुलगी समजते. माझे हॉस्पीटल --- तुम्ही त्याबद्दल ऐकले आहे का? अर्थात माझ्याकडे परिचारिका व व्यवस्थापिका असतात --- पण मी ते चालवते." तिने एक सुस्कारा टाकला.

पायरो थोड्या यांत्रिकपणे पण दुसऱ्याला आश्वस्त करण्याच्या युक्तीने बोलला, "तुमची स्वतःला बळकट राखून कामात गुंतवून ठेवण्याची प्रवृत्ती स्पृहणीय आहे."

मिसेस क्लॅपरटॉन एखाद्या मुलीसारखी हसली.

"सर्वजण मला सांगतात, मी किती तरुण आहे! ते चुकीचे आहे. मी त्रेचाळीस वर्षांपेक्षा एकही दिवस कमी असल्याचे ढोंग करत नाही." तिने थोड्या खोटेपणाचे, पण तरीही प्रामाणिक असल्याचे वर्तन चालू ठेवले. "पण मला भेटलेल्या बऱ्याच लोकांना विश्वास ठेवणे अवघड जाते, की 'मी एवढी जिवंत,

रसरशीत कशी' पण मिस्टर पायरो, असे नसेल तर मग जगून काय उपयोग?"

पायरो म्हणाला, "मृतवत."

मिसेस क्लॅपरटॉन हसली. उत्तर तिला आवडणारे नव्हते. तिने ठरवले, की हा मनुष्य आपल्याला हसवायला बघतो आहे. ती उठून थंडपणे बोलली, "मला जॉनला शोधले पाहिजे."

ती दारातून बाहेर गेल्यावर, तिच्या हातातील बॅग सांडली. त्यातील वस्तू इकडेतिकडे विखुरल्या गेल्या. पायरो लगेच तिच्या सुटकेसाठी धावला. लिपस्टिक, मेकपचे सामान, सिगरेट केस, लायटर आणि इतर फुटकळ सामान गोळा केले गेले. मिसेस क्लॅपरटॉनने नम्रपणे त्याचे आभार मानले. मग ती डेक उतरून जॉनला हाका मारू लागली.

कर्नल क्लॅपरटॉन अजून मिसेस हेंडरसनबरोबरील संभाषणात गुंग होता. तो गरकन वळून, त्याच्या बायकोला भेटला. तो तिच्यावर संरक्षणपर वाकला. डेकवरील तिची खुर्ची --- ती योग्य जागेवर होती का? ती अजून चांगल्या रीतीने ठेवता आली असती का? त्याच्या पद्धती नम्र होत्या. त्यात हळूवार दखल घेणारा भाव होता. स्पष्टपणे ती एकमेकांना मान देणारी जोडी दिसत होती. पण नवरा बायकोला बिघडवत होता.

मिस इली हेंडरसनने क्षितिजाकडे पाहिले, जसे काही तिला तिथे काही उबग आणणारे दिसले.

सिगरेट ओढायच्या खोलीच्या दारात उभा राहून पायरो बघत होता.

त्याच्यामागून घोगऱ्या थरथरणाऱ्या आवाजात कुणी बोलले, “मी तिचा नवरा असतो, तर मी तिच्यावर हातातील छोटी कुऱ्हाड चालवली असती.”

चहाच्या मळ्यातील तरुण बागायतदारांचा तो फारसा मान नसलेला आजोबा होता. तो तिथे नुकताच आला होता. त्याने हाक मारली, “मुलांनो, मला एक पेलाभरुन व्हिस्की आणा.”

पायरोने मिसेस क्लॅपरटॉनच्या बॅगेतून पडलेल्या फाटक्या कागदाच्या कपट्यावरील गोष्टींवरून नजर फिरवली. ती डीगीटॅलीन हे औषध लिहिलेली डॉक्टरांची औषधांची यादी होती. मिसेस क्लॅपरटॉनला नंतर ती परत करायच्या इराद्याने, त्याने ती खिशात ठेवली.

वयस्क उतारू म्हणाला, “विषारी बाई! मला अशी ८७ सालची एक पुण्याची बाई आठवते.”

पायरोने चौकशी केली, “कोणी तिच्यावर हातातील छोटी कुऱ्हाड चालवली का?”

वयस्क माणसाने दुःखाने नकारार्थी मान हलवली.

ती तिच्या नवऱ्याला एका वर्षात स्मशानात घालवणार आहे. क्लॅपरटॉनने तिच्यापासून जपून रहायला हवे. तो बायकोच्या फारच पुढे पुढे करतो.”

पायरो थंडपणे म्हणाला, “ती लगाम आपल्या हातात ठेवते.”

वयस्क माणूस हसत म्हणाला, “तू अगदी यथार्थ वर्णन केलेस. लगाम आपल्या हातात ठेवते. हा, हा!”

दोन मुली सिगरेट ओढायच्या खोलीत आल्या. एकीचा चेहरा गोल असून त्यावर तपकिरी डाग होते. तिचे काळे केस वाऱ्यावर कसेही उडत होते. दुसरीच्या पण चेहऱ्यावर तपकिरी डाग होते. आणि तिचे केस कुरळे होते.

कीटी मुने ओरडली, “एक सुटका --- एक सुटका --- पाम आणि मी कर्नल क्लॅपरटॉनची सुटका करणार आहोत.

पामेला क्रेगन धापा टाकत बोलली, “त्याच्या बायकोपासून.”

“आम्हाला तो तिने पाळलेला वाटतो --- “

दोघी मुली उद्गारल्या, “आणि ती भयंकर आहे --- ती त्याला काही करू देत नाही.”

“आणि तो तिच्याबरोबर नसेल, तर बहुधा तो हेंडरसन बाईच्या ताब्यात असतो --- “

“ती तशी चांगली आहे, पण फार म्हातारी आहे --- “

त्या दोघी हसता हसता, धापा टाकत, पळून गेल्या. “एक सुटका --- एक सुटका’ असे त्या ओरडत होत्या.

कर्नल क्लॅपरटॉनची सुटका, हे काही एकारलेले साहस नव्हते. तर ते ठरलेले काम होते. हे त्या संध्याकाळी स्पष्ट झाले, जेव्हा अठरा वर्षांची पामेला क्रेगन हर्क्युल पायरोजवळ पुटपुटली, “मिस्टर पायरो, आमच्यावर नजर ठेवा. त्याला तिच्या नाकाखालून आम्ही खेचून काढणार आहोत. आणि चंद्रप्रकाशात बोटीच्या डेकवर त्याला फिरायला घेऊन जाणार आहोत.”

त्याच क्षणी कर्नल क्लॅपरटॉन म्हणत होता. “मी तुला रोल्स राइसची किंमत देतो. पण ते आयुष्यभरासाठी व्यावहारिक दृष्ट्या चांगले आहे. आता माझी गाडी --- “

मिसेस क्लॅपरटॉनचा आवाज मोठा आणि कानात घुसणारा होता, “माझी गाडी, मला वाटते, जॉन.”

तिच्या उद्धटपणावर तो चिडला नाही. एक तर आतापर्यंत, त्याला त्याची सवय झाली होती किंवा ---

पायरो म्हणाला, “किंवा काय?” आणि स्वतःचा तर्क लढवू लागला.

क्लॅपरटॉन बायकोपुढे वाकला व जराही न अडखळता त्याचे बोलणे पुरे केले. “प्रिये, नक्की, तुझी गाडी.”

पायरोने विचार केला, ‘असे दिसते, की तो पक्का साहेब आहे. पण जनरल फोर्ब्स म्हणतो, की क्लॅपरटॉन हा सभ्य माणूस मुळीच नाही. मला आश्चर्य वाटते.”

ब्रिज खेळायचे सुचवले गेले. मिसेस क्लॅपरटॉन, जनरल फोर्ब्स आणि ससाण्याच्या डोळ्यांचे जोडपे ब्रिज खेळू लागले. मिस हेंडरसनने काही कारण सांगितले व ती डेकवर गेली.

जनरल फोर्ब्सने विचारले, “तुझ्या नवऱ्याचे काय? मिसेस क्लॅपरटॉन कशीबशी बोलली, “जॉन खेळत नाही. तो फार दमला आहे.”

ब्रिज खेळणारे चौघे पत्ते टाकू लागले.

पाम आणि कीटीने कर्नल क्लॅपरटॉनकडे मोर्चा वळवला. प्रत्येकीने त्याचा एकेक हात धरला. पाम बोलली, “तुम्ही आमच्याबरोबर येत आहात. बोटीच्या डेकवर छान चंद्रप्रकाश आहे.”

मिसेस क्लॅपरटॅान बोलली, “जॉन, मूर्खपणा करू नकोस. तुला सर्दी होईल.”

कीटी बोलली, ‘आम्ही फार तरुण व उत्शृंखल असल्याने, तो आमच्याबरोबर येणार नाही.”

तो हसत हसत त्यांच्याबरोबर गेला.

पायरोने निरीक्षण केले की मिसेस क्लॅपरटॅानने तिच्या पहिल्या दोन किल्वरना काहीच म्हटले नाही.

पायरो डेकवर चालायला गेला. तिथे कठड्याला टेकून मिस हेंडरसन उभी होती. तिने काही अपेक्षेने आजूबाजूला बघितले. तो शेजारी येऊन उभा राहिल्यावर, तिची थोडी निराशा झाल्यासारखे त्याला वाटले.

त्यांनी थोडा वेळ गप्पा मारल्या. मग तो जेव्हा गप्प झाला, तेव्हा तिने विचारले, “तुम्ही काय विचार करत आहात?”

पायरो उत्तरला, “मी माझ्या इंग्लिशच्या ज्ञानाबद्दल साशंक आहे. मिसेस क्लॅपरटॅान म्हणाली, “जॉन ब्रिज खेळत नाही. ‘तो दमला आहे’ ही नेहमीची बोलायची पद्धत नाही का?”

इली कोरडेपणे म्हणाली, “तो तिचा अपमान झाला, असे ती समजते आहे. खरे तर त्याचा तसा काही हेतू नव्हता. ज्या माणसाने तिच्याशी लग्न केले, तो मूर्खच असला पाहिजे.”

अंधारात पायरो हसला. तो बचाव करत बोलला, “लग्न यशदायी असू शकते, यावर तुमचा विश्वास नाही का?”

“अशा बाईबरोबर?’

पायरोने त्याचे खांदे शहारवले.

“कित्येक वाईट बायकांचे नवरे एकनिष्ठ असतात. स्वभावाच्या अगम्यतेमुळे ती म्हणते, त्यातील कशानेच तो चिडत नाही, हे तुम्ही मान्य कराल.” मिस हेंडरसन उत्तर द्यायला बघत होती, तेव्हा सिगरेट ओढायच्या खोलीच्या खिडकीतून मिसेस क्लॅपरटॉनचा आवाज वहात आला.

“नाही --- मला नाही वाटत, की मी अजून एक रबर खेळेन. इतके कोंदट! मला वाटते मी बोटीच्या डेकवर जाऊन थोडी मोकळी हवा मिळवावी.”

मिस हेंडरसन म्हणाली, “शुभ रात्र, मी झोपायला चालले.” ती एकदम चालू पडली.

पायरो बोटीतील आरामशीर खोलीकडे सावकाशीने जाण्यासाठी निघाला. तिथे कर्नल क्लॅपरटॉन व दोन मुली सोडून कुणी नव्हते. तो त्यांना पत्त्यांच्या जादू करून दाखवत होता. पायरोला संगीताच्या हॉलच्या रंगमंचावरील जनरलची गोष्ट आठवली.

त्याचे पत्ते हाताळण्यातले व पिसण्यातले कसब पाहून, त्याने शेरा मारला, "तुम्ही ब्रिज खेळत नसलात तरी तुम्ही पत्त्यात चांगला रस घेत आहात."

क्लॅपरटॉन मोहकपणे हसत म्हणाला, "ब्रिज न खेळण्याची माझी कारणे आहेत. "मी तुम्हाला दाखवतो. आपण एक जादू करू."

त्याने जोरात पत्ते पिसले. "तुम्ही एकेक पान उचला. ठीक आहे. ते कोणते आहे सांगा." तो कीटीच्या घाबरलेल्या चेहऱ्याकडे बघून हसला. त्याने त्याचा हात खाली ठेवला. आणि इतर सगळ्यांना त्यांनी पत्ते वाटल्यावर त्या प्रत्येकाने निवडलेल्या पत्याचा पूर्ण डाव त्यांना आला. अगदी दुरीपासून एक्क्यापर्यंत! कीटीने सबंध किल्वरचा डाव धरला. मिस्टर पायरोने बदाम, पामने चवकट आणि क्लॅपरटॉनने हुकुम, इस्पिकचा.

तो म्हणाला, "हे बघा, जो माणूस पत्त्यांच्या अशा जादू करू शकतो, त्याला ब्रिज खेळणे म्हणजे इतर भिडूंना फसवण्यासारखे आहे. जर नशीब फारच त्याच्या बाजूने असेल, तर कदाचित त्याच्याबद्दल वाईट प्रकारच्या गोष्टी बोलल्या जाऊ शकतील."

कीटी दम टाकत बोलली, "तुम्ही असे कसे काय करू शकता? हे वरवर बघायला अगदी सर्वसामान्य वाटते."

पायरो नीतीमत्तापूर्वक म्हणाला, “हातचलाखीमुळे डोळे फसतात --- त्याने कर्नलच्या हावभावांमध्ये अचानक फरक पडलेला पाहिला.

त्याला जणू जाणवले, की तो त्याच्या संरक्षणकर्तीपासून क्षणभर दूर आला आहे.

पायरो हसला. जादुगाराने त्याचा पक्क्या साहेबाचा मुखवटा दाखवला.

दुसऱ्या दिवशी सकाळी बोट आलेक्झांड्रीयाला पोचली.

पायरो न्याहारीसाठी आला, तेव्हा त्याने दोन मुलींना आधीच किनाऱ्यावर जातांना पाहिले. त्या कर्नल क्लॅपरटॉनशी बोलत होत्या.

कीटी काकुळतीने बोलली, ‘आता आपल्याला निघाले पाहिजे. पासपोर्टचे लोक बोटीवरून निघाले असतील. तुम्ही आमच्याबरोबर याल ना? तुम्ही आम्हाला दोघीनाच जाऊ देणार नाही ना? आम्हाला काही घाबरवणारी गोष्ट होईल.”

क्लॅपरटॉन म्हणाला, “नक्कीच. मला नाही वाटत तुम्ही दोघीनीच जावे. पण माझ्या बायकोला काय वाटेल, कुणास ठाऊक!”

पाम बोलली, “हे फार वाईट आहे. पण तिला मोठीच्या मोठी विश्रांती मिळेल.”

कर्नल क्लॅपरटॉन थोडा संभ्रमित वाटला. अर्थात जादुगार कर्नलची इच्छा जबरदस्त होती. त्याने पायरोला आलेले पाहिले.

“हॅलो पायरो, तुम्ही किनाऱ्यापासून दूर चालला आहात का?”

पायरो उत्तरला, “नाही. तसा माझा विचार नाही.”

कर्नल क्लॅपरटॉनने ठरवले, “मी --- मी --- ॲडेलाइनशी थोडे बोलून येतो.”

पाम म्हणाली, “आम्ही तुमच्याबरोबर येतो. तिने पायरोला डोळा मारला. ती थंडपणे पुढे म्हणाली, “कदाचित आम्ही येण्यासाठी तिचे मन वळवू शकू.”

कर्नल क्लॅपरटॉनला ही कल्पना पसंत पडल्याचे दिसले. त्याने सुटकेचा निःश्वास टाकला.

तो सहजपणे म्हणाला, “तुम्ही दोघी चला तर मग. ते तिघे डेकच्या दुसऱ्या बाजूच्या पॅसेजने गेले.

क्लॅपरटॉनच्या समोरच त्याची खोली असलेला पायरो कुतूहल वाटून त्यच्या मागोमाग गेला.

खोलीच्या दाराशी कर्नल क्लॅपरटॉन थोडा उदास होऊन उभा होता.

“ॲडेलाइन प्रिये, तू जागी आहेस का?”

आतून मिसेस क्लॅपरटॉनचा झोपाळू आवाज आला, “ओहो, काय त्रास आहे?”

“मी जॉन आहे. किनाऱ्यावर जायचे का?”

“अर्थातच नाही.” तिचा आवाज फसवा आणि किनरा होता. “माझी रात्र फार वाईट गेली. मी आता दिवसभरात अंथरुणातून बाहेर येणार नाही.”

पाम झटकन म्हणाली, “ओहो, मिसेस क्लॅपरटॉन, मला माफ करा. तुम्ही आम्हाला आमच्याबरोबर यायला हव्या आहात. तुम्ही न येण्याबद्दल ठाम आहात का?”

मिसेस क्लॅपरटॉनचा आवाज अजूनच किनरा वाटला, “हो, मी त्याबद्दल अगदी ठाम आहे.

कर्नल दाराची मूठ फिरवत होता. पण ते उघडत नव्हते.

“जॉन, काय झाले? दार कुलुपबंद आहे. मला कोणाची लुडबुड नको आहे.”

“प्रिये, मला माफ कर. पण मला प्रवासाचे गाईड हवे होते.”

मिसेस क्लॅपरटॉनने फटकारा दिला, “नाही. तुला ते मिळू शकणार नाही. मी अंथरुणातून बाहेर पडणार नाही आहे. जॉन, मला थोडी शांतता लाभून देशील का?”

”प्रिये, नक्की. नक्की. ”कर्नल दारापासून मागे वळला. पाम आणि कीटी त्याच्या जवळून चालू लागल्या.

“चला, आपण लगेच जाऊ. बरे झाले तुमची टोपी तुमच्या डोक्यावर आहे. ओहो, छान --- तुमचा पासपोर्ट खोलीत राहिला नाही ना?”

कर्नल बोलला, “खरे तर तो माझ्या खिशात आहे.”

कीटीने त्याचा हात पकडला. ती ओरडली, “विजय असो. चला आता निघू.”

पायरोने तिघांना बोटीतून बाहेर पडलेले बघितले. त्याने त्याच्या शेजारून श्वासाचा आवाज ऐकला आणि ती मिस हेंडरसन होती. तिचे डोळे त्या बाहेर पडणाऱ्या तिघांवर खिळले होते.

ती निरलसपणे बोलली, “ते किनाऱ्यावर गेले तर!

“हो. तुम्ही जात आहात का?”

तिच्या डोक्यावर सावलीसाठी टोपी, हातात बॅग व पायात बूट असल्याचे पायरोने पाहिले. तिचा थाट तर किनाऱ्यावर निघाल्याचा होता. पण थोड्या वेळाने तिने डोके हलवले.

ती म्हणाली, “नाही. मला वाटते, मी बोटीवरच रहावे. मला बरीच पत्रे लिहायची आहेत.”

ती वळून गेली.

डेकवर त्याच्या अठ्ठेचाळीस फेऱ्या मारून झाल्यावर, जनरल फोर्ब्स पायरोशेजारी येऊन उभा राहिला. कर्नल आणि दोन मुलींना जाताना बघून तो उद्गारला, “आहा, असा खेळ चालू आहे तर! आणि बाईसाहेब कुठे आहेत?”

पायरोने स्पष्ट केले की ती लोळून दिवस काढणार आहे.

एक डोळा मिटून तो योद्धा म्हणाला, “तुमचा यावर विश्वास बसतो? ती आता खाण्यासाठी येईल --- आणि तिचा नवरा तिची पूर्वपरवानगी न घेता इथे नसेल, तर मोठे भांडण होणार आहे.”

पण जनरलची अपेक्षापूर्ती झाली नाही. मिसेस क्लॅपरटॉन जेवायला आलेली दिसली नाही. तोपर्यंत चार वाजता, कर्नल व त्या दोन तरुण मुली हे तिघे बोटीवर परत आले. ती कुठे दिसली नाही.

पायरो त्याच्या खोलीत होता. नवऱ्याची दारावर मारलेली थोडीशी अपराधी थाप त्याच्या खोलीतून त्याला ऐकू आली. ती पुन्हा पुन्हा वाजत राहिली. दार उघडायचा प्रयत्न झाला. आणि शेवटी कर्नलची बोटीच्या रक्षकाला मारलेली हाक ऐकू आली.

“हे बघ, मला काही उत्तर मिळत नाही. तुझ्याकडे किल्ली आहे का?

पायरो घाईने अंथरुणातून उठला. पॅसेजमध्ये आला. आगीसारखी बातमी बोटभर पसरली. भयंकर अविश्वासार्ह अशी बातमी लोकांनी ऐकली, की मिसेस क्लॅपरटॉन तिच्या अंथरुणात हृदयात देशी सुरा खुपसलेल्या अवस्थेत मेलेली सापडली. तिच्या खोलीत पिवळ्या रंगाच्या मण्यांची माळ जमिनीवर पडलेली सापडली.

अफवांवर अफवा उठू लागल्या. सगळ्या मण्यांच्या माळा विकणाऱ्यांना पकडून प्रश्न विचारण्यात आले. खोलीतील खणातून बरीच रक्कम चोरीला गेली होती. नोटांचा मागोवा घेतला गेला. मागोवा घेतला गेलाही नाही. मोठ्या रकमेचे दागिनेही चोरीला गेले. दागिने अजिबात चोरले गेले नाहीत. रक्षकाला अटक करण्यात आली. आली नाही. त्याने खून केल्याचा संशय घेण्यात आला. आला नाही.

.मिस इली हेंडरसनने पायरोला गाठून विचारले, “यातील खरे काय आहे? तिचा चेहरा त्रासलेला होता आणि फिका पडला होता.

“अहो बाई, मला कसे माहिती असेल?”

मिस हेंडरसन म्हणाली, “अर्थात तुम्हाला माहिती आहे.”

संध्याकाळी उशीरा बहुतेक लोक त्यांच्या खोल्यांमध्ये परतले होते. मिस हेंडरसनने पायरोला छत असलेल्या बोटीच्या भागातील खुर्च्यांकडे नेले. तिने आज्ञा केली, “आता मला सांगा.”

पायरोने तिचे नीट निरीक्षण केले. तो म्हणाला, “ही रुचीपूर्ण केस आहे.”

“हे खरे आहे का, की तिचे किमती दागिने चोरीला गेले?”

पायरोने त्याचे डोके हलवले. “नाही. नाही. दागिने चोरले गेले नाहीत. तरी खणात पुढेच असलेली किरकोळ रक्कम नाहीशी झाली.”

मिस हेंडरसन थरथरत म्हणाली, “यापुढे मला बोटीवर कधीही सुरक्षित वाटणार नाही. त्या कॉफीच्या रंगाच्या लोकांपैकी कुणी हलकटांनी हे केले?”

पायरो बोलला, “नाही. हे सगळे जरा विचित्र आहे.”

इलीने कडकपणे विचारले, “म्हणजे काय?”

पायरोने त्याचे हात पसरले. “ठीक आहे. काय झाले, ते बघू. मिसेस क्लॅपरटॅान ही मेलेली सापडली, त्यापूर्वी निदान पाच तास मेली होती. काही पैसे गेले होते. तिच्या अंथरुणाशेजारील जमिनीवर मण्यांची माळ पडली होती. दार कुलुपबंद होते आणि

किल्ली हरवली होती. खिडकी --- तोफगोळे मारण्याचा झरोका नव्हे --- डेकवर उघडणारी खिडकी उघडी होती.”

त्या बाईने अधीरतेने विचारले, “मग?”

“अशा परिस्थितीत केला गेलेला खून फार हुशारीने केलेला तुम्हाला वाटत नाही का? लक्षात ठेवा, बोटीवरील पोस्टकार्ड विकणारे, पैशांचा विनिमय करणारे आणि मणी विकणारे हे सर्वजण पोलिसांना माहिती असतात.”

इलीने सुचवले, “हे रक्षक लोक नेहमी तुमची खोली कुलुपबंद करतात.”

“बरोबर. यामुळे भुरट्या चोऱ्यांची शक्यता नाहीशी होते. पण हा --- खून होता.”

तिचा आवाज थोडा दमलेला वाटला. “मिस्टर पायरो, तुम्ही नेमका काय विचार करत आहात?”

“मी कुलुपबंद खोलीचा विचार करतो आहे.”

मिसेस हेंडरसनला ते पटले नसावे. “मला त्यात विशेष असे काही वाटत नाही. तो माणूस दारातून बाहेर पडतो. दार कुलुपबंद करतो. किल्ली स्वतःकडे ठेवतो. जेणेकरून खून झालेला कुणाच्या लगेच लक्षात येणार नाही. ही त्याची हुशारी होती. कारण तो दुपारी चारपर्यंत उघडकीला आला नाही.”

“नाही, नाही, बाईसाहेब, मला म्हणायचे आहे ते तुम्हाला समजत नाही आहे. तो बाहेर कसा पडला याची मला चिंता नाही पण तो आत कसा गेला हे मला समजत नाही.”

“अर्थात खिडकीतून.”

“हे शक्य आहे. पण ती फार अरुंद आहे --- आणि हे लक्षात ठेवा, की डेकवर सर्व वेळ लोक येत जात होते.”

मिसेस हेंडरसनला अधीरपणे म्हणाली, “मग दारातून.”

“पण बाईसाहेब, तुम्ही हे विसरता आहात, की मिसेस क्लॅपरटॉनने दार आतून बंद केले होते. आजच्या सकाळी कर्नल क्लॅपरटॉनने बोट सोडण्यापूर्वी, तिने ते आतून बंद केले होते. त्याने तिला हाक मारून ते उघडायला लावायचा प्रयत्न केला होता, ते आपल्याला माहिती आहे.”

“काहीतरी काय! बहुतेक ते अडकून बसले --- किंवा त्याने हँडल नीट फिरवले नाही.”

“पण आपण फक्त त्याच्या बोलण्यावर जात नाही आहोत. मिसेस क्लॅपरटॉन आतून बोलल्याचेही आपण जाणतो.”

“आपण?”

“मिस मूने, मिस क्रेगन, कर्नल क्लॅपरटॉन आणि मी स्वतः.”

इली हेंडरसन तिच्या पायातील बूट वाजवत राहिली. एक दोन क्षण ती गप्प राहिली. मग ती थोड्या चिडक्या आवाजात बोलली, ''ठीक आहे. त्यावरून तुम्ही नेमका काय निष्कर्ष काढता? मला वाटते, जर मिसेस क्लॅपरटॉन आतून दार लावू शकते, तर उघडूही शकते.''

पायरो उजळत्या चेहऱ्याने तिला बोलला, ''नक्की. नक्की. आणि हे आपल्याला कुठे नेते ते बघा. मिसेस क्लॅपरटॉनने दार उघडून खुन्याला आत घेतले. आता असे बघा, ती माल विकणाऱ्यासाठी हे करू शकते का?''

इलीने हरकत घेतली. ''तिला बाहेर कोण आहे ते माहिती नव्हते. त्याने दारावर टकटक केले असेल --- तिने उठून दार उघडले असेल --- आणि त्याने जबरदस्तीने आत घुसून तिला मारले असेल.''

पायरोने डोके हलवले. नेहमीचा विनोद! तिच्या अंगात सुरा खुपसला गेला, तेव्हा ती शांतपणे अंथरुणात पहुडलेली होती.''

मिस हेंडरसन त्याच्याकडे रोखून बघत राहिली. तिने मध्येच विचारले, ''तुमची कल्पना तरी काय आहे?''

पायरो हसून बोलला, ''असे बघा, मला वाटते, जसे काही तिने ज्याला आत घेतले, तो माणूस तिला माहिती होता --- ''

थोड्या खरखरीत आवाजात तिने विचारले, “म्हणजे खून करणारा बोटीवरीलच कुणीतरी होता?”

पायरोने मान डोलावली. “हे तर जाहीरच आहे.”

“आणि जमिनीवर पडलेल्या माळेचे काय?”

“तेच तर!”

“आणि पैशांची चोरी?”

“बरोबर.”

थोड्या शांततेनंतर मिस हेंडरसन हळूहळू बोलली, “मला वाटते, मिसेस क्लॅपरटॉन फार नकोशी बाई होती. मला नाही वाटत, की बोटीवरील कुणाला ती आवडत होती --- पण ते काही तिला मारायचे कारण होऊ शकत नाही.”

पायरो म्हणाला, “कदाचित फक्त तिचा नवरा सोडून!”

ती त्याला थांबवत बोलली, “तुम्ही खरच काही विचार करत नाही का?”

“हे बोटीवरील प्रत्येक माणसाचे मत आहे, की कर्नल क्लॅपरटॉनने तिला मारले असेल, तर ते अगदी योग्य केले आहे. मला वाटते, असेच म्हटले जात असणार.”

इली हेंडरसन त्याच्याकडे बघत, थांबून राहिली.

“पण मला असे म्हणावे लागेल, की मला तरी बिचाऱ्या चांगल्या कर्नलच्या चेहऱ्यावर काही रागीट भाव दिसले नाहीत. शिवाय अजून महत्वाचे म्हणजे, तो खून करणारा नव्हता, याचा सबळ पुरावा आहे. तो दिवसभर त्या दोन मुलींबरोबर होता. आणि चार वाजायच्या आत बोटीवर परतला नव्हता. तोपर्यंत मिसेस क्लॅपरटॉन मेल्याला काही तास उलटले होते.”

परत मिनिटभर शांतता पसरली. इली हेंडरसन मृदुपणे बोलली, “पण तुम्ही अजून विचार करा --- बोटीवरील उतारू?”

पायरोने त्याचे डोके लववले.

अचानक इली हेंडरसन हसली ---उघडपणे विरोध दर्शवणारे विकट हास्य! “मिस्टर पायरो, तुमची उपपत्ती सिद्ध करायला अवघड आहे. या बोटीवर खूप प्रवासी आहेत, नाही का?”

पायरोने परत डोके वाकवले. ”मी तुमच्या गुप्तहेरांच्या गोष्टीतील एक वाक्प्रचार वापरतो. ‘वॉटसन, माझ्याकडे माझ्या पद्धती आहेत.’ “

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी जेवायच्या वेळी, प्रत्येक उतारुच्या ताटापाशी त्याने ‘८-३० ला डेकवरील मोकळया जागी यावे’, अशी एक टंकलिखित चिठ्ठी होती. जेव्हा सगळे जमले,

तेव्हा कॅप्टन जिथे नेहमी बँड वाजवला जात असे तिथे उंच मंचावर आला आणि बोलू लागला.

"स्त्रीपुरुषहो, तुम्हाला सर्वांना काल झालेली दुर्घटना माहिती आहे. माझी खात्री आहे की तुम्हाला सर्वांना खुनी कोण हे जाणून घ्यायची इच्छा असेल." तो थांबला व त्याने घसा खाखरला. "आपल्याबरोबर बोटीवर तुम्हाला सर्वांना परिचित असलेले, यासारख्या केसेसचा खूप अनुभव असलेले मिस्टर हर्क्युल पायरो आहेत. त्याना काय म्हणायचे आहे, ते तुम्ही सर्वजण शांतपणे ऐकून घ्या."

याच वेळी जेवायला आलेला कर्नल क्लॅपरटॉन येऊन जनरल फोर्ब्सच्या शेजारी बसला. तो दुःखाने घाबरून गेल्यासारखा दिसत होता --- मोठ्या संकटातून सुटका झाल्यासारखा दिसत नव्हता. तो उत्तम नट तरी होता किंवा त्याला त्याच्या न पटणाऱ्या बायकोबद्दल खरेच प्रेम होते.

कॅप्टन म्हणाला, "मिस्टर हर्क्युल पायरो," आणि मंचावरून खाली उतरला. पायरोने त्याची जागा घेतली. त्याने विनोदी पद्धतीने स्वतःचे महत्व राखत श्रोत्यांवर नजर फिरवली.

त्याने सुरवात केली, "मिस्टर आणि मिसेस, तुम्ही मला ऐकण्यासाठी इथे जमलात, याबद्दल धन्यवाद! मिस्टर कॅप्टननी

तुम्हाला सांगितले आहे की मला अशा बाबतीत बराच अनुभव आहे. मला तो आहे, हे खरे आहे. या केसच्या मुळाशी कसे जायचे, याबद्दल माझ्या काही कल्पना आहेत." त्याने खूण केली आणि एका माणसाने कागदात बांधलेली एक मोठी वजनदार, वेड्यावाकड्या आकाराची वस्तू त्याच्याकडे ढकलली.

पायरोने त्यांना ताकीद दिली, "मी काय करतो आहे, याचे तुम्हाला थोडे आश्चर्य वाटेल. कदाचित तुम्हाला वाटेल, की मी वेडा आहे. तथापि, मी तुम्हाला खात्री देतो, की माझ्या वेडेपणामागे --- तुम्ही इंग्लिश लोक म्हणता --- त्याप्रमाणे एक पद्धत आहे."

त्याने मिनिटभर मिस हेंडरसनकडे पाहिले. मग त्याने त्या वस्तुभोवतालचा कागद काढायला सुरवात केली.

"मिस्टर आणि मिसेस, मिसेस क्लॅपरटॉनला कुणी मारले, याचा माझ्याकडे खरा साक्षीदार आहे. चपळ हातांने त्याने शेवटचा कागद फाडला आणि आतली वस्तू दिसू लागली --- जवळ जवळ मानवी आकाराची, मखमलच्या कपड्यातील व लेसच्या कॉलरमधील, लाकडी बाहुली दृष्यायमान झाली.

आता बदललेल्या व ओळखू न येणाऱ्या नाजूक आवाजात पायरो बोलला, "आर्थर," हा काही परदेशी आवाज नव्हता. तो आत्मविश्वासपूर्ण इंग्लिश आवाज असून त्यात थोडा पूर्व लंडनचा

गावरान हेल होता. ”मी परत विचारतो --- तुम्ही मला सांगू शकता का –-- मिसेस क्लॅपरटॉनच्या मृत्यूविषयी काही सांगू शकता का?”

बाहुलीची मान थोडी थरथरत होती. तिचा खालचा लाकडी जबडा धक्का लागून हळू पडला आणि [ कुणीतरी काढलेला ] एका बाईचा उच्च रवातील किंकाळीयुक्त आवाज ऐकू आला.

“हे काय जॉन, दार बंद आहे. कुणी मला त्रास द्यायला नको आहे”

तिथे एक रडणे --- फिरवलेल्या खुर्चीचा आवाज --- एक मनुष्य थरथरत उभा राहून, काही म्हणायला बघत होता, त्याचे हात गळ्याशी होते --- तो बोलायचा प्रयत्न करत होता --- प्रयत्न करत होता --- मग अचानक, त्याची आकृती चुरगळून मोडून पडल्याचा आवाज आला. तो काही आवाजाची स्पंदने उठवत आडवा पडला.

तो कर्नल क्लॅपरटॉन होता.

पायरो आणि बोटीवरील डॉक्टर जमिनीवरील आकृतीकडे गुडघ्यांवर बसून पाहू लागले.

डॉक्टर थोडक्यात बोलले, “मला भय वाटते, सर्व संपले असावे, हृदय!”

पायरोने मान हलवली. तो म्हणाला, "हा त्याची युक्ती त्याच्यावर उलटल्याचा धक्का आहे."

तो जनरल फोर्ब्सकडे वळला. "मिस्टर फोर्ब्स, तुम्ही मला तुमच्या संगीत हॉलच्या रंगमंचावरील उल्लेखाने अमूल्य सूचना दिलीत. आधी मी गोंधळलो --- मग मी विचार केला --- आणि मला समजले ते असे --- समजा लढाईपूर्वी, कर्नल क्लॅपरटॉन शब्दभ्रमकार होता. असे असेल तर हे तंतोतंत जुळत होते, की मिसेस क्लॅपरटॉन मेलेली असताना, त्या तिघांना खोलीच्या आतून तिचा आवाज येणे शक्य होते --- "

इली हेंडरसन त्याच्या शेजारी उभी होती. तिचे काळे डोळे वेदनेने भरलेले होते. तिने विचारले, "त्याचे हृदय कमकुवत असल्याचे तुम्हाला माहिती होते का?"

"मी तसा तर्क केला --- मिसेस क्लॅपरटॉन तिचे स्वतःचे हृदय, कमकुवत झाले असल्याचे म्हणाली होती. पण ती मला अशी बाई वाटली, जिला आपण आजारी आहोत, असे म्हणणे आवडत असे. मग मी एका जहाल औषधाच्या डोसाची, डीगीटॅलीन या हृदयावरील औषधाच्या डॉक्टरांच्या शिफारसीच्या फाटलेल्या कपट्याची योजना आखली. पण ते शिफारसपत्र मिसेस क्लॅपरटॉनसाठीचे नव्हते. कारण त्याने डोळ्यातील बाहुली मोठी

होते. तसे काही मी तिच्या बाबतीत पाहिले नव्हते. पण मी कर्नलकडे पाहिले, तेव्हा मला ती लक्षणे दिसली.”

इली पुटपुटली, “तुम्ही असा विचार केला तर --- अशा रीतीने --- हे प्रकरण संपले?”

तो हळूवारपणे बोलला, ”बाईसाहेब, हा उत्तम मार्ग होता. तुम्हाला नाही असे वाटत?

त्याने तिच्या डोळ्यात अश्रू भरून आलेले पाहिले. ती बोलली, “तुम्हाला माहिती आहे. तुम्हाला सर्व काही माहिती आहे --- मी काळजी करत होते --- पण तो माझ्यासाठी करत नव्हता --- त्या दोन मुलींसाठी तो सर्व काही करत होता --- तारुण्य --- त्याने तो त्यांचा दास झाला. फार उशीर होण्यापूर्वी, त्याला स्वैर पक्षी व्हायचे होते --- हो. मला खात्री आहे, असेच सगळे होते --- तुम्हाला तो खुनी असल्याचा केव्हा संशय आला?”

पायरो साधेपणे म्हणाला, “त्याचा स्वतःवरचा ताबा पुरेपूर होता. त्याची बायको कितीही धीट आणि उद्धट असली, तरी तो तिला काही बोलत नसे. म्हणजे एक तर त्याला तिची सवय झाली होती. किंवा त्याला तिचे वागणे टोचत नसे. मला दुसरे खरे वाटते --- आणि मी बरोबर होतो ---

”आणि मग त्याचे हातचलाखीचे खेळ ---गुन्ह्यापूर्वीच्या संध्याकाळी त्याने अजाणतेपणे स्वतःला उघड करायचे ढोंग केले. पण त्याच्यासारखा माणूस असे करत नसे. त्याचे काही कारण असले पाहिजे. नाहीतर --- तो जादूगार आहे, असा विचार लोक जोपर्यंत करत नाहीत, तोपर्यंत ते त्याला शब्दभ्रमकार समजू शकले नसते.”

“आणि आपण ऐकलेला आवाज --- मिसेस क्लॅपरटॉनचा आवाज?”

“एखाद्या बाईचा आवाज तिच्यासारखा असू शकत होता. मी तिला मंचाच्या मागे लपायला सांगितले आणि कुठले शब्द म्हणायचे, ते शिकवले.”

इली ओरडली, “ती युक्ती होती --- फार दुष्ट युक्ती!”

पायरो म्हणाला, “खून हा खून आहे. मी खुनाला मान्यता देत नाही.

कर्नल क्लॅपरटॉनला त्याचे बिंग उघड पडलेले बघून धक्का बसला व हृदय कमकुवत असल्याने तो जागच्या जागी मेला. त्यामुळे त्याचे फाशी जाण्याचे वाचले.”

THE ADVENTURE OF THE CLAPHAM COOK

# क्लॅफॅमच्या स्वयंपाकीणीचे साहस



त्यावेळेस मी माझा मित्र हर्क्युल पायरोबरोबर रहात होतो. डेली ब्लेअर या सकाळच्या वर्तमानपत्रातील ठळक बातम्या त्याला वाचून दाखवायची माझी सवय होती.

डेली ब्लेअर या वर्तमानपत्राच्या शेवटच्या पानावर चोऱ्या व खून यांच्या बातम्या आडून आडून छापल्या जात नसत. तर त्या मोठ्या ठळक अक्षरात पहिल्या पानावर छापल्या जात. जाणकार व्यक्तीसाठी ही मोठी संधी असे. मी वाचले,

*अटक होऊ नये म्हणून बँकेतील कारकुनाने, चर्चेत असलेल्या ठेवींची पन्नास हजार पौंडांची रक्कम घेऊन पोबारा केला. नवऱ्याने त्याचे डोके गॅसवर धरले, आनंदी जीवन नसलेले घर. हरवलेली टंकलेखिका, एकवीस वर्षांची सुंदर मुलगी, एडना फिल्ड कुठे आहे?*

"पायरो, तुला यातून हवी ती केस घेता येईल. पन्नास हजार पौंडांची रक्कम घेऊन पोबारा करणारा कारकून, विचित्र आत्महत्या, हरवलेली टंकलेखिका --- कुठली घेतोस, बोल?"

माझा मित्र शांत मनस्थितीत होता. त्याने मुकाट्याने मान हलवली. मला यातली कुठलीच फारशी आकर्षक वाटत नाही आहे. अरे मित्रा, मला आज आराम करावासा वाटतो आहे. मी समस्या घेतली, तर ती इथे खुर्चीत बसून, मला खूप रुचीपूर्ण वाटली पाहिजे. मला माझी अशी महत्वाची बरीच कामे असतात."

"जसे की?"

माझा कपडेपट, हेस्टीग्ज. जर मी चुकत नसेन, तर माझ्या नवीन करड्या सूटवर तेलकट डाग पडला आहे --- अगदी एकमेव वाटेल असा डाग, पण मला पुरेसा त्रास देणारा! नंतर माझा थंडीतील ओव्हरकोट --- तो मला किएटिंग पावडरमध्ये घालून बाजूला

ठेवायला पाहिजे. आणि मला वाटते --- माझ्या मिशा कापायची व नंतर त्याला पोमेड लावायची वेळ झाली आहे.”

मी खिडकीकडे जात म्हणालो, “ठीक आहे. मला शंका आहे, हा रानटी कार्यक्रम तू अंमलात आणू शकशील की नाही. घंटी वाजते आहे तुझ्याकडे तुझा अशील आलेला आहे.”

पायरो अदब राखत बोलला, “जर हे प्रकरण देशाच्या दृष्टीने महत्वाचे असेल, तरच मी घेईन.”

जिना चढून आल्याने धापा टाकणाऱ्या, लाल चेहऱ्याच्या बळकट बाईने क्षणभराने आमच्या खासगीपणाचा भंग केला.

तिने खुर्चीत बसत विचारले, “तुम्हीच मिस्टर पायरो का?”

“हो, बाईसाहेब, मी हर्क्युल पायरो.”

थोड्या शंकास्पद दृष्टीने त्याच्याकडे बघत ती बोलली, “मी तुमच्याबद्दल जशी कल्पना केली होती, तसे तुम्ही मुळीच नाही. तुम्ही किती थोर गुप्तहेर आहात, असे त्यांनी छापण्यासाठी तुम्ही वर्तमानपत्राला पैसे देता, की ते आपण होऊनच तसे छापतात?”

पायरो स्वतःला सावरत बोलला, “बाईसाहेब!”

“मला माफ करा, पण माझी खात्री आहे, तुम्हाला हल्लीची वर्तमानपत्रे कशी आहेत, ते माहिती असेल. तुम्ही एखादे चांगले स्फुट वाचायला सुरवात करताः नवरी तिच्या अविवाहित मित्राला

काय म्हणाली, आणि ते सर्व अगदी साधे असते, की तुम्ही कसा केमिस्टकडून शाम्पू आणला आणि केस धुतले. सर्व काही फुसके! पण कोणीच कसे काही हरकत घेत नाही? मी तुम्हाला सांगते मला तुम्ही काय करायला हवे आहे. मला तुम्ही माझ्यासाठी स्वयंपाकीण शोधायला हवी आहे.”

पायरोने तिच्याकडे रोखून पाहिले. एकदा त्याच्या तयार असलेल्या जिभेने त्याला रोकले. मी न रोखू शकणारे, जिवणी फाकवणारे माझे हसू लपवण्यासाठी मी बाजूला वळलो.

ती बाई पुढे बोलली, “बेकार लोकांना भत्ता चालू केल्याचा हा दुष्ट परिणाम आहे. हे सर्व काही नोकरांच्या डोक्यात टंकलेखक आणि असेच काही होण्याचे खूळ भरवणारे आहे. भत्ता थांबवा, असे माझे म्हणणे आहे. माझ्या नोकरांची काय तक्रार आहे, ते जाणून घेणे मला आवडेल.

आठवड्यातून एकदा दुपारी व संध्याकाळी सुट्टी, एक आड एक रविवारी कपडे धुणे बंद, आम्ही खातो तेच अन्न आणि घरात कधी सर्वात उत्तम लोण्याचा अंशदेखील शिल्लक नसणे.”

ती दम टाकायला थांबली. पायरोने लगेच ती संधी घेतली. तो उभा राहून, अपमानकारक शब्दात बोलला, “मला वाटते, तुम्ही

चूक करत आहात. मी घरगुती सेवा पुरवण्याचे काम करत नाही. मी खासगी गुप्तहेर आहे.”

आमची पाहुणी म्हणाली, “मला ते माहिती आहे. मी तुम्हाला सांगितले नाही का, की मला स्वयंपाकीण हवी आहे? बुधवारी एकही शब्द न बोलता ती घराबाहेर पडली आणि कधीच परत आली नाही.”

“बाईसाहेब, माफ करा, पण मी असली कामे करत नाही. शुभ सकाळ.”

आमची पाहुणी रागाने ओरडू लागली, “काय हे? तुमच्यासारख्या सभ्य माणसाने असे करावे? मला तुमचा इतका अभिमान होता. तुम्ही फक्त उच्च वर्तुळातील स्त्रियांच्या रत्नांची व सरकारी गुपितांची प्रकरणेच घेता का? माझ्यासारख्या परीस्थितीतील बायकांना मुगुटाइतके नोकरांचे महत्व असते. आम्ही काही हिऱ्यामोत्यांचे दागिने घालून मोटारीतून हिंडणाऱ्या श्रीमंत स्त्रिया नाही. चांगली स्वयंपाकीण म्हणजे एखाद्या बाईच्या दृष्टीने मोत्यांची जी किंमत असेल, तीच आमच्या दृष्टीने स्वयंपाकीणीची आहे. तिला गमावणे आम्हाला परवडत नाही.”

एक दोन मिनिटे असे वाटले, की पायरोचा विनोदी स्वभाव आणि त्याचा अभिमान यातील हे युद्ध आहे. शेवटी तो हसून परत

बसला. "बाईसाहेब, तुमचे बरोबर आहे आणि माझे चुकले. तुमचे म्हणणे व बुद्धिमानतेचे व बरोबर आहे. ही एक नावीन्यपूर्ण केस होईल. काम सोडून जाणाऱ्या घरगुती नोकरांच्या बाबतीत मी कधी काम केलेले नाही. खरेच ही समस्या देशाच्या दृष्टीने महत्वाची आहे. तुम्ही येण्याच्या आधी मी माझ्या नशीबात असेच काही असणार, अशी अपेक्षा करत होतो. चला मग, कामाला लागू. तुम्ही म्हणालात, ही हुशार स्वयंपाकीण बुधवारी निघून गेली आणि परत आलीच नाही. म्हणजे परवा."

"हो. तेव्हाच."

"बाईसाहेब, पण बहुधा, तिला काही अपघात झाला असेल. तुम्ही कुठल्या हॉस्पीटलमध्ये चौकशी केली का?"

"काल मला असेच वाटले. पण आज सकाळी तिने तिचा डबा मागून घेतला. पण मला एकही ओळ काही लिहिली नाही. माझ्याशी असे वागलेले मला मुळीच आवडले नाही. मी घरी असते, तर माझ्याशी असे वागणाऱ्या बाईला मी तो दिला नसता. मी तिला खाटकाकडे पाठवून दिले असते."

"तुम्ही तिचे वर्णन कराल का?"

"ती मध्यमवयीन, बळकट, काळे केस करडे होत चाललेली --- खूप माननीय अशी होती. ती तिच्या पूर्वीच्या कामाच्या ठिकाणी दहा वर्षे काम करत होती. तिचे नाव एलिझा डन होते."

"आणि बुधवारी तुमचे तिच्याशी काही वाजले होते का?"

"अजिबात नाही. त्यामुळे हे आणखी कोड्यात पाडणारे ठरते."

"बाईसाहेब, तुमच्याकडे किती नोकर आहेत?"

"दोन. ॲनी नावाची वरकाम करणारी एक छान मुलगी आहे. ती थोडी विसराळू आहे. आणि तिच्या डोक्यात सतत तरुणांचे विचार असतात, पण तिच्या कामापुरती, ती चांगली नोकराणी आहे."

ती आणि स्वयंपाकीण यांचे जमायचे का?"

त्यांच्या थोड्या कुरबुरी चालायच्या व कधी प्रेम चालायचे. अर्थात, तसे म्हणाल तर दोघींचे ठीक चालायचे."

"ती मुलगी या बाबीवर काही प्रकाश टाकू शकली की नाही?

"ती नाही म्हणते --- पण तुम्हाला माहिती आहे, ही नोकरमंडळी कशी असतात. त्यांचे संगनमत असते."

“ठीक आहे. ठीक आहे. आपण बघू. बाईसाहेब, तुम्ही कुठे रहाता?”

“क्लॅफॅमला --- ८८, प्रिन्स अल्बर्ट रस्ता.”

“बाईसाहेब, मग बरे आहे. मी तुम्हाला शुभ दिवस म्हणतो. दिवसाभरात मी केव्हातरी घरी येईन.”

आमच्या नव्या अशीलाचे नाव मिसेस टोड होते. ती गेली. पायरोने खंत वाटून माझ्याकडे बघितले. “हेस्टीग्ज, आपल्याकडे नवीनच प्रकरण चालून आले आहे. क्लॅफॅमच्या स्वयंपाकीणीचे नाहीसे होणे! जापने आपल्याकडून अशा केसची कधी कधी अपेक्षा केली नसेल.”

मग तो त्याच्या सूटवरील तेलकट डाग टीपकागदाने काढायच्या मागे लागला. मिशांचे काम त्याने नाईलाजाने दुसऱ्या दिवसावर ढकलले. आणि आम्ही क्लॅफॅमला निघालो.

प्रिन्स अल्बर्ट रस्ता सगळया एकसारख्या वेड्यावाकड्या घरांनी भरलेला होता. त्यांच्या खिडक्यांना लेसचे पडदे टांगलेले होते. आणि दारांना छान पॉलिश केलेल्या कड्या ठोकलेल्या होत्या.

आम्ही ८८ नंबरचे दार वाजवले आणि एका छान चेहऱ्याच्या, नीट नोकराणीने ते उघडले. मिसेस टोडने बाहेर हॉलमध्ये येऊन,

आमचे स्वागत केले. ती ओरडली, “ॲनी, जाऊ नकोस. या लोकांना तुला काही प्रश्न विचारायचे असतील.”

ॲनीच्या चेहऱ्यावर आल्हादक उत्सुकतेच्या व घाबरल्याच्या भावनांचे मिश्रण उमटले.

पायरो वाकून बोलला, “बाईसाहेब, धन्यवाद. मी तुमच्या नोकराणीला आता प्रश्न विचारतो आणि शक्य असेल, तर तिला एकटीला सोडा.”

आम्ही एका लहानशा खोलीत गेलो. आणि जेव्हा कुरकुरत, मिसेस टोडने खोली सोडली, तेव्हा पायरोने ॲनीची उलट तपासणी सुरु केली.

“तर ॲनी, तू जे काही सांगशील, ते आमच्या दृष्टीने खूप महत्वाचे असेल. तू एकटीच या प्रकरणावर उजेड पाडू शकशील. तुझ्या मदतीशिवाय मला काही करणे शक्य नाही.”

त्या मुलीच्या चेहऱ्यावरील घाबरल्याचे भाव नष्ट झाले. आणि आल्हादक उत्सुकतेच्या भावना वाढल्या. ती म्हणाली, “नक्की, सर. मी तुम्हाला शक्य ते, काहीही सांगू शकते.”

पायरोने तिला मान्यता देत, म्हटले, “ते चांगले आहे. आता, पहिल्या प्रथम, तुझी काय कल्पना आहे? तू चांगली हुशार मुलगी

दिसतेस. ते लगेच समजते. एलिझा नाहीशी झाली, त्याविषयी, तुझे मत काय आहे?"

असे आश्वासक बोलल्याने, ॲनीची गाडी सुसाट निघाली. "सर, गोरे मालक नेहमी असेच असतात, असे एलिझा मला बजावत होती. 'तुम्ही काही गोडधोड खा, कुठलेही सेंट वापरा --- मग कितीही सभ्य मालक असो!' असे तिचे शब्द होते. आणि आता ती नाहीशी झाली. मला याची खात्री आहे. जिथे जाड नोकराणी आवडतात, त्या पूर्वेकडील देशांमध्ये टर्कीला तिला जहाजामधून पाठवले असेल."

पायरोने आतल्या आत स्तुती करत, हे बोलणे ऐकून घेतले. "पण मग --- आणि ही खरेच काय कल्पना आहे --- मग तिच्या सामानाचे काय?"

"सर, ते काही मला माहिती नाही. त्या प्रदेशात, तिला तिच्या वस्तू लागणारच."

"तिची बॅग न्यायला कोण आले होते --- कुणी माणूस?"

"सर, कार्टर पॅटरसन आला होता."

तू ते बांधलेस का?"

"ते आधीच गोळा करून बांधलेले होते."

“अरेच्या, हे फार रुचीपूर्ण आहे. म्हणजे जेव्हा बुधवारी तिने घर सोडले, तेव्हा तिने न परतायचे ठरवलेले होते. तुला ते समजले होते, नाही का?”

ती खंत वाटल्याचे दाखवत म्हणाली, “हो, सर.” ॲनी थोडी धास्तावली होती. “मी असा विचार केला नव्हता. सर, तिथे गोरे नोकर असतील किंवा नसतील, नाही का?”

पायरो दुःखाने बोलला, “संशयातीतपणे! तुम्ही दोघी एकाच खोलीत झोपत होता का?”

“नाही सर, आम्हाला वेगळया खोल्या होत्या.”

एलीझाने कधी तुझ्याजवळ तिच्या कामाबद्दल तक्रार केली होती का? तुम्ही दोघी इथे आनंदी होता का?”

मुलगी हो नाही करत म्हणाली, “ती जात असल्याचे काही बोलली नव्हती. आमची येथील व्यवस्था ठीक होती --- “

पायरो दयाळूपणे बोलला, “आडपडदा न ठेवता बोल. मी तुझ्या मालकिणीला काही सांगणार नाही.”

“सर, अर्थात, आमची मालकीण सावध बाई होती. पण जेवण चांगले असायचे. खूप असायचे. वाढण्यात काही काचकूच नव्हती. संध्याकाळचे जेवण गरम असायचे. तुम्हाला हवे तितके तळकट, तुपकट मिळायचे. बाहेर जाणे असायचे. एलीझाला काही बदल

हवा असेल, तरी माझी खात्री आहे, ती अशी निघून गेली नसती. तिने इथे महिना पूर्ण केला असता. होती. तिला बदल हवा असेल, तर मालकिणीने तिला पूर्ण महिन्याचा पगारही दिला असता.''

''आणि काम फार त्रासाचे होते का?''

''ती तशी त्या बाबतीत काहीही चालवून घेणारी नव्हती --- नेहमी कोपऱ्यात धूळ नाही ना, इकडे तिचे लक्ष असे. आणि मग तिथे पैसे देऊन रहाणारा मनुष्य होता. पण तो मालकांसारखाच फक्त न्याहारी व रात्रीच्या जेवणाला असे. ते दिवसभर शहरात जात.''

''तुझे मालक तुला आवडत असत का?''

''ते ठीक होते --- तसे ते शांत पण थोडे टोचून बोलणारे होते.''

''एलिझा इथून जाण्यापूर्वी तुझ्याशी काय बोलली, ते तुला आठवते का?''

''हो. आठवते. जेवणाच्या खोलीत काही शिजवलेली पीच असतील, तर ती आपण रात्रीच्या जेवणात खाऊ. आणि काही भाजलेले व काही तळलेले बटाटे आहेत. तिला शिजवलेली पीच फार आवडत असत. ती ते बरोबर घेऊन गेली असती, तर मला आश्चर्य वाटले नसते.''

''दर बुधवारी ती बाहेर जात असे का?''

''हो तिचा बुधवार आणि माझा गुरुवार ठरलेला होता.''

पायरोने अजून काही प्रश्न विचारले. मग त्याचे समाधान झाल्याचे तो म्हणाला. ॲनी गेली. मिसेस टोड घाईने आत आली. तिच्या चेहऱ्यावर उत्सुकता दाटून आली होती. माझी खात्री होती, आमच्या संवादाच्या वेळी तिला खोलीबाहेर जायला सांगितल्याबद्दल तिला बरे वाटलेले नव्हते. पण पायरोने तिला युक्तीने बोलून शांत केले.

त्याने स्पष्टीकरण दिले, "तुमच्यासारख्या बुद्धिमान बाईसाठी, आमच्या गरीब गुप्तहेरांना वापराव्या लागणाऱ्या पद्धती सहन करणे कठीण असते. चटपटीत लोकांसाठी मूर्खपणा सहन करणे, फार चिकाटीचे काम असते."

अशा तऱ्हेने, मिसेस टोडचा राग शांत करून, त्याने संभाषणाची गाडी तिच्या नवऱ्याकडे वळवली. त्याने अशी माहिती मिळवली, की तो गावातील एका कंपनीत काम करतो व सहानंतर घरी येतो.

तो या प्रकरणामुळे चांगलाच वैतागला असेल, नाही का?"

मिसेस टोड बोलली, "त्याला कधीच त्रास होत नाही. 'ठीक आहे. ठीक आहे. दुसरी बाई ठेव', एवढेच तो म्हणाला. तो इतका शांत आहे की कधीकधी मी फार चिडते. असे होणारच, नाही का?"

तो म्हणाला ‘ती अपकारकर्ती बाई आहे. बरे झाले, ती निघून गेली.’”

“बाईसाहेब, घरातील बाकीच्यांचे काय?”

“म्हणजे आमच्याकडे पैसे देऊन रहाणारा माणूस, असे तुम्हाला म्हणायचे आहे का? तर जोपर्यंत त्याला न्याहारी आणि संध्याकाळचे जेवण मिळते, तोपर्यंत त्याची काही तक्रार नाही.”

“तो काय करतो?”

“तो बँकेत काम करतो. ”एवढे बोलून तिने त्याचे नाव सांगितले. मला माझे डेली ब्लेअर या वर्तमानपत्राच्या शेवटच्या पानावर चोऱ्या व खून यासंबंधीच्या बातम्या वाचणे आठवू लागले.

“तरुण मनुष्य?”

“मला वाटते वय अठ्ठावीस. तो चांगला, शांत तरुण आहे.”

“शक्य असेल, तर मला त्याच्याशी व तुमच्या नवऱ्याशीदेखील थोडे बोलायला आवडेल. त्यासाठी मी संध्याकाळी परत येतो. मी तुम्हाला असे सुचवतो, की तुम्ही थोडी विश्रांती घ्या. तुम्ही दमलेल्या दिसत आहात.”

“तसे आहेच. पहिली म्हणजे एलीझाची काळजी आणि काल दिवसभर मी विक्री करत होते आणि ते कसे काम असते, तुम्हाला

माहिती आहे. मिस्टर पायरो, आणि घरातील एकामागून एक उपटणाऱ्या कामांचे काय? ॲनी एकटी सगळे करू शकत नाही -- - आणि तीदेखील निघून जाण्याची शक्यता आहे. असे चालू असल्यामुळे, मी दमलेली दिसणारच.”

पायरो सहानुभूतीने काही पुटपुटला व आम्ही निघालो.

मी म्हणालो, “हा विचित्र योगायोग आहे. पण तो पळपुटा कारकून डेव्हीस सिम्पसनच्याच बँकेत आहे. तुला वाटते का, की काही संबंध असेल?”

पायरो हसला. “एका बाजूला, चुका केलेला कारकून तर दुसऱ्या बाजूला नाहीशी झालेली स्वयंपाकीण! या दोघांमध्ये काही संबंध असेल, असे मानणे कठीण आहे. पण जर डेव्हीस सिम्पसनला भेटून, स्वयंपाकीणीच्या प्रेमात पडला असेल आणि तिला त्याच्याबरोबर विमानाने प्रवास करायला भाग पाडले असेल, तर गोष्ट वेगळी!”

मी हसू लागलो. पण पायरो गंभीर राहिला.

तो दोष देत म्हणाला, “त्याने त्याहून वाईट केले असेल. हेस्टीग्ज, लक्षात ठेव, जर तू वनवासात जात असलास तर सुंदर चेहऱ्यापेक्षा चांगली स्वयंपाकीण बरोबर असणे, जास्त आरामशीर

आहे. ही चमत्कारिक केस आहे. यात उलटसुलट बरेच काही आहे. मला रस वाटतो आहे. हो --- फारच रस वाटतो आहे.”

**दोन**

त्या दिवशी संध्याकाळी आम्ही ८८, प्रिन्स अल्बर्ट रस्त्याला परत आलो व टोड आणि सिम्पसन दोघांचीही मुलाखत घेतली. टोड पडेल चेहऱ्याचा, कंदीलासारख्या जबड्याचा व साधारण चाळीशीचा होता.

तो गुळमुळीतपणे म्हणाला, “ओहो, हो. हो. एलिझा. हो. मला वाटते, ती चांगली स्वयंपाकीण होती आणि स्वस्तदेखील होती. मी पैसे वाचवायला महत्व देतो.”

“तुम्हाला तिच्या अचानक नाहीसे होण्याचे काही कारण सांगता येईल का?”

परत तो गुळमुळीतपणे म्हणाला, “तुम्हाला माहिती आहे, हे नोकर कसे असतात. माझी बायको फार काळजी करते. त्यामुळे ती खराब झाली आहे. खरे तर ही समस्या साधी आहे. मी म्हणतो, ‘दुसरी स्वयंपाकीण ठेव.’ एवढे साधे करता येईल. जे झाले ते झाले.”

मिस्टर सिम्पसनचा पण विशेष उपयोग नव्हता. तो चष्मिस तरुण मनुष्य, फारसे लक्ष वेधून घेत नव्हता. तो म्हणाला, “मला वाटते, मी तिला पाहिले असले पाहिजे. ती वयाने मोठी बाई होती, नाही का? अर्थात मी नेहमी बघायचो ती वेगळी, ती ॲनी होती. ती छान मुलगी आहे. ती खूप मदत करणारी होती.”

“त्या दोघींचे एकमेकीशी पटायचे का?

मिस्टर सिम्पसन म्हणाले, की त्याना वाटते, ते काही सांगू शकणार नाहीत.

आम्ही तेथून निघतांना पायरो म्हणाला, “अरे मित्रा, इथे आपल्याला मदत होईल, असे काहीच मिळाले नाही.” मिसेस टोड जोराने लांबण लावत, परत तेच तेच सांगत बसल्याने आम्हाला निघायला उशीर झाला.

मी विचारले, “तू नाराज झालास का? तुझी काही ठोस ऐकायची इच्छा होती का?”

पायरोने मान हलवली. तो म्हणाला, “अर्थात, तशी शक्यता होती. पण तसे होईल, असे मला वाटत नव्हतेच.”

दुसऱ्या दिवशी पायरोला एक पत्र मिळाले. त्याने ते वाचले. तो रागाने लाल झाला. त्याने ते माझ्याकडे दिले.

*‘मिसेस टोड दिलगीर आहे, की तिला मिस्टर पायरोची सेवा नको आहे. तिच्या नवऱ्याशी बोलल्यावर, तिच्या लक्षात आले की इतक्या किरकोळ घरगुती गोष्टीसाठी अशा गुप्तहेराला बोलावणे, हे मूर्खपणाचे आहे.’ मिसेस टोडने पायरोची फी म्हणून एकवीस शिलिंगचा चेक पाकिटात घातला होता.*

## तीन

पायरो रागाने ओरडला, “आहा! त्याना असे वाटते आहे, की ते हर्क्युल पायरोला असे कटवू शकतील. त्यांच्यावर उपकार म्हणून --- मोठे उपकार म्हणून, मी त्यांचे दोन पेनीचे --- अर्ध्या पेनीचे प्रकरण सोडवायला घेतले. आणि आता अशा तऱ्हेने ते मला हाकलून लावत आहेत. मी चूक करत नसेन, तर यात मिस्टर टोडचा हात आहे. पण मी असे म्हणता कामा नये. छत्तीस वेळा नाही! मी माझे स्वतःचे पैसे खर्च करेन. गरज असेल तर --- वाट्टेल तेवढे! पण मी या समस्येच्या मुळाशी जाईन.”

मी म्हणालो, “पण कसे?”

पायरो थोडा शांत झाला. तो बोलला, “काही करण्यापूर्वी आपण वर्तमानपत्रात निवेदन देऊ. बघू --- हो --- असेच काहीतरी --- ‘जर एलिझा डनने या पत्त्यावर संपर्क साधला, तर तिला तिच्या

फायद्याचे काही समजेल.' हेस्टींग्ज, तुला माहिती असलेल्या सर्व वर्तमानपत्रात हे निवेदन दे. मग मी माझ्या काही बारीकसारीक चौकशा करतो. जा. जा. सर्व काही झटपट करायला हवे."

त्यानंतर संध्याकाळपर्यंत, त्याने मला बोलावून तो काय करतो आहे ते सांगेपर्यंत, मी त्याला भेटलो नाही.तो म्हणाला,

"मी मिस्टर टोडच्या कार्यालयात चौकशी केली. तो बुधवारी तिथे हजर होता. त्याचे चारित्र्य चांगले असल्याचे मला सर्वांकडून समजले. सिम्पसन गुरुवारी आजारी असल्याने बँकेत गेला नव्हता. पण बुधवारी गेला होता. त्याची डेव्हीसबरोबर साधारण मैत्री होती. त्यात जगावेगळे काही नव्हते. पण त्यातून पुढे काही निष्पन्न झाले नाही. आता निवेदनावरच अवलंबून रहायला हवे."

सगळ्या वर्तमानपत्रांमधून, ते निवेदन झळकले. पायरोच्या सांगण्यानुसार रोज आठवडाभर ते येत होते. स्वयंपाकीण नाहीशी होण्याच्या या नीरस बाबीतील त्याची उत्सुकता असामान्य होती. पण मला कळून चुकले, की त्याने केस जिंकेपर्यंत हा त्याच्या सन्मानाचा प्रश्न केलेला आहे. खूप स्वारस्यपूर्ण केसेस त्याच्याकडे आल्या, पण त्याने त्या सगळ्या नाकारल्या. रोज तो त्याची पत्रे चाळे. त्यांची विभागणी करे आणि सुस्कारा टाके.

पण शेवटी आमच्या चिकाटीला फळ मिळाले. मिसेस टोड आमच्याकडे येऊन गेल्यानंतरच्या बुधवारी आमच्या मालकीणबाई सांगत आल्या की एलिझा डन नावाची बाई तुम्हाला भेटायला आली आहे.

पायरो ओरडला, “शेवटी आली! तिला ताबडतोब वर पाठवा.”

ही उताविळी बघून ती घाईने गेली व मिस डनला घेऊन आली. आम्हाला कळल्याप्रमाणे ती उंच, मजबूत व मान द्यावा अशी दिसत होती.

ती बोलली, “मी निवेदनात दिल्याप्रमाणे आले. मला वाटले काही गोंधळ असावा आणि तुम्हाला माहिती नसावे, की मला इच्छापत्राप्रमाणे माझी रक्कम मिळालेली आहे.”

पायरो सूक्ष्मपणे तिचे निरीक्षण करत होता. त्याने घाईने एक खुर्ची पुढे ओढली. त्याने स्पष्टीकरण दिले, “खरे तर तुमची आधीची मालकीणबाई, मिसेस टोड यांना तुमची फार काळजी वाटत होती. तुम्हाला काही अपघात वगैरे झाला की काय, असे त्यांना वाटत होते.”

एलिझा डनला फार नवल वाटलेले दिसले.

“त्यांना माझे पत्र मिळाले नाही का?”

पायरो म्हणाला, “तिला काहीही मिळाले नाही. तुमच्याकडून तुम्ही तुमची सगळी गोष्ट सांगा, सांगाल का?”

एलिझा डनला काही तयार करावे लागले नाही. ती पूर्ण गोष्ट सांगायला तयार झाली.

“मी बुधवारी रात्री घरी परतत असतांना जवळजवळ घरी पोचले होते. तेव्हा एका सभ्य माणसाने मला थांबवले. तो एक उंच, दाढीवाला व टोपी घातलेला माणूस होता. त्याने विचारले, “मिस एलिझा डन? मी म्हणाले “हो.” तो बोलला, “मी ८८ नंबरच्या घरात तुमची चौकशी करत होतो. ते मला म्हणाले तुम्ही कदाचित तुमच्या घराच्या वाटेवर भेटाल. मिस डन, मी ऑस्ट्रेलीयाहून तुम्हाला शोधत आलो आहे. तुमच्या आईकडून असलेल्या आजीचे मधले नाव तुम्हाला माहिती आहे का?” मी म्हणाले “जेन एम्मॉट.” तो बोलला, “बरोबर. आता मिस डन, तुम्ही कधीही ही गोष्ट ऐकली नसेल, तरी तुमच्या आजीची एक जवळची, एलिझा लीच नावाची मैत्रिण होती. ही मैत्रिण ऑस्ट्रेलीयाला गेली व एका अती श्रीमंत माणसाशी लग्न करून स्थिरस्थावर झाली. तिची दोन्ही मुले तान्ही असतानाच वारली. तिला नवऱ्याची सगळी संपत्ती मिळाली. ती काही महिन्यांपूर्वी वारली. आणि तिच्या

इच्छापत्राप्रमाणे, तुम्हाला या देशातील एक घर आणि काही रक्कम मिळते आहे.”

मिस डनने चालू ठेवले, “तुम्ही माझ्या डोक्यावर मानाचे पीस खोचून, मला भुईसपाटच करून टाकले आहे.” मिनिटभर मला संशय आला. आणि त्याला ते समजले असावे. कारण तो हसला. “मिस डन, तुम्हाला संशय येणे साहजिक आहे, पण ही माझी माहिती बघा.” त्याने मेलबोर्नच्या कुठल्या वकिलाचे, ‘हर्स्ट आणि क्रोटचे’चे, पत्र काढून माझ्या हातात दिले. तो म्हणाला, “एक दोन अटी आहेत. आमची अशील थोडी विक्षिप्त होती. त्यामुळे उद्या दुपारी बाराच्या आत, कुम्बरलँडचे घर तुम्ही ताब्यात घेतले पाहिजे. दुसरी अट फार महत्वाची नाही --- ती अशी आहे की तुम्ही घरगुती नोकरदार नसला पाहिजेत.” माझा चेहरा पडला. “ओहो, मिस्टर क्रोटचे, मी स्वयंपाकीणीचे काम करते. त्यांनी तुम्हाला तसे सांगितले नाही का?” तो म्हणाला, “अहो बाई, मला याची काही कल्पना नव्हती. मला वाटले, तुम्ही तिथे सहकारी किंवा दाई असाल. हे फार दुर्दैवी आहे --- खरेच फार दुर्दैवी आहे.”

मी खट्टू होऊन विचारले, “मग आता मला काहीच पैसे मिळणार नाहीत का?” त्याने मिनिटभर विचार केला. “कायद्यातून पळवाट नेहमीच काढता येते. वकील म्हणून मला माहिती आहे,

की तुम्हाला आजपासून ती नोकरी सोडावी लागेल. मी बोलले, “पण माझा महिन्याचा पगार?”

तो हसून म्हणाला, “मिस डन, एका महिन्याच्या पगारावर पाणी सोडून, तुम्ही कधीही नोकरी सोडू शकता. एकंदर परिस्थिती बघता, तुमची मालकीण तुमची अडचण समजून घेईल. पण वेळाचा प्रश्न आहे. तुम्ही किंग क्रॉसपासून, उत्तरेकडे जाणारी ११ वाजताची गाडी घ्यायला पाहिजे. मी तुम्हाला भाड्याचे दहा पौंड किंवा तत्सम काही पैसे देतो. तुम्ही स्टेशनवर तुमच्या मालकिणीला चिठ्ठी लिहून कळवा. मी स्वतः ती त्यांना पोचवतो आणि सगळी परिस्थिती विशद करून सांगतो.” अर्थात, मी तयार झाले. आणि तासाभराने मी गाडीत होते. मी इतकी अवाक झाले होते, की काय चालले आहे, ते मला समजतच नव्हते. मी चार्लीस्लेला पोहोचेपर्यंत, मला असे वाटू लागले, की तुम्ही कुठे कुठे वाचता, तशी ही काहीतरी फसवाफसवी आहे. पण त्याने दिलेल्या पत्त्यावर मी गेले आणि तिथे वकील होते. मी पण ठीक होते. छान छोटेसे घर आणि वर्षाला तीनशे पौंड मिळणार होते. येथील वकिलांना फारच थोडे माहिती होते. त्यांना लंडनच्या एका सभ्य माणसाकडून मला घर व पहिले सहा महिने १५० पौंड दर महिना देण्याबाबत, कळवण्यात आले होते. मिस्टर क्रोटचे यांनी माझ्या वस्तु माझ्याकडे पोचवल्या. पण मालकीणबाईंकडून काही कळले नाही.

मला वाटले, त्या चिडल्या असणार. मी नशीबवान ठरल्याबद्दल मला दूषणे देत असणार. तिने माझी बॅगही ठेऊन घेतली. माझे कपडे कागदात गुंडाळून पाठवले. पण तिथे तिला माझे पत्र कधीच मिळाले नव्हते. ती माझ्याबद्दल कदाचित थोडा थंडपणे विचार करत असावी."

पायरोने लक्षपूर्वक सगळे ऐकून घेतले. आता त्याने पूर्ण समाधान झाल्यासारखी मान डोलावली. "बाईसाहेब, आभारी आहे. तुम्ही म्हणालात, त्याप्रमाणे थोडा गोंधळ होता. तुम्हाला तसदी दिल्याबद्दल मला माफ करा." त्याने तिच्या हातात एक पाकीट दिले. "तुम्ही लगेच कंबरलँडला जाणार आहात? तुम्हाला कानात एक गोष्ट सांगतो. स्वयंपाक कसा करायचा, ते विसरू नका. पुढेमागे काही बरेवाईट झाले तर आपल्याला आपले पोट भरता आले पाहिजे."

दूर जाणाऱ्या मिस डनला बघून तो पुटपुटला, "कदाचित तिच्या दर्जाच्या लोकांपेक्षा फार जास्त नाही. त्याचा चेहरा कठोर झाला. "हेस्टीग्ज, चल. वेळ घालवायला नको. मी जापला चिठ्ठी लिहितो. तोपर्यंत, तू टॅक्सी बघ."

मी टॅक्सी घेऊन आलो, तेव्हा पायरो दारात थांबला होता.

"मी उत्सुकतेने विचारले, "आपण कुठे चाललो आहोत?"

“पहिल्यांदा विशेष निरोप्याबरोबर ही चिठ्ठी पोचवण्यासाठी.”

ते झाल्यावर पायरोने टॅक्सीवाल्याला पत्ता सांगितला, ८८, प्रिन्स अल्बर्ट रस्ता, क्लॅफॅम.”

“म्हणजे आपण तिथे चाललो आहोत तर?”

“हो. तरी खरे तर मला भीती वाटते आहे, की आपल्याला खूप उशीर झाला आहे. हेस्टीग्ज, आपला पक्षी उडून गेला असेल.”

आपला पक्षी कोण?”

पायरो हसला. “स्पष्ट न दिसणारा मिस्टर सिम्पसन.”

मी किंचाळलो, “काय?”

“ओहो, हेस्टीग्ज, तुला काही समजले नाही, असे कृपया सांगू नकोस.”

मी थोड्या रागाने म्हटले, “स्वयंपाकीण वेगळयाच मार्गाने गेली, ते मला समजले.”

“पण का? सिम्पसनला तिला कुठल्या तरी मार्गाने घराबाहेर काढायचे होते का? तिला त्याच्याबद्दल काही माहिती होते का?”

“काही नाही.”

“मग ठीक आहे --- ”

“पण तिच्याकडे असलेले काही त्याला हवे होते.”

“पैसे? ऑस्ट्रेलीयन इच्छापत्रापमाणे कायदेशीर रीत्या मिळणारे पैसे?”

“नाही माझ्या मित्रा --- काहीतरी अगदी वेगळे.” क्षणभर थांबून, तो कोरडेपणे म्हणाला, “चेपटलेली टीनची बॅग --- “

मी कडेने त्याच्याकडे पाहिले. त्याचे वाक्य इतके चमत्कारिक होते, की मला वाटले तो विनोद करतो आहे. पण तो तर गंभीर होता.

मी ओरडलो, “पण त्याला पाहिजे तर तो विकत घेऊ शकत होता.”

“त्याला नवीन बॅग नको होती. त्याला एका व्यक्तीचे अवशेष असलेली बॅग हवी होती. खात्रीलायक रीत्या मान मिळेल, अशी बॅग हवी होती.”

मी ओरडलो, “हे बघ पायरो, हे जरा धूसर आहे. तू माझी चेष्टा करतो आहेस.”

त्याने माझ्याकडे बघितले. “हेस्टीग्ज, तू मिस्टर सिम्पसनच्या बुद्धिमत्तेचा व कल्पनाशक्तीचा विचार करत नाहीस. इकडे बघ. बुधवारी संध्याकाळी सिम्पसनने स्वयंपाकीणीला जाळ्यात अडकवले. छापील कागद आणि छापील कार्ड बनवणे अगदी सोपे होते. आणि त्याचा बेत यशस्वी होण्यासाठी, तो १५० पौंड आणि

वर्षाचे घराचे भाडे भरायला तयार होता. मिस डनने त्याला ओळखले नाही. दाढी, टोपी आणि थोड्या वेगळ्या उच्चारांमुळे ती फसली. बुधवार संपला. --- फक्त एक फालतू गोष्ट सोडून, की सिम्पसनने स्वतःच पन्नास हजार किमतीच्या भाव वरखाली होऊ शकणाऱ्या मुदत ठेवी चोरल्या.”

“सिम्पसन? पण तो डेव्हीस होता --- “

“हेस्टीग्ज, तू मला जरा बोलून देशील का? सिम्पसनला माहिती होते, की गुरुवारी दुपारी चोरी पकडली जाईल. तो गुरुवारी बँकेत जात नाही. पण डेव्हीस जेवणासाठी बाहेर कधी येतो, याची वाट बघत थांबतो. तो कदाचित चोरी केल्याचे डेव्हीसकडे कबूल करतो आणि त्याला सांगतो, की तो ठेवी त्याला परत करेल --- कसे माहिती नाही, पण तो डेव्हीसला त्याच्याबरोबर क्लॅफॅमला यायला लावतो. तो दिवस स्वयंपाकीणीचा बाहेर जायचा दिवस असतो. आणि मिसेस टोड विक्रीच्या कामाला गेलेली असते. घरी कुणी नसते. जेव्हा चोरी उघडकीला येते आणि डेव्हीस नाहीसा होतो, तेव्हा जो निष्कर्ष निघतो, त्यामुळे आनंदीआनंद होणार असतो. डेव्हीस चोर आहे? मिस्टर सिम्पसन एकदम सुरक्षित असेल. तो दुसऱ्या दिवशी प्रामाणिक कारकून असल्यासारखा बँकेत जाऊ शकेल.”

“आणि डेव्हीस?

पायरोने भावदर्शक हावभाव केले व सावकाश डोके हलवले.

“माझ्या मित्रा, हे विश्वास ठेवण्यास फारच थंड रक्ताचे साहस असल्यासारखे झाले आणि अजून दुसरे काय स्पष्टीकरण असणार? खुन्यासाठी एक अडचण म्हणजे, प्रेताची विल्हेवाट --- आणि सिम्पसनने तो बेत आधीच केलेला आहे. मला एका गोष्टीने धक्का बसला, की जरी एलिझा डनने ती बाहेर गेली { तिचा शिजवलेल्या पीचसंबंधीचा शेरा.} तरी तिने नक्कीच त्या रात्री परत यायचे ठरवले होते. तरीही जेव्हा ते बॅग घेण्यासाठी आले, तेव्हा तिची बॅग आधीच भरलेली होती. सिम्पसनने कार्टर पॅटरसनला निरोप पाठवून, शुक्रवारी बोलावून घेतले. आणि सिम्पसननेच गुरुवारी दुपारी बॅग बांधली. तेव्हा काय संशय येणार? नोकराणी जाते आणि बॅग नेण्यासाठी कार्टर पॅटरसन येतो. नावाची व पत्त्याची चिठ्ठी लावून बॅग बहुधा लंडनपासून जवळच्या स्टेशनवर नेण्यासाठी तयार असते. शनिवारी दुपारी, सिम्पसन त्याच्या ऑस्ट्रेलीयन वेषात त्यावर हक्क सांगतो. त्याला नवीन नावाची व पत्त्याची चिठ्ठी लावतो व दुसऱ्या जागी पोस्ट करतो. जेव्हा काही ठळक कारणांनी अधिकाऱ्याना संशय येतो आणि ते उघडतात, तेव्हा लंडनजवळील एका जंक्शनवर त्यांना काय मिळते, तर दाढीवाल्या ऑस्ट्रेलीयन

माणसाकडून पोस्ट केलेली बॅग. ८८, प्रिन्स अल्बर्ट रस्त्याशी त्याचा काही संबध नसतो. आहा, असे होते.”

पायरोचा तर्क खरा ठरतो. सिम्पसन काही दिवस आधी निसटलेला असतो. पण त्याच्या गुन्ह्यातून निसटणे त्याला शक्य नसते. वायरलेस फोनमुळे ऑलीम्पियाजवळ तो अमेरिकेला जायच्या तयारीत सापडतो.

टिनच्या बॅगेत मिस्टर हेन्री विंटरग्रीन याना पाठवलेले पत्र ग्लासगोला रेल्वे अधिकाऱ्यांच्या लक्षात येते. ते उघडल्यावर बॅगेत दुर्दैवी डेव्हीसचे प्रेत सापडते.

मिस टोडचा २१ शिलिंगचा चेक कधीच वटला नाही. पायरोने तो आमच्या उठाबसायच्या खोलीच्या भिंतीला फ्रेम करून लावला. “हेस्टीग्ज, यामुळे मला नेहमी आठवण येत राहील, की अगदी क्षुल्लक गोष्टीलाही कमी लेखू नका --- ती गंभीरपणे घ्या. एका बाजूला घरातून नाहीशी झालेली स्वयंपाकीण --- आणि दुसऱ्या बाजूला थंड डोक्याने केलेला खून. माझ्या दृष्टीने माझ्या सर्वात रुचीपूर्ण केसेसपैकी एक!”

# THE CASE OF THE MISSING WILL

# हरवलेले इच्छापत्र



मिस व्हायोलेटने आमच्याकडे आणलेली समस्या म्हणजे आमच्यासाठी आमच्या नेहमीच्या कामांपासून सुखावह बदल होता. पायरोला एका बाईकडून थोडक्यात पण व्यावसायिक कामासारखी चिठ्ठी आली होती. त्यात तिने पायरोची भेट मागितली

होती आणि पायरोने तिला उत्तर पाठवून, दुसऱ्या दिवशी अकरा वाजता त्याला फोन करायला सांगितला होता.

ती वेळेवर आली. ती उंच, सुंदर तरुण स्त्री होती. तिचे कपडे साधे, पण नीटनेटके असून ती आत्मविश्वास असलेली व व्यावसायिकता असलेली पण अर्थात व्यावसायिक जगात नव्याने पाऊल ठेवणारी वाटत होती. मी अशा स्त्रियांची स्तुती करणारा नव्हतो. ती चांगली दिसत असूनही माझे तिच्याबद्दलचे मत फारसे अनुकूल झाले नाही.

तिने सुरवात केली. “मिस्टर पायरो, माझा व्यवसाय थोड्या वेगळ्या प्रकारचा आहे. मी तुम्हाला सुरवातीपासून सगळी गोष्ट सांगते.”

“ठीक आहे. बाईसाहेब, सुरवात करा.”

“मी अनाथ आहे. माझे वडील दोन भावांपैकी एक होते. ते डेव्होनशायर मधील एका शेतकऱ्याचे मुलगे होते. शेत थोडेसे होते आणि मोठा भाऊ, अँड्र्यु ऑस्ट्रेलियाला स्थायिक झाला. तिथे त्याचे उत्तम चालले होते. कुशाग्र बुद्धी असल्याने, जमीन खरेदीविक्रीच्या व्यवहारात तो खूप श्रीमंत झाला. लहान भाऊ [ माझे वडील ] शेतीत रुची नसल्याने, थोडेफार शिकून, एका लहानशा कंपनीत कारकून म्हणून काम करू लागले. त्यांनी

त्यांच्यापेक्षा थोड्या वरचढ मुलीशी लग्न केले. माझी आई एका गरीब चित्रकाराची मुलगी होती. मी सहा वर्षांची असताना वडील वारले. मी चौदा वर्षांची असतांना आईदेखील वारली. त्यामुळे मला जवळचे नातेवाईक म्हणजे फक्त अँड्र्युकाका उरले. ते अलीकडेच मूळ गावी परत येऊन, त्यांनी विकत घेतलेल्या क्रॅबट्री मॅनॉरमध्ये रहात होते. ते माझ्यावर अत्यंत प्रेम करत. त्यांनी मला त्यांच्याकडे रहायला आणले. आणि स्वतःच्या मुलीसारखा माझा सांभाळ केला.

क्रॅबट्री मॅनॉर हे एक जुने शेतघर होते. माझ्या काकांच्या रक्तात शेती होती. त्याना शेतीतील वेगवेगळे आधुनिक प्रयोग करून बघायला आवडे. जरी ते माझ्या बाबतीत दयाळु असले, तरी मुलींना वाढवण्यासंबंधी त्यांच्या खोलवर रुजलेल्या अशा काही कल्पना होत्या. त्यांचे शिक्षण फारसे झालेले नव्हते. तरी त्याना उल्लेखनीय गर्व होता. ‘पुस्तकी शिक्षणा’ला ते फार किंमत देत नसत. विशेषतः ते स्त्रीशिक्षणाविरुद्ध होते. घरासाठी उपयुक्त असे घरकाम व डेअरीचे काम मुलींना शिकवावे व पुस्तकांच्या फार फंदात पडू नये, असे त्यांचे मत होते. त्यांनी मला त्या प्रकारे वाढवले. त्यामुळे मी चिडलेली असे व माझी घोर निराशा झाली होती. मी मोकळेपणे बंड करून उठे. माझी बुद्धी चांगली असल्याचे मला माहिती होते आणि घरगुती कामात माझे डोके चालत नसे.

आमचे प्रेम असूनही, या विषयावर काकांचे आणि माझे वाजत असे. आम्ही दोघेही आपापल्या परीने हट्टी होतो. नशीबाने मला स्कॉलरशिप मिळाली. त्यामुळे माझ्या स्वतःच्या मताप्रमाणे मी काही शिक्षण घेऊ शकले. पुढे मी गिरटॉन इथे जायचा विचार करू लागले, तेव्हा संकट उभे राहिले. माझ्याकडे माझ्या आईने ठेवलेले माझे थोडेफार पैसे होते. आणि देवाने मला दिलेल्या गुणांचा जास्तीत जास्त फायदा करून घेण्याचे, मी ठरवले होते. काकांशी माझी शेवटची मोठी वादावादी झाली. त्यांनी त्यांचे म्हणणे सरळपणे माझ्यासमोर ठेवले. त्याना दुसरा काही पाश नव्हता व मी त्यांची एकुलती एक वारस होते. मी तुम्हाला सांगितल्याप्रमाणे ते चांगले श्रीमंत होते.

जरी मी माझे हे नवीन प्रकारचे कारभार चालू ठेवले, तरी माझी त्यांच्याकडून कसलीही अपेक्षा नव्हती. मी नम्र पण ठाम राहिले. मी त्यांना सांगितले, की मी त्यांच्याशी कायम मनापासून जोडलेली राहीन. पण मला माझे आयुष्य जगले पाहिजे. या बोलीवर आम्ही वेगळे झालो. ‘माझ्या मुली, तू तुझ्या मेंदूच्या आदेशाप्रमाणे चाल.’ हे त्यांचे शेवटचे शब्द होते. ‘मला पुस्तकी शिक्षण नाही. पण मी माझ्या कसबाने तुला कधीही इंगा दाखवू शकेन. बघू, पुढे काय होते!’

हे नऊ वर्षांपूर्वी झाले. मी मधून मधून शनिवार रविवार त्यांच्याबरोबर रहात असे. जरी त्यांचा दृष्टीकोन बदलला नाही, तरी आमचे नातेसंबंध पूर्णपणे मित्रत्वाचे व काही कुरबुर नसलेले होते. त्यांनी कधी मी एस एस सी किंवा बी एस सी झाल्याची दखलही घेतली नाही. गेले तीन वर्षे त्यांची तब्येत ढासळली होती. आणि महिन्यापूर्वी ते वारले.”

आता मी तुमच्याकडे का आले आहे, या मुद्द्यावर येते. माझ्या काकांनी विचित्र असे इच्छापत्र मागे ठेवले आहे. त्यातील अटींप्रमाणे, क्रॅबट्री मॅनॉर हे घर त्यातील सामानासकट त्यांच्या मृत्यूपासून एक वर्ष माझ्या ताब्यात राहील --- ‘या कालावधीत माझी हुशार पुतणी तिची बुद्धी पणाला लावेल. त्या एका वर्षाच्या शेवटी, माझा शहाणपणा तिच्यापेक्षा जास्त ठरला तर, घर आणि माझी मोठी संपत्ती निरनिराळ्या सेवाभावी संस्थांना जाईल’. हे त्यांचे मूळ शब्द आहेत.

“मिस्टर मार्श याच्या रक्ताच्या नात्याची तुम्ही एकटीच असल्याने हे बघणे तुम्हाला थोडे जडच गेले असेल, नाही का, बाईसाहेब?”

मी त्याकडे तशा दृष्टीने बघत नाही. अँड्र्युकाकांनी मला त्याबद्दल नीटपणे ताकीद दिली होती आणि मी माझा स्वतःचा मार्ग

निवडला होता. मी त्यांच्या इच्छेप्रमाणे वागले नाही, त्यामुळे त्यांच्या पैशांचे काय करायचे हे ठरवायचे त्याना स्वातंत्र्य होते."

"ते इच्छापत्र वकीलाने केलेले होते का?"

"नाही. ते एका छापील कागदावर लिहिलेले होते व त्यावर काकांच्या घरी रहाणाऱ्या व त्यांचे हवे नको बघणाऱ्या नवरा बायकोची सही होती."

असे इच्छापत्र रद्द होण्याची शक्यता होती का?

"मी असे करण्याचा प्रयत्नही केला नसता."

"म्हणजे तुम्ही ते तुमच्या काकांची इच्छा म्हणून खुल्या दिलाने मान्य केले?"

"बरोबर. मी त्याकडे असेच बघितले."

पायरो विचारपूर्वक बोलला, "नक्कीच ते तसे वाटते आहे. जुन्या, क्रॅबट्री मॅनॉर या घरात तुमच्या काकांनी नोटांच्या स्वरूपात काही पैसे किंवा दुसरे इच्छापत्र लपवून ठेवले असायची शक्यता वाटते. तुम्हाला एक वर्षाची मुदत देऊन, ते शोधून काढायचे आव्हान तुमच्या हुशारीला त्यांनी दिले असावे."

"मिस्टर पायरो, मला तेच वाटते आहे. आणि तुमचे शहाणपण माझ्या वरचढ असल्यामुळे, मी तुमचे अभिनंदन करते आहे."

“ओहो, हा तुमचा चांगुलपणा आहे. माझ्या मेंदूतील करड्या पेशी तुमची समस्या उकलायचा प्रयत्न नक्की करतील. तुम्ही घरात शोधले नाही का?”

“घाईने शोधले. पण माझ्या काकांच्या क्षमतेवर माझा निःसंशय विश्वास असल्याने, ते फार कठीण काम करून ठेवतील, असे मला वाटत नाही.”

“तुमच्याकडे इच्छापत्र किंवा त्याची नक्कल आहे का?”

मिस मार्च यांनी ते काढून दिले. पायरोने ते मान हलवत वाचले.

“हे तीन वर्षांपूर्वी, २५ मार्च रोजी सकाळी ११ वाजता केले आहे --- हे फार सूचक आहे. यामुळे शोधायचे कष्ट कमी होतील. नक्कीच दुसरे इच्छापत्र आपल्याला शोधायला हवे. ते नंतर अर्ध्या तासाने केलेले असले तरी पहिले रद्द होईल. अग मुली, तू माझ्याकडे आणलेली समस्या नावीन्यपूर्ण व छान आहे. ही सोडवतांना मला जगातील सर्व आनंदाचा लाभ होईल. तुझ्या काकांच्या मेंदूतील करड्या पेशी कामसू असल्या तरी हर्क्युल पायरोइतक्या नक्कीच नसतील!”

[ खरे तर पायरोची प्रौढी निलाजरी होती. ]

नशीबाने आता माझ्या हातात काहीही नाही. आज रात्री हेस्टींग आणि मी क्रॅबट्री मॅनॉरमध्ये जाऊ. मला वाटते, तुझ्या काकांच्या वेळी तिथे असणारे जोडपे अजूनही असेल, बरोबर?"

"हो. त्यांचे नाव बेकर आहे."

दोन

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही शोध सुरु केला. आम्ही आदल्या दिवशी रात्री उशीरा तिथे पोचलो. मिस्टर व मिसेस बेकर यांना मिस मार्शकडून तार आली होती. त्यामुळे ते आमची वाटच बघत होते.

ते एक प्रसन्न जोडपे होते. तो माणूस गुलाबी गालांचा पण कोरड्या सुरकुतलेल्या चेहऱ्याचा होता आणि त्याची बायको जाडी पण खरी डेव्होनशायरची शांत बाई वाटत होती.

आम्ही प्रवास करून व स्टेशनपासून पुढे आठ मैल येऊन दमलो होतो. त्यामुळे भाजलेले चिकन, डेव्होनशायर क्रीम व सफरचंदाचा केक खाल्ल्यावर आम्ही झोपी गेलो. सकाळी आमच्यासाठी छानशी न्याहारी तयार होती. कैलासवासी मार्श यांच्या लहानशा काचेची तावदाने असलेल्या, अभ्यासिका व उठाबसायची खोली असलेल्या ठिकाणी आम्ही बसलो होतो. भिंतीजवळ कागदांनी व नीट रचलेल्या फाईलींनी भरलेले टेबल

होते. मोठी चामड्याची हातांची खुर्ची होती. त्यात मालक पूर्वी सतत आरामशीरपणे बसत असल्याचे जाणवत होते. समोरील भिंतीजवळ रंगीबेरंगी कापडाचे आभ्रे घातलेल्या सिटी होत्या. आणि त्याच जुन्या प्रकारच्या कापडाने बुटक्या खिडकीत अंथरलेले कापड होते.

त्याची छोटी सिगरेट पेटवत, पायरो बोलला, “माझ्या चांगल्या मित्रा, आपल्याला आपल्या मोहिमेचा बेत आखला पाहिजे. मी साधारणपणे घराचा अंदाज घेतला आहे. पण माझे असे मत आहे, की या खोलीतच कुठलातरी सुगावा लागेल. फार काळजीपूर्वक रीतीने रचलेल्या या टेबलावरील कागदपत्रांची आपण नीट तपासणी करायला हवी. अर्थात त्यात इच्छापत्र नसेल. पण कुठल्यातरी फालतू कागदात आपल्याला लपवलेल्या जागेचा काही सुगावा सापडू शकेल. पण आधी आपल्याला थोडी माहिती पाहिजे. मी तुला विनंती करतो, घंटी वाजव.”

मी तसे केले. उत्तर मिळण्यासाठी आम्ही थांबलेले असतांना, पायरो चौकसपणे आसपास बघत, वरखाली चालत होता.

मिस्टर मार्श पक्का व्यवस्थित माणूस दिसतो. किती नेटकेपणे कागदपत्रे लावलेली आहेत, नाही का? प्रत्येक खणाच्या हस्तिदंती किल्लीला चिठ्ठी लावलेली आहे. तसेच भिंतीवरील चिनी

कपाटालाही तशीच नावासकट किल्ली लावलेली आहे. आणि आतील सामानदेखील अगदी नीटनेटके रचलेले आहे. त्याने मनाला आनंद मिळतो आहे. इथले काहीच डोळ्यांना खुपत नाही --- “

तो अचानक थांबला. टेबलावरील किल्लीने त्याचे लक्ष वेधून घेतले. त्याला एक मळकट पाकीट जोडले होते. पायरोने हसून ते तिथून काढले. त्यावर वेड्यावाकड्या अक्षरात लिहिले होते, ‘वरील कपाटाची किल्ली’ इतर चिठ्ठ्यांवरील अक्षर त्यामानाने चांगले होते.

पायरो मोठ्याने हसत बोलला, “ही वेगळ्याच प्रकारची चिठ्ठी आहे. माझी खात्री आहे, की इथे आपल्याला मिस्टर मार्श यांचे व्यक्तीमत्व दिसत नाही. पण घरात दुसरे कोण आहे? मिस मार्श. आणि मी चुकत नसेन, तर ती सुद्धा अशीच फार पद्धतशीर तरूणी असणार.”

घंटी ऐकून बेकर आला.

“तू तुझ्या बायकोला घेऊन येशील का? मला तुम्हाला काही प्रश्न विचारायचे आहेत.

बेकर गेला आणि थोड्याच वेळात ॲप्रनला हात पुसणाऱ्या आणि चेहरा चकाकणाऱ्या मिसेस बेकरना घेऊन आला.

स्पष्ट शब्दात पायरोने ते इथे आल्याचे कारण सांगितले. ताबडतोब बेकर मंडळी सहानुभूतीपूर्ण दिसू लागली. ते सामान हॉस्पीटलला मिळणे, हा खरे तर दुष्टपणा होईल.”

पायरोने त्याचे प्रश्न विचारले. हो, मिस्टर आणि मिसेस बेकरना इच्छापत्र केलेले चांगले आठवत होते. बेकरला शेजारील गावात पाठवून, इच्छापत्राचे दोन मसुदे आणले गेले होते.

पायरोने कडकपणे विचारले, “दोन?”

“हो, सर, सुरक्षिततेसाठी असावे. मला वाटते एक काही कारणाने खराब झाला तर म्हणून, त्याने दोन आणायला सांगितले असावे. आम्ही एकावर सह्या केल्या.”

ती दिवसातील कुठची वेळ होती?”

बेकर त्याचे डोके खाजवू लागला पण बायको तत्पर होती. “का, नक्कीच अकरा वाजले होते. कारण मी नुकतेच कोकोमध्ये दूध ओतले होते. तुम्हाला आठवत नाही का? जेव्हा आपण परत आलो, तेव्हा ते सर्व स्टोव्हवर सांडले होते.”

“आणि नंतर?”

“नंतर सुमारे तासाभराने असेल, आम्हाला परत बोलावले. आमचा मालक बोलला, “मी एक चूक केली. त्यामुळे मला ते फाडून टाकावे लागले. तुम्हाला परत सह्या करायचा त्रास घ्यावा

लागेल. मग आम्ही तसे केले. मग मालकाने आम्हाला बऱ्यापैकी पैसे दिले. तो म्हणाला, “मी इच्छापत्रात तुम्हाला काही दिलेले नाही. पण मी गेल्यावर दरवर्षी तुमच्या भवितव्याची सोय मी करून ठेवली आहे. आणि नक्कीच त्याने तसे केले असणार.”

पायरोने विचार केला.

“तुम्ही दुसऱ्यांदा सह्या केल्यावर मिस्टर मार्शने काय केले? तुम्हाला माहिती आहे का?

“नंतर ते व्यापाऱ्यांच्या पुस्तकांचे पैसे देण्यासाठी गावाबाहेर गेले.”

“हे काही एवढे महत्वाचे वाटत नाही. पायरोने दुसरे काही विचारायचे ठरवले. त्याने टेबलाची किल्ली घेतली.

“हे तुमच्या मालकाचे अक्षर आहे का? मी अशी कल्पना करू शकेन.” एक दोन मिनिटांनी बेकर उत्तरला, “हो सर, हे त्यांचे अक्षर आहे.”

मला वाटले, “तो खोटे बोलतो आहे. पण का?”

“तुमच्या मालकाने हे घर कुणाला भाड्याने दिले होते का?—गेल्या तीन वर्षात इथे कुणी परके लोक आले का?”

“नाही, सर.”

"कुणी पाहुणे?"

"फक्त मिस व्हायोलेट."

"कोणीही लोक घरातील खोल्यांमध्ये हिंडले नाहीत?"

"नाही, सर."

त्याच्या बायकोने आठवण केली, "जिम, तू कामाला येणारी माणसे विसरलास."

पायरो तिच्याकडे वळला. "कामाला येणारी माणसे? कसले काम?"

त्या स्त्रीने स्पष्ट केले. "सुमारे अडीच वर्षांपूर्वी, काही दुरुस्तीकामासाठी माणसे घरात आली होती. नेमकी काय दुरुस्ती, ते ती सांगू शकली नाही. तिच्या मते असे असावे, की ते वरवर तिच्या मालकाचे काही खूळ होते व काही गरज नसलेले होते. काही वेळ ते लोक अभ्यासिकेत होते. पण तिथे त्यांनी काय केले, ते ती सांगू शकली नाही. मालकाने काम चालू असतांना त्याना तिथे येऊ दिले नाही. दुर्दैवाने ते काम करणाऱ्या कंपनीचे नाव ते सांगू शकले नाहीत. फक्त ती प्लायमाउथची होती, एवढेच ते सांगू शकले.

बेकर पतीपत्नी खोलीतून गेल्यावर पायरो त्याचे हात चोळत म्हणाला, "हेस्टींग्ज, आपण प्रगती करतो आहोत. नक्कीच त्याने

दुसरे इच्छापत्र केले होते. आणि प्लायमाउथच्या लोकांनी येऊन ते लपवण्याची जागा तयार केली. इथे शोधाशोध करत बसण्यापेक्षा, आपण प्लायमाउथला जाऊ.”

थोडा त्रास घेतल्यावर आम्हाला मिस्टर मार्श यांनी कुणाकडून काम करून घेतले, ती पाहिजे ती, माहिती मिळाली.

त्या कंपनीतील काम करणारे लोक तिथे बऱ्याच वर्षांपासून काम करत होते. मिस्टर मार्शच्या सांगण्यानुसार काम करणारे दोन लोक शोधून काढणे फार अवघड नव्हते. त्यांनी काय काम केले होते, ते त्यांना पूर्णपणे आठवत होते. इतर अनेक फुटकळ कामांबरोबर, त्यांनी जुन्या शेकोटीतील एक वीट काढून तिथे पोकळी केली होती. आणि तिथे काही जोडकाम दिसणार नाही, याची काळजी घेतली होती. दुसरी वीट टोकाकडून दाबून, सर्व भाग उचलून घेतला गेला. हे खूप गुंतागुंतीचे काम होते. आणि मिस्टर मार्शना त्याबद्दल विशेष आस्था होती. आम्हाला माहिती देणारा माणूस मोठा, वाकलेला आणि काळ्यापांढऱ्या मिशांचा कोघान नावाचा माणूस होता. तो बुद्धिमान वाटत होता.

आम्ही मोठ्या उत्साहाने क्रॅबट्री मॅनॉरमध्ये परत आलो. अभ्यासिकेचे दार कुलुपबंद करून, आमचे नवीन ज्ञान आजमावून बघू लागलो. विटांवर काही खुणा दिसणे शक्य नव्हते. पण

आम्हाला माहिती झाले होते, त्याप्रमाणे दाब दिल्यावर, एक मोठी पोकळी दिसू लागली.

उत्कंठा वाटून पायरोने आतमध्ये हात घातला. त्याच्या चेहऱ्यावर, अभिमानास्पद समाधानापासून ते काळजीपर्यंत भाव उमटून गेले. पण त्याच्या हाताला काय लागले, तर जळून गेलेला एक कागदाचा कडक तुकडा. तो सोडून पोकळी रिकामी होती.

पायरो रागाने म्हणाला, “अरेरे, आपल्या आधी कोणीतरी येऊन गेलेले दिसते.”

आम्ही तो अर्धवट जळालेला कागद उत्सुकतेने तपासला.

तो नक्कीच आम्ही शोधत असलेल्या कागदाचा तुकडा होता. बेकरची सही असलेला भाग फक्त शिल्लक राहिला होता. पण इच्छा पत्रातील मजकूर काय होता, ते समजत नव्हते.

पायरो टाचांवर बसला. जर आम्ही एवढे उद्दीपित नसतो, तर त्याचे हावभाव विनोदीच वाटले असते. तो गुरगुरला, “मला समजत नाही, हे कुणी जाळले? आणि त्यांनी ते का केले?”

मी सुचवले, “बेकर पतीपत्नी. ”पण ते असे का करतील? त्यापासून त्यांचा काय फायदा आहे? ते मिस मार्शच्या बाजूने उभे राहिले, तर थोडा तरी फायदा आहे. घराचे हॉस्पीटल झाले, तर त्यांचा काहीच फायदा नाही. त्यामुळे ते कशाला इच्छापत्र नाहीसे

करतील? हॉस्पीटलचा फायदा --- हो, पण कोणी संस्थेवर संशय घेऊ शकत नाही.”

मी सुचवले, “कदाचित मिस्टर मार्शने त्याचा मानस बदलून स्वतःचे नुकसान करून घेतले असेल.”

पायरो उभा राहिला. नेहमीच्या काळजीने त्याने गुडघे झटकले.

त्याने कबूल केले, “हेस्टींग्ज, तुझे एक निरीक्षण सर्वात योग्य असे असू शकेल. ठीक आहे आपण अजून काहीतरी करू. मर्त्य माणूस जे करेल, ते सर्व आपण केले आहे. कैलासवासी मार्शच्या विरुद्ध आपण आपले सगळे शहाणपण पणाला लावले आहे. पण दुर्दैवाने आपण यशस्वी होण्यासाठी, त्याची पुतणी काही कामाची दिसत नाही.”

आम्ही ताबडतोब स्टेशनला गेलो. जरी ती जलद गाडी नसली, तरी आम्हाला लगेच एक लंडनची गाडी मिळाली. पायरो निराश आणि असमाधानी होता. माझ्यापुरते बोलायचे, तर मी दमल्यामुळे एका कोपऱ्यात डुलक्या मारत होतो. आम्ही टॉउनटॉन स्टेशन सोडल्यावर, पायरोने एक चढी भेदक किंकाळी मारली.

“हेस्टींग्ज, चल जागा हो. झटपट उडी मार. मी म्हणतो उडी मार.”

मला काही समजण्यापूर्वी मी फलाटावर उभा होतो. डोक्यावर काही नव्हते आणि लहान बॅगा आमच्याजवळ नव्हत्या. रात्रीच्या अंधारात शिट्टी मारून गाडी निघून गेली. मी रागावलो होतो. पण पायरोने काही लक्ष दिले नाही.

तो ओरडला, "मी किती मूर्ख होतो! तिप्पट मूर्ख! परत कधी मी माझ्या मेंदूतील करड्या पेशीच्या बढाया मारणार नाही."

मी गुरगुरत बोललो, "माझ्या दृष्टीने हे चांगले झाले. पण हे सर्व काय आहे?"

नेहमीप्रमाणे त्याच्या कल्पनांचा पाठपुरावा करतांना पायरोने माझ्याकडे दुर्लक्ष केले.

"व्यापाऱ्यांची पुस्तके --- मी ते पूर्णपणे कसे काय विसरून गेलो? हो. पण कुठे? कुठे? ठीक आहे, माझी चूक होणार नाही. आपण पटकन परत गेले पाहिजे."

करण्यापेक्षा बोलणे सोपे आहे. आम्हाला एक्झेटरला दुसरी जलद नसणारी गाडी मिळाली आणि तिथे मग पायरोने एक गाडी भाड्याने घेतली. सकाळच्या वेळी आम्ही क्रॅबट्री मॅनॉरमध्ये परत आलो. आम्हाला बघून बेकर मंडळी आश्चर्यात बुडून गेली. कुणाकडे काही लक्ष न देता, पायरो ताबडतोब अभ्यासिकेत गेला.

"माझ्या मित्रा, मी तिप्पट मूर्ख नव्हे तर छत्तीस वेळा मूर्ख आहे. त्याने म्हटले, "आता धीर धर."

सरळ टेबलाशी जाऊन, त्याने किल्ल्या बाहेर काढल्या. त्यापासून पाकीट सुटे केले. मी वेड्यासारखा त्याच्याकडे बघत होतो. त्या लहानशा पाकिटात, त्याला मोठे इच्छापत्र मिळायची आशा होती का? त्याने काळजी घेऊन पाकीट फोडले. मग त्याने विस्तव पेटवला आणि पाकिटाची आतली बाजू ज्योतीवर धरली. काही मिनिटात अक्षरे उमटू लागली. "अरे मित्रा, बघ" तो विजयोन्मादाने ओरडला.

मी पाहिले. 'त्याने सर्व काही त्याच्या पुतणीसाठी, व्हायोलेट मार्शसाठी ठेवले आहे', अशा काही पुसट ओळी तिथे होत्या. २५ मार्च ही तारीख व साडेबाराची वेळ होती. त्यावर साक्षीदार म्हणून बेकरीवाला अल्बर्ट पाईक, व जेसी पाईक ही त्याची बायको, यांच्या सह्या होत्या.

मी विचारले, "पण हे कायदेशीर आहे का?"

"मला माहिती आहे, त्याप्रमाणे, इच्छापत्रात अशी नाहीशी होणारी पुसट अक्षरे लिहिणे, हे काही कायद्याविरुद्ध नाही. हे करणाऱ्याचा हेतू स्पष्ट आहे. आणि लाभार्थी ही त्याची एकमेव जिवंत वारस आहे. पण त्याची हुशारी बघा. त्याने शोधणाऱ्याला

घ्याव्या लागणाऱ्या प्रत्येक पायरीचा विचार केला --- मी गोंधळलेल्या मूर्खाने त्या घेतल्या. त्याने इच्छापत्राचे दोन मसुदे मागवले. नोकरांना दोनदा सह्या करायला लावल्या. आणि मग डोके वापरून, मळकट पाकिटाच्या आतील बाजूस, खरे इच्छापत्र लिहिले. त्याचे शाईचे मिश्रण त्याने त्या पेनासाठी वापरले. काही कारणाने त्याने बेकरीवाल्या जोडप्याची सही त्यावर मिळवली. त्याना त्यांचे नाव त्याच्या स्वतःच्या सहीखाली लिहायला लावले. मग त्याने ते टेबलावरील किल्लीला बांधले व स्वतःशीच हसला. जर त्याच्या पुतणीने त्याची छोटीशी फसवणुकीची गंमत शोधून काढली, तर तिच्या आयुष्याचे कल्याण होऊन, तिच्या शिक्षणाचीही सोय होणार. तिला त्याचे सगळे पैसे मिळणार.”

मी हळूच बोललो, “पण तिला ते कुठे सापडले, नाही का? त्यामुळे हे बरोबर वाटत नाही. अँड्र्युकाका खरोखर जिंकले.”

“हेस्टींग्ज, पण नाही. तुझा शहाणपणा योग्य मार्गावरून भरकटतो आहे. मिस मार्शने तिचा शहाणपणा व स्त्रियांसाठी उच्च शिक्षणाचे महत्व, माझ्या हातात झटपट ही गोष्ट देऊन स्पष्टपणे सिद्ध केले आहे. नेहमी त्या बाबीतील तज्ञ व्यक्तीला पाचारण करा. तिचा काकांच्या पैशांवरील हक्क तिने खूप चांगल्या तऱ्हेने दाखवून दिला.”

मला नवल वाटते --- फारच नवल वाटते --- की म्हाताऱ्या अँड्र्यु मार्शने हे करतांना काय विचार केला असेल!

# The Double Clue

# दुहेरी पुरावा



मिस्टर मार्क्युस हार्डमन कदाचित चौदाव्यांदा बोलला, “पण सगळ्यात महत्वाचे म्हणजे --- प्रसिद्धी नाही.”

त्याच्या संभाषणात प्रसिद्धी हा शब्द अगदी सतत येत होता. मिस्टर हार्डमन एक लहानसा माणूस होता. तो नाजूक तरीही जाडसर, हातांची खूप सुंदर निगा राखलेला आणि दुःखी, किनऱ्या आवाजाचा होता. फॅशनेबल आयुष्य हा त्याचा व्यवसाय असून तो

समाजात ठळकपणे ओळखला जाणारा होता. तो श्रीमंत होता. पण अती श्रीमंत नव्हता. सामाजिक आनंदासाठी, तो मोठ्या उत्साहाने पैसा खर्च करे. संग्रह करणे, हा त्यांचा छंद होता. त्याचा आत्मा संग्राहकाचा होता. जुनी लेस, जुने पंखे, जुने सुंदर दागिने --- मार्क्युस हार्डमनसाठी नैसर्गिक स्थितीतले वा आधुनिक असा काही फरक नव्हता.

त्याच्या तातडीच्या बोलावण्यावरून, पायरो आणि मी त्याच्याकडे गेलो तेव्हा, काही निर्णय घेणे शक्य होत नसल्याने, तो दुःखी झालेला दिसला. तशा परिस्थितीत, त्याच्या संग्रहातील काही हिरे हरवले असतांना, पोलिसांना बोलावणे बरोबर वाटत नव्हते. पण दुसरीकडे अशा वेळी पोलिसांना न बोलावणेसुद्धा हिरे गमावण्यासारखे होते. त्यामुळे मध्यम मार्ग म्हणून त्याने पायरोला बोलावले.

"मिस्टर पायरो, माझ्याकडील हिऱ्याचे नेकलेस कॅथरीन डे मेडीसी हिच्या मालकीचे होते. ओहो, ते नेकलेस कसे हरवले!"

पायरो हळूवारपणे म्हणाला, "तुम्ही ते कुठल्या परिस्थितीत हरवले, ते सांगता का?"

"मला ते सांगितलेच पाहिजे. काल दुपारी माझ्याकडे छोटीशी चहा पार्टी होती --- अगदी घरगुती स्वरूपाची --- आम्ही पाच सहा

लोक होतो. त्या ऋतुत मी अशा एकदोन पार्ट्या दिल्या होत्या. आणि खरे तर मी असे म्हणायला नको, पण त्या चांगलेच यशस्वी झाल्या. मोठ्या स्टुडिओमध्ये नाकोरा या पियानोवादकाने वाजवलेले चांगले संगीत आणि कॅथेरीन बर्ड या खर्जात गाणाऱ्या ऑस्ट्रेलीयन गायकाने गाईलेले गाणे झाले. मी मध्ययुगातील माझा हिऱ्यांचा संग्रह पाहुण्यांना दाखवत होतो. मी त्यांना एका भिंतीपलीकडे सुरक्षित अंतरावर ठेवले होते. त्या संग्रहासाठी एक छोटीशी तिजोरी बनवलेली होती. त्यात मखमलच्या रंगीत पेट्र्यांमध्ये ते ठेवलेले होते. मग आम्ही सर्वजण संगीतासाठी स्टुडिओमध्ये गेलो.

मी त्या खोलीतील तिजोरीत, ते हिरे सुरक्षित ठेवतो. त्या खोलीत लहानसे कप्पे करून ते मखमलच्या रंगीत पेट्र्यांमध्ये ठेवलेले आहेत. तिथे आम्ही पंख्यांची तपासणी केली. मग आम्ही सर्वजण संगीतासाठी स्टुडिओमध्ये गेलो. सगळेजण गेल्यावर माझ्या लक्षात आले, की तेथील नेकलेसची चोरी झाली आहे. मी बहुधा ती तिजोरी नीट बंद केली नसावी. कोणीतरी ती संधी साधून, त्यातील माल चोरला.

मिस्टर पायरो, हिरे जडवलेले नेकलेस --- जीवनभराचा संग्रह! ते हिरे मिळवण्यासाठी मी काहीही देईन. पण याचा बोलबाला

व्हायला नको. मिस्टर पायरो, हे तुम्हाला नीट समजले का? तिथे फक्त माझे स्वतःचे खासगी पाहुणे व माझे व्यक्तीगत मित्रच होते! हे भयंकर प्रकरण होईल.

तुम्ही स्टुडिओमध्ये गेलात, तेव्हा सर्वात शेवटी कोण होते?

"मिस्टर जॉन्स्टन. तुम्हाला ते माहिती आहेत का? दक्षिण आफ्रिकेतील लखपती. त्यांनी नुकतेच पार्क गल्लीतील ॲबॉटबरीचे घर भाड्याने घेतले आहे." तो काही वेळ मागे रेंगाळला. "पण नक्की अगदी खात्रीने तो नसणार!"

"तुमच्या पाहुण्यांपैकी कोणी पाहुणे काही कारणाने या खोलीत दुपारी आले होते का?

"हा प्रश्न मला अपेक्षित होता. मिस्टर पायरो, त्यातील तिघांनी असे केले होते. वेरा रॉसकोफ बाईसाहेब, मिस्टर बर्नार्ड पार्कर आणि रुनकॉर्न बाईसाहेब."

"मग आपण त्यांच्याविषयी बोलू."

"वेरा रॉसकोफ ही सुंदर रशियन बाई आहे. ती जुन्या सरकारी अधिकारातील सभासद असून ती नुकतीच या देशात आलेली आहे. तिने माझा निरोप घेतला आणि मग इथे माझ्या पंखे रचलेल्या संग्रहालयाकडे आनंदाने बघत बसलेल्या तिला बघून मला आश्चर्य वाटले. मिस्टर पायरो, तुम्हाला माहिती असेल, मी याबद्दल जितका

अधिक विचार करतो, तेवढे मला अधिक संशयी वाटते. तुम्ही याच्याशी सहमत असाल ना?"

"खूपच संशयी, पण आता आधी इतरांबद्दल ऐकू या."

"मी रुनकॉर्न बाईसाहेबांना दाखवण्यासाठी उत्सुक असलेल्या छोट्या छोट्या वस्तु ठेवण्यासाठी पार्कर पेटी घेऊन इथे आला होता."

"आणि रुनकॉर्न बाईसाहेब स्वतःही?"

"मी असे म्हणण्याचे धाडस करतो, की तुम्हाला माहिती असल्या प्रमाणे, रुनकॉर्न बाईसाहेब ही मोठी चारित्र्यवान मध्यमवयीन बाई असून ती तिचा बराचसा वेळ वेगवेगळ्या धर्मादाय संस्थांच्या कार्यासाठी घालवते. ती फक्त तिची इथे कुठेतरी ठेवलेली बॅग घेण्यासाठी आली होती."

"तर मित्रा, आपल्याकडे चार संशयित आहेत. दोघी रशियन व इंग्लिश बाईसाहेब, दक्षिण आफ्रिकेतील लखपती व मिस्टर बर्नार्ड पार्कर. हा मिस्टर पार्कर कोण आहे?"

हा प्रश्न मिस्टर हार्डमनना लाज आणणारा होता.

"ते एक त --- रु --- ण मनुष्य आहेत. खरे तर माझ्या ओळखीचा एक तरुण मनुष्य."

पायरो थंडपणे बोलला, "हा मिस्टर पार्कर काय करतो?"

“तो शहरातील एक तरुण मनुष्य आहे --- कदाचित मी असे म्हणू शकेन, की तो एक उल्लेखनीय व्यक्ती आहे.”

“मी असे विचारू शकतो का, की तो तुमचा मित्र कसा झाला?”

“अं --- एकदोन प्रसंगी त्याने मला थोडी सूट मिळवून दिली.”

पायरो म्हणाला, “चालू ठेवा.

हार्डमनने त्याच्याकडे दयाबुद्धीने पाहिले. शेवटी त्याने सुरु केले. पण पायरो जराही विचलित न झाल्याने, थोडा खट्टू होत, तो सारांश सांगू लागला.

“मिस्टर पायरो, असे बघा, हे जगजाहीर आहे, की मला जुन्या उत्तम रत्नांमध्ये रुची आहे. कधीकधी कुटुंबातून वारसाहक्काने ते आलेले असतात. तुम्हाला सांगतो ते खुल्या बाजारात किंवा दलालामार्फत कधीही विकले जात नाहीत. पण खासगी विक्री हे माझ्यासाठी वेगळे प्रकरण आहे.

अशा गोष्टी पार्कर जमवतो. तो दोन्ही बाजूंकडून संपर्कात असतो. त्यामुळे थोडे बुजल्यासारखे होणे टाळले जाते. तो अशा गोष्टी माझ्या लक्षात आणून देतो. उदाहरणार्थ, वेरा बाईसाहेबांनी काही कौटुंबिक रत्ने रशियाहून तिच्याबरोबर आणली होती. ती ती

रत्ने विकायला उत्सुक होती. हा व्यवहार घडवून आणायची जबाबदारी पार्करने घेतली.”

पायरो विचारपूर्वक बोलला, “अस्स! आणि तुम्ही त्याच्यावर पूर्णपणे विश्वास ठेवता?

“मला दुसरे काही करणे शक्य नसते.”

“मिस्टर हार्डमन, या चौघांपैकी तुम्ही कोणाचा संशय घ्याल?”

“ओहो मिस्टर पायरो, काय प्रश्न आहे? मी तुम्हाला सांगितल्याप्रमाणे, ते माझे मित्र आहेत. मला त्यांच्यापैकी कुणावरच संशय घ्यायचा नाही --- किंवा सर्वांवर घ्यायचा आहे. तुम्ही त्याकडे कसेही बघा.”

“मला हे कबूल नाही. तुम्ही चौघांपैकी एकावर संशय आहे, असे म्हणा. ती व्यक्ती वेरा किंवा मिस्टर पार्कर नसतील, तर मग रुनकॉर्न बाईसाहेब किंवा मिस्टर जॉनस्टन आहेत का?”

“मिस्टर पायरो, तुम्ही खरेच मला कोंडीत पकडत आहात. मला कुठलीही भानगड करायची नाही. रुनकॉर्न बाईसाहेब इंग्लंडमधील सर्वात जुन्या कुटुंबांपैकी एक आहेत. पण दुर्दैवाने हे खरे आहे की तिची आत्या कॅरोलीन बाईसाहेब, ही निष्कारण दुःखी होणाऱ्यातली बाई होती. अर्थात हे तिच्या सगळ्या मैत्रिणींना

समजलेले होते आणि तिच्या नोकराणीने अगदी पूर्ण प्रामाणिकपणे लहानसा चमचादेखील कधी चोरला नव्हता. तुम्हाला माझी नकोशी परिस्थिती लक्षात आली असेल.”

“या रुनकॉर्न बाईसाहेबांना पैशांची काही कमी नसतांना, सतत नसांचे काही स्वरूपाचे दुखणे असणारी एक आत्या आहे. हे फारच रुचीपूर्ण आहे. तुम्ही मला तिजोरीची तपासणी करायची परवानगी द्याल का?”

मिस्टर हार्डमनने होकार दिल्यावर मिस्टर पायरोने तिजोरीचे दार ढकलले व आतील भागाची तपासणी केली. रिकामे मखमलचे कप्पे सताड उघडले.

मागेपुढे होत पायरो पुटपुटला, “आता सुद्धा दारे नीट बंद होत नाही आहेत. मला नवल वाटते, असे का होते आहे? इथे काही अडकले आहे का? ओहो, बिजागरीत एक मोजा अडकला आहे. कुण्या माणसाचा मोजा.”

त्याने तो ओढून मिस्टर हार्डमनला दिला. तो म्हणाला, “हा माझा एक मोजा नाही.

“ओहो, अजून काहीतरी! पायरोने खुबीने झटपट तिजोरीच्या फरशीवरून एक चपटी सिगरेट केस काढली. ती चमकदार काळ्या रेशमाची बनवलेली होती.

मिस्टर हार्डमन ओरडला, “माझी सिगरेट केस!”

“तुमची? मिस्टर ती नक्कीच तुमची नसेल. ही तुमच्या नावाची आद्याक्षरे नाहीत.”

त्याने प्लॅटीनममध्ये कोरलेली दोन अक्षरे दाखवली. हार्डमनने ती हातात घेतली.

तो म्हणाला, “तुमचे बरोबर आहे. ही अगदी माझ्या केससारखी आहे. पण ही आद्याक्षरे वेगळी आहेत. एक B आहे व दुसरे P आहे. बापरे, पार्कर!”

पायरो म्हणाला, “असे दिसते आहे खरे! काहीसा निष्काळजी तरुण माणूस --- विशेषतः जर मोजा त्याचा असेल, तर नक्कीच. तो दुहेरी पुरावा होईल, नाही का?”

हार्डमन पुटपुटला, बर्नार्ड पार्कर! चला सुटलो! मिस्टर पायरो, मी रत्ने मिळवणे तुमच्यावर सोडतो. तुम्हाला योग्य वाटले तर तुम्ही हे प्रकरण पोलिसांकडे सोपवा --- म्हणजे जर तो चोर असल्याची तुमची खात्री असेल, तर!”

पायरोबरोबर मी बाहेर पडतांना तो बोलला, ‘मित्रांनो, अच्छा.” त्याच्याकडे उच्चभ्रू लोकांसाठी एक कायदा होता आणि या हार्डमनसाठी दुसरा कायदा होता. मला अजून नाव मिळाले नव्हते. त्यामुळे, मी तटस्थ होतो. मला या तरूणाबद्दल सहानुभूती

होती. ही सगळी गोष्ट मोठी चौकस स्वरुपाची होती, नाही का? इथे हार्डमनचा रुनकॉर्न बाईसाहेबांवर संशय होता. मी वेरा बाईसाहेबांवर आणि जॉन्स्टनवर संशय घेत होतो आणि सर्व वेळ खात्री नसलेला पार्कर आमचा माणूस होता.”

“तू त्या दुसऱ्या दोघांचा संशय का घेतोस?”

“तसेच असणार!, की रशियन निर्वासित असणे किंवा दक्षिण आफ्रिकन लखपती असणे ही अगदी साधी गोष्ट आहे. कुठ्लीही स्त्री स्वतःला रशियन म्हणवू शकते. कुणीही पार्क गल्लीत घर विकत घेऊ शकतो व स्वतःला दक्षिण आफ्रिकन लखपती म्हणवू शकतो. त्याना कोण प्रश्न करणार आहे? मला दिसते आहे, की आपण बरी रस्त्यावरून जात आहोत. आपला निष्काळजी मित्र इथे रहातो. लोखंड गरम असतानाच आपण त्याच्यावर घाव घालू.”

मिस्टर बर्नार्ड पार्कर घरी होता. आश्चर्यकारक अशा जांभळा आणि शेंदरी गाउन घातलेल्या त्याला आम्ही उशांवर पहुडलेले पाहिले. या पांढऱ्या बायकी चेहऱ्याच्या, चाचरत बोलणाऱ्या तरूण माणसाइतका माझा कुणीही नावडता नव्हता.

पायरो थोडक्यात म्हणाला, “मिस्टर, शुभ सकाळ. मी मिस्टर हार्डमनकडून आलो आहे. कालच्या पार्टीच्या वेळी कुणीतरी

त्याचे सगळे हिरे चोरले. मिस्टर, मला तुम्हाला असे विचारू दे की हा मोजा तुमचा आहे का?”

मिस्टर पार्कर भरभर विचार करू शकत नसत. ते त्यांची बुद्धीमत्ता गोळा करत, मोज्याकडे पाहू लागले.

शेवटी त्यांनी विचारले, “तुम्हाला तो कुठे मिळाला?”

“मिस्टर, हा तुमचा आहे का?”

मिस्टर पार्करनी त्यांच्या मनाची तयारी केलेली दिसली.

त्याने जाहीर केले, “नाही. हा माझा नाही.”

“आणि ही सिगरेट केस, ही तुमची आहे का?”

“खात्रीने नाही. माझ्याकडे नेहमी चांदीची असते.”

“ठीक आहे मिस्टर, मी आता पोलिसांपुढे हे प्रकरण ठेवण्यासाठी जातो.”

काही कारणाने किंचाळत, मिस्टर पार्कर म्हणाले, “ओहो, मी काय म्हणतो, मी तुमच्या जागी असतो, तर मी असे केले नसते. पोलीसांचे वर्तन सहानुभूतीपूर्ण नसून, पशुतुल्य असते. थोडे थांबा. मी जाऊन हार्डमनला भेटतो. असे बघा --- ओहो, मिनिटभर थांबा.”

पण पायरोने मनाशी ठरवल्याप्रमाणेच केले.

पण पायरोने आतल्या आत हसत, मनाशी म्हटले, “आपण त्याला विचार करायला वेळ दिला, नाही का? काय झाले ते आपण आता उद्या बघू.”

पण त्या दुपारी आम्हाला हार्डमनच्या केसची आठवण करणारा निरोप येणे नशिबात होते. काहीही सूचना न देता धाडकन दार सताड उघडले गेले आणि आमचा खासगीपणा उडवून लावत, वाऱ्याच्या वावटळीसारखी एक बाई आत शिरली. तिने तिच्याबरोबर फरवाला, छोट्या शेपटीचा तपकिरी कुत्रा [ जूनमधील इंग्लंडचा दिवस जितका गार असेल, तितके गार होते. ] व नकोसा असा कापलेला ऑस्प्रे पक्षी टोपीत घालून आणला होता. ती काहीशी उपद्रवकारक व्यक्तीमत्वाची वेरा रॉसकोफ बाई होती.

“तुम्ही मिस्टर पायरो का? हे तुम्ही काय केले? तुम्ही त्या गरीब बिचाऱ्या मुलाला शिव्या दिल्यात. हे कुणाला माहिती नाही. हे काही प्रकरण असल्यासारखे वाटते आहे. मी त्याला ओळखते. तो कोंबडीचे पिल्लू आहे. एक बकरी आहे --- तो कधीही चोरी करू शकणार नाही. त्याने सर्व काही माझ्यासाठी केले आहे. मी डोळयादेखत तुम्हाला त्याला हुतात्मा बनवताना व कापतांना पाहू का?”

पायरोने काळी रेशमाची सिगरेट केस बाहेर काढून दाखवत विचारले, “बाईसाहेब, मला सांगा, ही त्याची सिगरेट केस आहे का?”

ती केस तपासत असतांना, क्षणभर थांबली.

“हो. ही त्याचीच आहे. मला ती चांगली माहिती आहे. त्याचे काय? तुम्हाला ती खोलीत सापडली का? आम्ही सगळे तिथे होतो. मला वाटते, तेव्हा ती पडली असेल. तुम्ही लाल द्वाररक्षकांपेक्षा वाईट आहात --- “

“आणि हा त्याचा मोजा आहे का?”

“मला कसे माहिती असेल? एकासारखे एक मोजे असू शकतात. मला थांबवायला बघू नका --- त्याला तुम्ही मोकळे सोडायलाच हवे. त्याचे चारित्र्य निष्कलंकच असणार. हे तुम्ही कराल. मी माझी रत्ने विकून तुम्हाला भरपूर पैसे देईन.”

“बाईसाहेब --- “

“हे तुम्हाला कबूल आहे तर? नाही. नाही. वाद घालू नका. बिचारा मुलगा! तो माझ्याकडे आला आणि त्याच्या डोळ्यात अश्रू?

मी म्हणाले, “मी तुला वाचवेन. मी या माणसाकडे जाईन --- हा नरभक्षक राक्षस! हे वेरावर सोडा. आता हे ठरले. मी जाते.”

ती जितक्या ठसक्यात आली होती, त्याच ठसक्यात, तिच्यामागे तिच्या सेंटचा सुगंध दरवळत ठेऊन, निघून गेली.

मी ओरडलो, “काय बाई आहे! आणि काय हा अगोचरपणा!

“ओहो, हो. ते सगळे खरेखुरे आहे. एखादी खोटी प्रतिष्ठीत बाईच असला अगोचरपणा करू शकेल --- नाही, मला वाटते, ती खरेच रशियन आहे. ठीक आहे. ठीक आहे. तो तरुण बर्नार्ड बकरीसारखा बें बें असा रडका आवाज काढत तिच्यामागे लपतो आहे.”

“सिगरेट केस त्याची आहे. मला वाटते मोजादेखील त्याचाच --- “

पायरोने हसत हसत त्याच्या खिशातून दुसरा मोजा काढत, तो पहिल्याशेजारी ठेवला. ती जोडी बरोबर जमत होती.

“पायरो, तुला हा दुसरा मोजा कुठे मिळाला?”

“बरी रस्त्यावरील हॉलमधील टेबलावर तो काठीने उचलून फेकण्यात आला होता. खरेच मिस्टर पार्कर हा फारच निष्काळजी माणूस आहे. ठीक आहे. माझ्या मित्रा, आता गोष्टी सुरळीत करण्यासाठी आपल्याला यातून गेले पाहिजे. मी एकदा पार्क गल्लीला भेट देतो.

मी माझ्या मित्राबरोबर तिथे गेलो, हे काही सांगायला नको. जॉन्स्टन बाहेर गेला होता. पण आम्हाला त्याची खासगी सचिव भेटली. हे उघड झाले, की जॉन्स्टन नुकताच दक्षिण आफ्रिकेहून आला होता. त्यापूर्वी तो कधीही इंग्लंडमध्ये नव्हता.

धोका घेत असल्यासारखे पायरोने विचारले, “त्याला हिऱ्यांमध्ये रुची आहे का?”

ती सचिव हसत बोलली, “सोन्यांच्या खाणीत रुची आहे, हे जवळजवळ बरोबर आहे.”

पायरो त्या भेटीनंतर विचारमग्न झाला. त्या संध्याकाळी उशीरा त्याला रशियन व्याकरण शिकताना पाहून मी आश्चर्यचकित झालो.

मी ओरडलो, “पायरो, हे काय? वेरा बाईसाहेबांबरोबर रशियनमधून संभाषण करता येण्यासाठी तू रशियन शिकतो आहेस का?”

“माझ्या मित्रा, ती इंग्लिशमधून माझे बोलणे नक्कीच ऐकून घेणार नाही!”

“पण पायरो, रशियन्स नेहमी फ्रेंच बोलू शकतात, ना?”

“हेस्टींग्ज, तू म्हणजे माहितीची खाणच आहेस. मी या दुर्बोध रशियन भाषेचा नाद सोडून देतो.”

त्याने ते पुस्तक फेकून दिले. पण माझे पूर्ण समाधान झाले नाही. मला सवयीने त्याच्या डोळ्यातील चमक दिसली. ही तो स्वतःवर खूष असल्याची खूण होती.

मी मोठ्या शहाणपणाने म्हणालो, “कदाचित, तुला ती खरी रशियन आहे की नाही, असा संशय आहे. तू तिची परीक्षा घेऊन बघणार आहेस का?”

“नाही. नाही. ती नक्कीच रशियन आहे.”

“ठीक आहे, मग?”

“हेस्टींग्ज, तुला हे खरेच जाणून घ्यायचे असेल, तर मी तुला जुजबी रशियनमध्ये तिची परीक्षा घेण्याचा सल्ला देईन.”

मग तो हसला व पुढे काही बोलला नाही. मी जमिनीवरून ते पुस्तक उचलले पण चौकसपणे पायरोच्या उद्गारांकडे काही लक्ष दिले नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्हाला काही बातमी कळली नाही. पण त्यामुळे माझ्या छोट्याशा मित्राला काही काळजी वाटली नाही. न्याहारीच्या वेळी त्याने, मिस्टर हार्डमनला लवकरच बोलावण्याचा इरादा बोलून दाखवला. आम्हाला मोठे सामाजिक फुलपाखरू घरीच सापडले. आणि ते आदल्या दिवसापेक्षा शांत झालेले होते.

त्याने उत्सुकतेने विचारले, "मिस्टर पायरो, काही बातमी आहे का?"

पायरोने त्याच्या हातात एक चिठ्ठी दिली.

"मिस्टर, -- या व्यक्तीने रत्ने चोरली. मी हे प्रकरण पोलिसांकडे सोपवू का? की पोलिसांना मध्ये न आणता तुम्ही मला रत्ने परत मिळवून देण्यासाठी सांगाल?"

मिस्टर हार्डमन वर्तमानपत्राकडे शून्यात नजर लाऊन बसले होते. शेवटी त्यांना बोलायचे सुचले, "फारच नवलपूर्ण! मला नक्कीच याचे मोठे प्रकरण व्हायला नको आहे. मी तुम्हाला तुमच्या पद्धतीने ही केस हाताळायचे स्वातंत्र्य देतो. मिस्टर पायरो, माझी खात्री आहे, की तुम्ही त्यात गुप्तता पाळून ती सोडवाल."

नंतर आम्ही टॅक्सी केली व कार्लटनला निघालो. तिथे पायरोने वेरा रॉसकोफ बाईसाहेबांची चौकशी केली. थोड्याच वेळात आम्हाला तिच्या खोलीत नेण्यात आले. तिने हात पसरून आमचे स्वागत केले तिने जंगली डिझाईनचा हलक्याशा मऊसर कापडाचा गाउन घातला होता.

ती ओरडली, "मिस्टर पायरो, तुम्ही यशस्वी झालात का? त्या बिचाऱ्या माणसाला त्रास द्यायचे तुम्ही सोडले का?"

“बाईसाहेब, तुमचा मित्र मिस्टर पार्कर पकड वॉरंटपासून पूर्णपणे सुरक्षित आहे.”

“पण तुम्ही छोटेसे हुशार माणूस आहात! फारच हुशार! आणि चटपटीत सुद्धा!”

“उलट मी मिस्टर हार्डमनना वचन दिले आहे की आज मी त्याना त्यांची रत्ने परत मिळवून देईन.”

“मग?”

“बाईसाहेब, त्यामुळे तुम्ही अधिक उशीर न लावता, ती माझ्या हातात आणून दिलीत तर बरे होईल. तुम्हाला घाई करतो आहे, याबद्दल मला माफ करा. पण जर मला स्कॉटलंड यार्डला जायला लागले तर म्हणून मी खाली टॅक्सी थांबवली आहे. आणि आम्ही बेल्जियन्स काटकसरी असतो.”

वेराने एक सिगरेट पेटवली. काही वेळ ती धुम्रवलये सोडत स्तब्ध बसली. मग उठून एक खण उघडला आणि एक काळी रेशमी छोटी बॅग उघडली. तिने ती हलकेच पायरोकडे फेकली. ती बोलताना तिचा स्वर अगदी हलकासा आणि स्पष्ट होता.

“उलट, आम्ही रशियन्स, मोकळेपणे खर्च करतो. तुम्ही आत बघायची गरज नाही. ते सगळे आहेत.”

पायरो उठला.

“बाईसाहेब, मी तुमच्या झटपट शहाणपणासाठी आणि उशीर न केल्याबद्दल तुमचे अभिनंदन करतो.”

“ओहो, पण तुम्ही टॅक्सी थांबवली आहे म्हणालात, त्यामुळे मी दुसरे काय करणार?”

“बाईसाहेब, तुम्ही मित्रत्वाने चांगल्या वागलात. तुम्ही अजून बराच काळ लंडनमध्ये रहाणार आहात का?”

“तुमच्याकडे बघता --- मला वाटते, नाही”

“मला माफ करा.”

“कदाचित आपण दुसरीकडे कुठे भेटू.”

“मी अशी आशा करतो.”

वेरा हसून म्हणाली, “आणि मी --- करत नाही. ही मी चांगली शेरेबाजी केली आहे --- ज्यांना मी घाबरते, असे जगामध्ये फार थोडे लोक आहेत. मिस्टर पायरो, अच्छा.”

“बाईसाहेब, अच्छा. ओहो, मी विसरलो. मला तुमची सिगरेट केस परत करू द्या.”

मग त्याने थोडे वाकून आम्हाला तिजोरीमध्ये मिळालेली चपटी काळी सिगरेट केस तिच्या हातात दिली. तिने चेहऱ्यावरील

हावभाव न बदलता --- फक्त भुवई थोडीशी उचलून, तिने ती घेतली व पुटपुटली, “ठीक आहे.

आम्ही जिना उतरल्यावर पायरो उत्साहाने ओरडला, “काय बाई आहे!

“अरे देवा, फार सुंदर बाई! वादावादीचा/ बचावाचा/ फसवाफसवीचा एकही शब्द नाही --- एक झटपट कटाक्ष आणि तिने एकदम बरोबर कृती केली. हेस्टींग्ज तुला सांगतो, अशी पराभव मान्य करणारी बाई --- असे निष्काळजी हास्य असलेली --- फार पुढे जाईल! ती धोकादायक आहे. तिचे मज्जातंतू जणू स्टीलचे बनलेले आहेत. ती ---- “ तो एकदम थांबला.

मी सुचवले, “जर तू तुझे सामान आवरलेस आणि तू कुठे चालला आहेस, हे बघितलेस, तर बरे होईल. तुला पहिल्यांदा वेराचा संशय कधी आला?”

अरे मित्रा, मोजा आणि सिगरेट केस --- दुहेरी पुरावा, असे आपण म्हणू शकू --- ते मला त्रास देत होते. बर्नार्ड पार्करने त्यापैकी एखादे टाकले असू शकत होते --- पण दोन्ही शक्य वाटत नव्हते. ओहो, नाही. ते फारच काळजी न दाखवल्यासारखे झाले असते. जर पार्करला अडकवण्यासाठी दुसऱ्या कुणी ते टाकले असते, तर एक पुरेसे होते. सिगरेट केस किंवा मोजा --- पण दोन्ही नाही.

त्यामुळे मला अशा निष्कर्षाप्रत यावे लागले, की त्यापैकी एक वस्तू पार्करची नसणार. मी पहिल्यांदा अशी कल्पना केली, की सिगरेट केस त्याची असावी पण मोजा नव्हे. पण मी त्याला वस्तू दाखवल्या, तेव्हा बरोबर उलटे असल्याचे लक्षात आले. मग सिगरेट केस कुणाची होती? ती नक्कीच रुनकॉर्न बाईसाहेबांची नव्हती. त्यावरील आद्याक्षरे फसवी होती. मिस्टर जॉन्सन का? जर तो इथे खोट्या नावानी असता तरच हे शक्य होते. मी त्याच्या सचिव बाईची मुलाखत घेतली. आणि तेव्हा सगळे लगेच स्पष्टपणे लक्षात आले. मिस्टर जॉन्सन यांच्या भूतकाळाबद्दल काही संदिग्धता नव्हती. मग वेरा? तिने स्वतःबरोबर रशियाहून रत्ने आणली असण्याची शक्यता होती. तिला फक्त ती कोंदणातून काढावी लागली असतील. आणि ती रत्ने ओळखली जाण्याची शक्यता काहीच नव्हती. मग पार्करचा एक मोजा हॉलमधून उचलणे, तिच्यासाठी काय अवघड होते? पण अर्थात, तिला स्वतःची सिगरेट केस तिथे नक्कीच टाकायची नव्हती.''

''पण जर सिगरेट केस तिची होती, तर त्यावर B.P. का लिहिले होते? तिच्या नावाची आद्याक्षरे तर V. R. होती.

पायरो मला हळूच हसला.

"अरे मित्रा, तेच तर! पण रशियनमध्ये अक्षर B हे V असते व P हे R असते."

"ठीक आहे, पण तू माझ्याकडून अशी अपेक्षा करू शकत नव्हतास. मी रशियन भाषा जाणत नाही."

"हेस्टींग्ज, मी देखील जाणत नाही. म्हणूनच मी माझे लहानसे पुस्तक आणले आहे --- आणि त्याकडे तुझे लक्ष वेधले होते."

त्याने सुस्कारा टाकला.

"ती बाई उल्लेखनीय व्यक्ती आहे. माझ्या मित्रा, मला असे वाटते आहे, अगदी नेमकेपणे वाटते आहे --- मी तिला परत नक्की भेटेन. पण मला नवल वाटते, कुठे?"

# अनुवादिकेची ओळख



## डॉ. वृषाली जोशी

B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून प्रसिद्ध झाल्या आहेत. ई साहित्यतर्फे एकोणतीस पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन केले आहे.

संशोधन प्रकल्पात सहभाग घेतला आहे.


कॉलेजमध्ये प्राचार्यपद भूषवले आहे.


सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके, सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा, कविता करण्याचा व शब्दकोडी बनवण्याचा छंद आहे.

संपर्क: वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९, चलभाष ९९२१७४६२४५


ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)


डॉ. वृषाली जोशी यांची पुस्तके










*Agatha Christrie*
















# डॉ. वृषाली जोशी यांची पुस्तके


ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)














वृषाली जोशी
विश्वकथा१



वृषाली जोशी
विश्वकथा-२


वृषाली जोशी
विश्वकथा-३



वृषाली जोशी
विश्वकथा-४



वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
कंटाळवाणी गोष्ट
Classics To Go
A Dreary Story
Anton Chekhov


वृषाली जोशी
साकीच्या कथा
HECTOR HUGH
MUNRO SAKI


THE PICTURE OF
DORIAN GRAY
द पिक्चर ऑफ
डोरिअन ग्रे
वृषाली जोशी
OSCAR WILDE



सॉमरसेट मॉम
मेजवानीपूर्वी
व इतर कथा
अनुवाद
वृषाली जोशी
BEFORE
THE PARTY



वृषाली जोशी
THE SHAKESPEARE STORIES
A MIDSUMMER NIGHT'S DREAM
THE MERCHANT OF VENICE
शेक्सपिअरच्या चार कथा
Much Ado about Nothing
Twelfth Night






शेरलॉक होम्स
भाग १ ते ८ (५० कथा)


ज्या कव्हरवर क्लिक
कराल ते पुस्तक उघडेल








**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष.**
**डॉ. वृषाली जोशी यांचे हे अठ्ठाविसावे पुस्तक.**

डॉ. वृषाली जोशी या मराठी व इंग्रजी या भाषांच्या विद्वान आहेत. त्या प्राचार्य होत्या. त्यांनी काही काळ विदेशात राहून तेथल्या वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला आहे. तशी वाचन संस्कृती महाराष्ट्रातही निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. वाचकांची अभिरुची वाढली तरच लेखकांकडूनही दर्जेदार साहित्य निर्माण होईल. इंग्रजीतील उच्च दर्जाचे निवडक लेखकांचे साहित्य मराठीत अनुवाद करून मराठी वाचकांची अभिरूची संपन्न व्हावी यासाठी त्या अतोनात कष्ट घेतात. तसे पहाता अनुवादित पुस्तकांना अनेक व्यावसायिक प्रकाशकांकडून मागणी असते. परंतु मराठीतील जास्तीत जास्त वाचकांपर्यंत आपले साहित्य जावे म्हणून त्यांनी ई साहित्यची निवड आपल्या पुस्तकांसाठी केली आहे.

डॉ. वृषाली जोशी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू

गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (२०), शुभांगी पासेबंद(१४), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (३४), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(९), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी(२९), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१३), अंकुश शिंगाडे(१६), आनंद देशपांडे(४), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(४) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(३), अरुण कुळकर्णी(८), जगदिश खांदेवाले(५) पंकज कोटलवार(५) डॉ. सुरुची नाईक (३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(४), रामदास खरे(३), अतुल देशपांडे, श्याम कुलकर्णी, किशोर कुलकर्णी असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं 'इ'यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।